सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. २४ ऑक्टोंबर २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १८८ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

'देशाच्या विकासासाठी एकत्र या'; चिन्मय अमृत महोत्सवात पंतप्रधान नरेंद्र मोदींचे महत्त्वाचे भाषण

नवी दिल्ली : भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल आपण जो 'अमृत महोत्सव' साजरा केला, तो केवळ एक सोहळा नव्हता. तर तो आपल्या जुन्या मूल्यांची ओळख करून देत, २०४७ पर्यंत भारताला एक विकसित देश बनवण्याचा भक्कम पाया आहे, असे विचार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी व्यक्त केले. नवी दिल्लीतील 'भारत मंडपम' येथे 'चिन्मय अमृत महोत्सव ग्लोबल संमेलन' पार पडले. या भव्य कार्यक्रमात बोलताना पंतप्रधान म्हणाले की, देशातील प्रत्येक नागरिकाचा सहभाग, स्वावलंबन आणि तरुण पिढीच्या ताकदीवरच भारत आपल्या स्वातंत्र्याच्या शंभराव्या वर्षी (२०४७ मध्ये) संपूर्ण जगभरात एक महान विकसित देश म्हणून ओळखला जाईल.

समाजात फूट पाडणाऱ्या शक्तींपासून सावध राहण्याचे आवाहन

आपल्या भाषणामध्ये बोलताना पंतप्रधान मोदी यांनी आजच्या काळातील काही नवीन आव्हानांवर आणि सामाजिक समस्यांवर चिंता व्यक्त केली. देशात आणि समाजात फूट पाडणाऱ्या लोकांपासून किंवा शक्तींपासून सर्वांनी दूर राहिले पाहिजे आणि त्यांच्याविरोधात एकत्र येऊन उभे राहिले पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, देशातील प्रत्येक व्यक्तीला स्वावलंबी बनवण्याची आज नितांत गरज आहे. विशेष योगायोग म्हणजे, २०४७ मध्ये भारत जेव्हा स्वातंत्र्याची १०० वर्षे पूर्ण करेल, त्याच वेळी 'चिन्मय मिशन'ची स्थापना होऊनही १०० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यामुळे देशाच्या या मोठ्या प्रवासात सर्वांनी मिळून उत्साहाने योगदान दिले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

स्वामी चिन्मयानंद यांच्या आठवणी आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर

या कार्यक्रमाचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे, आधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेऊन पूज्य स्वामी चिन्मयानंद यांची 'हॅलोग्राफिक प्रतिमा' (हवेमध्ये जिवंत भासणारी आकृती) तयार करण्यात आली होती. या डिजिटल रूपात समोर असलेल्या स्वामीजींशी संवाद साधताना पंतप्रधान मोदी काही क्षण भावुक झाले आणि त्यांनी ३३ वर्षांपूर्वीच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. १९९३ मध्ये वडोदरा येथे स्वामीजींची झालेली भेट, त्यांच्याशी झालेली चर्चा आणि त्यांचा आशीर्वाद याची आठवण काढत पंतप्रधान म्हणाले की, त्या भेटीदरम्यान तरुण पिढीला (युवाशक्तीला) सक्षम बनवून एक मजबूत भारत कसा घडवता येईल, यावर मुख्य चर्चा झाली होती. त्यानंतर काही वर्षांतच जनतेच्या आशीर्वादामुळे मला गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून देशसेवा करण्याची संधी मिळाली, अशी भावनिक आठवण त्यांनी सांगितली.

देशाच्या विकासात तरुण पिढीचा मोठा वाटा

गेल्या २५ वर्षांपासून सरकारमध्ये प्रमुख पदावर काम करताना आपल्या प्रत्येक निर्णयाच्या केंद्रस्थानी नेहमी 'तरुण पिढी' (युवाशक्ती) राहिली आहे, असे पंतप्रधानांनी आवर्जून सांगितले. यावेळी त्यांनी चिन्मय मिशनच्या तरुण सदस्यांचे भरभरून कौतुक केले. या संस्थेच्या तरुणांनी जवळपास ३०० दिवसांत तब्बल ४० हजार किलोमीटरचा प्रवास करून देशातील १ लाखांहून अधिक युवकांपर्यंत राष्ट्रउभारणीचा संदेश पोहोचवला आहे, हे कौतुकास्पद असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच, देशात आणलेली नवीन 'राष्ट्रीय शिक्षण नीती' (NEP) ही आपल्या प्राचीन ज्ञानपरंपरा, मातृभाषेतील शिक्षण आणि आजचे आधुनिक तंत्रज्ञान या सर्वांचा अगदी अचूक मेळ घालणारी आहे, असेही त्यांनी सांगितले.

चिन्मय मिशन हे वेदान्त विचारांचे जिवंत रूप

चिन्मय मिशन ही केवळ एक सामान्य संस्था नाही, तर ती वेदान्त तत्त्वज्ञानाचा प्रचार करणाऱ्या स्वामी चिन्मयानंद यांच्या महान विचारांचे एक जिवंत प्रतीक आहे, अशा शब्दांत पंतप्रधानांनी या आध्यात्मिक संस्थेचा गौरव केला. या सुंदर महोत्सवात सहभागी होणे हा आपल्यासाठी एक अतिशय आनंददायी आणि आध्यात्मिक अनुभव होता, असे सांगत त्यांनी देशातील सर्व सामाजिक आणि धार्मिक संस्थांना 'अमृत संकल्पां'च्या माध्यमातून देशसेवेच्या कामात एकत्र येण्याचे आवाहन केले.

तैवानमध्ये 'चांपी' चक्रीवादळाचा हाहाकार; शाळा-कार्यालये बंद, शेकडो उड्डाणे रद्द!

ताइपे: तैवानमध्ये 'चांपी' चक्रीवादळाने धडक देण्यापूर्वीच हाहाकार माजवला आहे. ताशी 170 किलोमीटर वेगाने वाहणारे विनाशकारी वारे आणि मुसळधार पावसामुळे संपूर्ण जनजीवन विस्कळीत झाले आहे. प्रशासनाने अत्यंत वेगाने पावले उचलत तैपेई, कीलुंग, ताओयुआनसह अनेक प्रमुख भागांमध्ये शाळा आणि कार्यालये बंद ठेवण्याचे सक्तीचे आदेश दिले आहेत. वादळाचा धोका ओळखून समुद्रकिनारे आणि डोंगराळ भागांत जाण्यास कडक मनाई करण्यात आली असून नागरिकांना सुरक्षितस्थळी राहण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

स्थानिक प्रशासनाच्या माहितीनुसार, ग्रेटर तैपेई, कीलुंग आणि ताओयुआन यांसारख्या महत्त्वाच्या शहरांमध्ये शुक्रवारी सर्व कामकाज पूर्णपणे ठप्प झाले. दक्षिण तैवानमधील युनलिन, चियायी, ताइनान, काओशुंग आणि पिंगतुंग या भागांतही खबरदारी म्हणून सर्व यंत्रणा सतर्क ठेवण्यात आली आहे. पूर्व तैवानसह यिलान, हुआलिएन, पेंघू आणि लियानचियांग या बाह्य बेटांवरही बंदची घोषणा करण्यात आली आहे. आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी सर्व सुरक्षा यंत्रणा सज्ज आहेत.

चक्रीवादळाच्या प्रभावामुळे तैवानच्या अनेक भागांत मुसळधार पावसाने कहर केला आहे. केवळ 24 तासांच्या आत तैपेई शहरातील काही भागांत 200 मिलिमीटरपेक्षा जास्त पावसाची विक्रमी नोंद झाली आहे. यामुळे सखल भागात पूरस्थिती निर्माण होण्याचा मोठा धोका निर्माण झाला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, शनिवार संध्याकाळपर्यंत या वादळाचा प्रभाव कायम राहण्याची शक्यता असून त्यानंतर तीव्रता ओसरण्याची अपेक्षा आहे.

या महाभयंकर चक्रीवादळाचा थेट परिणाम विमान वाहतुकीवर झाला आहे. वादळ धडकण्यापूर्वीच तैवानमधील शंभराहून अधिक विमानांची उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. प्रवाशांनी विमान कंपन्यांच्या संपर्कात राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सतीश चव्हाण मागील निवडणुकीपेक्षा अधिक मताधिक्याने विजयी होतील!

परभणी/ प्रतिनिधी

मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत महायुतीचे उमेदवार सतीश चव्हाण हे मागील निवडणुकीपेक्षा अधिक मताधिक्याने विजयी होतील, असा विश्वास राज्याच्या मंत्री मेघना बोर्डीकर यांनी व्यक्त केला. जिंतूर तालुक्यातील दुधगाव येथील जिल्हा परिषद शाळेत त्यांनी मतदानाचा हक्क बजावला. यावेळी त्यांनी महायुतीतील नाराजीचा निवडणूक निकालावर परिणाम होणार नसल्याचा दावाही केला.

मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी विविध राजकीय पक्षांनी जोरदार प्रयत्न केले. महायुतीचे उमेदवार सतीश चव्हाण यांना मतदारांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे सांगत, यंदा त्यांचे मताधिक्य वाढेल, अशी अपेक्षा मंत्री बोर्डीकर यांनी व्यक्त केली.

मतदानानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी महायुतीतील काही पदाधिकारी किंवा कार्यकर्त्यांनी विरोधात काम केले असले, तरी त्याचा निकालावर विशेष परिणाम होणार

नसल्याचे सांगितले. महायुतीच्या उमेदवाराला मिळत असलेला पाठिंबा पाहता सतीश चव्हाण हे मोठ्या मताधिक्याने विजयी होतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, या निवडणुकीत विविध राजकीय पक्षांनी प्रतिष्ठा पणाला लावली असून, मतदारांचा कौल कोणाच्या बाजूने लागतो, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. मंत्री मेघना बोर्डीकर यांचा विजयाबाबतचा दावा प्रत्यक्ष निकालात कितपत खरा ठरतो, हे निकालानंतर स्पष्ट होणार आहे.

वेरूळच्या विद्यासागर गोशाळेतील 135 गायींच्या चाऱ्यासाठी दानशूर व्यक्तींनी मदत करा : डॉ. प्रेमचंद पाटणी

तभा वृत्तसेवा

खुलताबाद प्रतिनिधी : श्री क्षेत्र वेरूळ येथील गो शाळेतील १३५ गाईंना या वर्षी कमी पावसा अभावी चाऱ्याची भीषण टंचाई; जाणवत असून या मुक्या जनावरांचे प्राण वाचविण्यासाठी चारा, कुट्टी व भुसा दान करण्याचे

आवाहन गो शाळेच्या वतीने यावर्षी पावसाचे प्रमाण अत्यंत कमी झाल्याने राज्यात चाऱ्याची भीषण टंचाई निर्माण झाली आहे. याचा फटका वेरूळ तालुका खुलताबाद जिल्हा छत्रपती संभाजी नगर येथील श्री पार्श्वनाथ आश्रम, गुरुकुल आचार्य विद्यासागर गोशाळेलाही बसला आहे. या गोशाळेत सध्या सुमारे १३५ गायी असून, त्यांच्यासाठी पुरेसा चारा उपलब्ध होत नसल्याने मोठे संकट

निर्माण झाले आहे. या मुक्या जनावरांचे प्राण वाचविण्यासाठी दानशूर व्यक्तींनी पुढाकार घेऊन चारा, कुट्टी व भुसा दान करावे, असे भावनिक आवाहन संस्थेचे सचिव डॉ. प्रेमचंद पाटणी यांनी केले आहे.

वेरूळ येथील या गोशाळेत सुमारे १३५ गायींचा सांभाळ केला जातो. त्यापैकी केवळ चार गायी दूध देणाऱ्या असून, उर्वरित सुमारे १३१ गायी दूध न देणाऱ्या आहेत. पावसाअभावी परिसरातील डोंगर-दऱ्यांमध्ये जनावरांसाठी चारा उपलब्ध होणे कठीण झाले आहे. त्यामुळे गोशाळेतील गायींच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. पुरेशा चाऱ्याअभावी गायींची उपासमार होत असून, त्यांच्या आरोग्यावरही विपरीत परिणाम होत आहे. पाण्याची व्यवस्था केली; मात्र चाऱ्याचा प्रश्न कायम आहे

गोशाळेतील गायींना पिण्यासाठी पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी संस्थेने किमान दोन किलोमीटरपर्यंत खोदकाम करून पाण्याची व्यवस्था केली आहे. मात्र, पाण्याची व्यवस्था झाली असली, तरी चाऱ्याअभावी गायींच्या संगोपनाचा प्रश्न कायम आहे. जनावरांना पुरेसे खाद्य मिळत नसल्याने त्यांची अवस्था बिकट होत चालली आहे. अशा परिस्थितीत गायींचे संरक्षण आणि संगोपन करण्यासाठी समाजातील दानशूर व्यक्तींच्या मदतीची नितांत गरज आहे.

गोशाळेतील गायींची उपासमार थांबविण्यासाठी शेतकरी, व्यापारी, सामाजिक संस्था, सेवाभावी संघटना आणि दानशूर नागरिकांनी आपल्या परीने मदत करावी. उपलब्ध असलेला हिरवा किंवा सुका चारा, कुट्टी तसेच भुसा दान करून या मुक्या जनावरांचे प्राण वाचविण्यास हातभार लावावा. संकटाच्या या काळात समाजाने पुढे येऊन गोशाळेला मदत केल्यास गायींच्या चाऱ्याचा प्रश्न काही प्रमाणात मार्गी लागू शकतो. चारा दान करू इच्छिणाऱ्या दानशूर व्यक्तींनी गो शाळेचे संस्थेचे सचिव डॉ. प्रेमचंद पाटणी श्री क्षेत्र वेरूळ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.

मक्रणपूरमध्ये २३० किलो गोवंशीय मांस जप्त; चौघांविरुद्ध गुन्हा

तभा वृत्तसेवा

कन्नड :दि.२३ ऑक्टोबर - तालुक्यातील मक्रणपूर येथील इंदिरानगर परिसरात गोवंशीय जनावरांची कत्तल करून मांसविक्री केल्याप्रकरणी कन्नड शहर पोलिसांनी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. शुक्रवारी (दि. २३) सकाळी साडेसहाच्या सुमारास केलेल्या कारवाईत पोलिसांनी २३० किलो मांसासह कत्तलीसाठी वापरण्यात येणारे साहित्य जप्त केले. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत ४६ हजार २०० रुपये आहे.

पोलिस कर्मचारी अमोल विश्वनाथ गायकवाड यांच्या फिर्यादीनुसार, मक्रणपूर येथील इंदिरानगर परिसरात गोवंशीय जनावरांची कत्तल करून मांसविक्री होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिस पथकाने पंचांसह संबंधित ठिकाणी छापा टाकला. यावेळी पत्र्याच्या शेडमध्ये मांस आढळून आले.

या कारवाईत जुबेर नजीर सय्यद याच्या शेडमधून १०० किलो मांस, तर अशपाक फकीरा सय्यद आणि अल्ताफ फकीरा सय्यद यांच्या ताब्यातून १३० किलो मांस जप्त करण्यात आले. यासोबत एक धारदार चाकू आणि लोखंडी आकडा असलेला लाकडी दांडा जप्त करण्यात आला.

या प्रकरणी अशपाक फकीरा सय्यद (३८), अल्ताफ फकीरा सय्यद (४०), जुबेर नजीर सय्यद (३६) आणि सईद मुनीर सय्यद यांच्याविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण (सुधारणा) अधिनियम, १९९५ मधील संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सईद मुनीर सय्यद फरार असल्याचे फिर्यादीत नमूद आहे. जप्त मांसाचा नमुना तपासणीसाठी राखून ठेवण्यात आला आहे.

पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी आरती पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक नवनाथ गाडेकर करीत आहेत.

एअर इंडियाचे आपत्कालीन लँडिंग

हैदराबाद: उड्डाण भरताच विमानात अचानक तांत्रिक बिघाड झाल्याने प्रवाशांचे प्राण कंठाशी आले. हैदराबादहून मुंबईकडे निघालेल्या एअर इंडियाच्या विमानाचे तातडीने आपत्कालीन लँडिंग करावे लागले. हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावरून मुंबईसाठी झेपावलेल्या एअर इंडियाच्या AI 417 विमानाबाबत ही थरारक घटना घडली आहे. उड्डाण केल्यानंतर अवघ्या पाच मिनिटांतच विमानात काहीतरी तांत्रिक समस्या निर्माण झाल्याचे वैमानिकाच्या लक्षात आले. प्रसंगावधान राखत पायलटने तातडीने एअर ट्रॅफिक कंट्रोलशी (ATC) संपर्क साधला आणि विमान पुन्हा सुरक्षितपणे हैदराबाद विमानतळावर परत आणले. सुदैवाने, या घटनेत विमानातील सर्व 109 प्रवासी पूर्णपणे सुरक्षित आहेत. शमशाबाद येथील विमानतळावरून विमान मुंबईच्या दिशेने निघाले होते. मात्र, अवघ्या पाच मिनिटांत बिघाड झाल्याने मोठी दुर्घटना टळली. पायलटने दाखवलेली समयसूचकता आणि एटीसीच्या तत्परतेमुळे सर्व प्रवाशांचे प्राण वाचले. विमान खाली उतरताच सर्वांनी सुटकेचा निःश्वास सोडला.विमान सुरक्षित उतरवल्यानंतर तांत्रिक बिघाड नेमका कशामुळे झाला, याचा शोध घेण्यासाठी विमानतळावरील तज्ज्ञ कसून तपासणी करत आहेत. प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून एअर इंडियाच्या व्यवस्थापनाकडून त्यांना मुंबईला पाठवण्यासाठी तातडीने पर्यायी विमानाची किंवा प्रवासाची सोय करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.

नऊ शेळ्या-बकऱ्यांचा मृत्यू; शेळीपालन करणाऱ्या शेतकऱ्याचे नुकसान

तभा वृत्तसेवा

कन्नड : दि.२३ ऑक्टोबर - शहरातील शनी मंदिर परिसरातील वडार वाडा येथील अनिल पवार (वय ४८) यांच्या नऊ शेळ्या-बकऱ्या मृतावस्थेत आढळून आल्या. गुरुवारी (दि. २३) सकाळी ६ वाजेच्या सुमारास हा प्रकार निदर्शनास आला. यात पाच बकऱ्या आणि चार बकऱ्यांचा समावेश आहे.

अनिल पवार यांची गराडा परिसरात अर्धा एकर शेती असून, शेतीला जोडधंदा म्हणून ते शेळीपालन करतात. शेळीपालनातून कुटुंबाच्या उदरनिर्वाहाला हातभार लागत असताना नऊ जनावरांचा मृत्यू झाल्याने त्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

घटनेची माहिती मिळताच पवार यांनी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना कळवले. सकाळी ११ वाजेच्या सुमारास पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. निलेश गायकवाड आणि पशुधन पर्यवेक्षक डॉ. प्रवीण राठोड यांनी घटनास्थळी पोहोचून मृत जनावरांचे शवविच्छेदन केले. तलाठी दीपक एरंडे यांनीही घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

सध्या दुष्काळसदृश परिस्थितीमुळे शेतकरी आर्थिक अडचणींचा सामना करत आहेत. अशा परिस्थितीत शेतीला पूरक व्यवसाय म्हणून केलेल्या शेळीपालनातील नऊ जनावरांचा मृत्यू झाल्याने अनिल पवार यांच्यासमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. जनावरांच्या मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदनाच्या निष्कर्षांनंतर स्पष्ट होणार असून, संबंधित यंत्रणेने नुकसानीची दखल घेऊन मदतीबाबत विचार करावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

4 वर्षे उलटून ही विश्राम गृहाचे काम अपूर्ण; माऊली कन्ट्रक्शनच्या बोगस कामाचा नमुना

तभा वृत्तसेवा

पैठण दि २२ :- तीर्थक्षेत्र पर्यटननगरी पैठणला सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे तयार करण्यात येणाऱ्या शासकीय विश्रामगृह नवीन ईमारतीचे काम ४ वर्षे उलटून ही अद्याप अपूर्ण असून या अपूर्ण कामात ही ईमारतीला जागोजागी तडे गेल्याने निर्माण कार्य करणाऱ्या मे.माऊली कन्ट्रक्शन वतीने बोगस कामाचा नमुना पैठणकरांसमोर ठेवण्यात आला आहे.



ऐतिहासिक पैठण नगरीत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने संत ज्ञानेश्वर उद्यान परिसरातील भव्य जाग्यावर शासकीय विश्रामगृह नवीन ईमारतीचे काम करण्यात येत असून छत्रपती संभाजीनगर येथील माऊली कन्ट्रक्शन इमारतीचे निर्माण कार्य देण्यात आले. यासाठी त्यांना दिनांक १० मे २०२३ रोजी कार्यरंभ आदेश देऊन कामाचा कालावधी १२ महिने देण्यात आला. सुरुवातीला २ कोटी ९ लक्ष ४३ हजार ६१६ एवढा निधी कामासाठी देण्यात आला होता यानंतर निधित वाढ झाल्याची माहिती आहे.

कार्यरंभ आदेशानंतर १२ महिन्यात नवीन इमारतीचे काम पूर्ण होणे अपेक्षित असतांना ४१ महिने उलटून ही नवीन शासकीय गेस्ट हाऊसचे काम अपूर्ण आहे.दरम्यान निधीच्या उपलब्धते मुळे कामाला विलंब झाला असल्याची माहिती सहाय्यक बांधकाम अभियंता सानप यांनी दिली.

माऊली कंट्रक्शनवर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांची मेहरबानी तथा आशीर्वाद रुपाने नवीन शासकीय विश्रामगृह कामाला विलंब झाल्याचे बोलते जात आहे. कामाला उशीर होत असल्याने काम दर्जेदार होईल असा अंदाज असतांना सदरील काम अंदाजपत्रकाला बगल देत उरकण्यात येत असल्याचे चित्र आहे.याचा उत्तम नमुना म्हणजे ईमारतीला आत्ताच जागोजागी तडे गेले आहेत. गेस्ट हाऊस बिल्डिंग कामाची थर्ड पार्टी चौकशी करून एजन्सीला देणारे देयक थांवण्यात यावे अशी अशी मागणी होत आहे.

शांतिब्रम्ह श्री संत एकनाथ महाराज समाधी मंदिर, श्री संत ज्ञानेश्वर माऊली यांचे जन्मगांव आपेगांव,प्राचीन महानुभाव मंदिर,प्राचीन जैन मंदिर, देवनाथ मंदिर, जगप्रसिद्ध संत ज्ञानेश्वर उद्यान, जायकवाडी प्रकल्प यांना भेट देण्यासाठी तसेच विविध शासकीय कामासाठी पैठणला येणारे राज्य मंत्रिमंडळाचे सदस्य, विधीतज्ञ, लोकप्रतिनिधी, सचिव,शासकीय, निमशासकीय अधिकारी, व्ही.आय.पी गेस्ट, विविध राजकीय पक्षाचे प्रतिनिधी यांच्यासाठी मागील ८ वर्षांपासून शासकीय विश्रामगृह नसल्याने मोठी समस्या निर्माण होत आहे.

बुलडाणा अर्बन सिल्लोड शाखेच्या वतीने मयत सभासदाच्या वारसदारास धनादेशाचे वितरण

सोयगाव,दि.२३ ऑक्टोबर

सहकाराला सामाजिक कार्याची जोड देऊन समाजातील विविध उपेक्षित घटकांच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक कार्यासाठी सदैव तत्पर असणाऱ्या बुलडाणा अर्बन संस्थेच्या शाखा सिल्लोड च्या वतीने मयत कर्जदार सभासदाच्या वारसदारास विमा धनादेश वितरण करण्यात आले.

संस्थेच्या शाखा सिल्लोड येथील सभासद बहादुर सिंग धवलसिंग कायटे यांनी दिनांक 01/06/2026 रोजी सोने तारण कर्ज घेतले होते परंतु दिनांक 07/06/2026 रोजी त्यांचा विजेचा शॉक लागल्याने अपघाती मृत्यू झाला. बुलडाणा अर्बन संस्थेच्या वतीने संस्थेचे ठेवीदार, कर्जदार सभासदांना अपघाती विम्याचे संरक्षण देण्यात येते. त्यासंदर्भात बहादुर सिंग कायटे यांच्या कुटुंबीयास अपघाती विमा योजनेचा लाभ मिळावा यासाठी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक उपाख्य भाईजी व संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुकेशजी झंवर, बुलडाणा अर्बन चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्षा कोमलताई झंवर,संस्थेचे सरव्यवस्थापक कैलासजी कासट व सिल्लोड विभागाचे विभागीय व्यवस्थापक संजय आनंदा दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ शाखा व्यवस्थापक गजानन झाल्टे यांनी कायटे कुटुंबीयांची भेट घेऊन संस्थेच्या अपघाती विमा योजनेची माहिती दिली. आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करून विमा प्रस्ताव मुख्यालयाला सादर केला असता मयत ठेवीदार सभासद यांच्या सोने तारण कर्ज ची रक्कम 37189/-मंजूर करून सदर धनादेश विभागीय व्यवस्थापक संजय दळवी यांच्या उपस्थितीत त्यांच्या वारसदार चित्रा बहादुर सिंग कायटे यांना शाखेचे स्थानिक संचालक संतोषजी गिल्डा व गोपालजी चांडक यांच्या हस्ते वितरित करण्यात आला. कार्यक्रमात उपस्थित खातेदार तसेच शाखेचे कर्मचारी वरिष्ठ शाखा व्यवस्थापक गजानन झाल्टे,विभागीय लेखा परीक्षक अनिल बोर्डे,सहाय्यक शाखा व्यवस्थापक योगेंद्र डापके व इतर कर्मचारी उपस्थित होते.

25 ऑक्टोबर रोजी अनुभवता येणार 'हर घर धुरंधर

मुंबई : भव्यता, थरार आणि नेत्रदीपक मनोरंजनाचा अनुभव! या ऑक्टोबरमध्ये 'धुरंधर' चित्रपट भारतभरातील आपल्या प्रवासात एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठणार आहे. प्रथमच हा चित्रपट फ्रीडिश प्रेक्षकांसाठी उपलब्ध होणार आहे. रणवीर सिंहचा उत्कंठा वाढवणारा स्पाय थ्रिलर चित्रपट 'धुरंधर' 25 ऑक्टोबर 2026 रोजी सायंकाळी 7 वाजता स्टार उत्सव मूव्हीज, कलर्स सिनेप्लेक्स बॉलिवूड आणि कलर्स सिनेप्लेक्स सुपरहिट्स या तिन्ही वाहिन्यांवर एकाच वेळी प्रदर्शित होणार आहे.देशासाठी पडद्यामागे राहून गुप्तपणे कार्य करणाऱ्या 'अज्ञात वीरां'ना समर्पित असलेला 'धुरंधर' हा चित्रपट ॲक्शन आणि थराराने भरलेला आहे. या चित्रपटात रणवीर सिंह एका आक्रमक आणि अविस्मरणीय भूमिकेत दिसणार असून, त्यांच्यासोबत अक्षय खन्ना, संजय दत्त, आर. माधवन, अर्जुन रामपाल, राकेश बेदी आणि सारा अर्जुन यांसारख्या दिग्गज कलाकार पाहायला मिळणार आहेत.

सीडीएसएलकडून रीइमॅजिन आयडियाथॉन 2.0 लाँच

मुंबई : सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड ("सीडीएसएल") या आशियातील पहिली सूचीबद्ध डिपॉझिटरी आणि १९ कोटींहून अधिक डीमॅट खात्यांची विश्वासू संरक्षक कंपनीने आज रीइमॅजिन आयडियाथॉन २.० लाँच केले. अधिकाधिक वैविध्यपूर्ण आणि डिजिटल होत चाललेल्या गुंतवणूकदार वर्गासाठी आर्थिक जागरूकता आणि सायबर सुरक्षा अधिक मजबूत करू शकतील असे नाविन्यपूर्ण सोल्युशन्स विकसित करण्यासाठी देशभरातील विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात आले आहे.भारतात 'समज से इन्व्हेस्टिंग सिम्पल' संकल्पनेअंतर्गत साजऱ्या होत असलेल्या वर्ल्ड इन्व्हेस्टर वीक २०२६ दरम्यान सुरू झालेली ही आयडियाथॉन सेबीच्या 'प्रोजेक्ट जागरूक'च्या गुंतवणूकदार जागरूकता आणि शिक्षण उद्दिष्टांना पूरक ठरते. सेबीचा हा प्रकल्प आर्थिक साक्षरता वाढवण्यासाठी, माहितीवर आधारित गुंतवणूक पद्धतींना प्रोत्साहन देण्यासाठी आणि आर्थिक फसवणुकीविषयी जागरूकता वाढवण्यासाठी सेबी आणि सीडीएसएलसह सिक्युरिटीज मार्केट पार्टनर्सना एकत्र आणतो.

एलजी इलेक्ट्रॉनिक्स इंडिया लिमिटेडला ग्रेट प्लेस टू वर्क प्रमाणपत्र प्राप्त

नवी दिल्ली: भारतातील आघाडीच्या कन्झ्युमर ड्युरेबल्स कंपन्यांपैकी एक असलेल्या एलजी इलेक्ट्रॉनिक्स इंडिया लिमिटेडने (एलजीई इंडिया) सलग तिसऱ्या वर्षी ग्रेट प्लेस टू वर्क® सर्टिफिकेशन™ मिळवले आहे. कार्यसंस्कृती आणि कर्मचारी अनुभवावर जागतिक स्तरावर प्राधिकृत असलेल्या ग्रेट प्लेस टू वर्क® ने, ट्रस्ट इंडेक्स™ सर्वेक्षणाद्वारे मिळालेला कर्मचाऱ्यांचा अभिप्राय आणि कार्यसंस्कृतीच्या मूल्यांकनावर आधारित एलजीई इंडियाला हे प्रमाणपत्र बहाल केले आहे. कर्मचाऱ्यांच्या दृष्टिकोनाचा विचार करून, हे मूल्यांकन विश्वास, सहभाग आणि दैनंदिन कामाचा अनुभव एखाद्या संस्थेची संस्कृती कशी घडवतात, याची सखोल माहिती देते.२०२३ मध्ये पहिल्यांदा सर्टिफिकेशन मिळवल्यानंतर, एलजीई इंडियाने कर्मचारी अनुभव, कार्यस्थळाची संस्कृती आणि व्यावसायिक विकासाला चालना देणाऱ्या वातावरणावर लक्ष केंद्रित करत ही मान्यता अधिक मजबूत केली आहे. ही मान्यता जॉब मार्केटमधील सर्वोत्कृष्ट टॅलेंट मिळवण्यात यापुढेही मदत करेल आणि यामुळे शेअरधारकांचा विश्वासही वाढेल.

धुळे जिल्ह्यातील शेतकरी बनत आहेत महत्त्वाचे भागीदार

धुळे :भारताची ऊर्जा सुरक्षा केवळ वीज निर्मितीवर अवलंबून नसून, वीजनिर्मिती केंद्रांमधून घरे, शेती आणि उद्योगांपर्यंत वीज पोहोचविण्यासाठी आवश्यक असलेल्या सक्षम पारेषण यंत्रणेवरही अवलंबून आहे. देशभरात या पायाभूत सुविधांचा विस्तार होत असताना, वीज पारेषण मार्गांसाठी जमीन उपलब्ध करून देणारे शेतकरी आणि ग्रामीण जमीनधारक देशाच्या पायाभूत विकासातील महत्त्वाचे भागीदार म्हणून पुढे येत आहेत.धुळे जिल्ह्यातीलबळसाणे पॉवर ट्रान्समिशन प्रकल्पहा शेती, ग्रामीण समुदाय आणि देशाच्या वाढत्या ऊर्जेच्या गरजा यांच्यातील महत्त्वाचा दुवा अधोरेखित करतो. जिल्ह्यात वीज पारेषण पायाभूत सुविधांचा विकास होत असताना, शेतकऱ्यांचे सहकार्य वीज पारेषण जाळे मजबूत करण्यास मदत करू शकते. त्याचबरोबर, पात्र जमीनधारकांना लागू असलेल्या शासन धोरणांनुसार योग्य नुकसानभरपाई मिळविण्याची संधीही उपलब्ध होते.

सिग्मा ॲडव्हान्स्ड सिस्टीम्सला 174 कोटींची ऑर्डर

मुंबई : सिग्मा ॲडव्हान्स्ड सिस्टीम्स लिमिटेड ("सिग्मा"), एक जागतिक एरोस्पेस आणि संरक्षण अभियांत्रिकी व उत्पादन कंपनीने, आज जाहीर केले की त्यांना नाटो संरक्षण परिसंस्थेशी संलग्न असलेल्या एका उत्तर अमेरिकन ग्राहकाकडून १९.७० दशलक्ष अमेरिकी डॉलर (अंदाजे १७४ कोटी रुपये) किमतीची ऑर्डर मिळाली आहे. ही ऑर्डर १५५ मिमी तोफगोळ्यासाठी लागणाऱ्या विशेष सहाय्यक उपप्रणालींच्या उत्पादन आणि पुरवठ्याशी संबंधित आहे. ही ऑर्डर २०२७ च्या दुसऱ्या तिमाहीपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे, आणि तिचे उत्पादन सिग्माच्या स्वतःच्या इकोसिस्टममध्ये केले जाईल. मे २०२६ पासून १५५ मिमी राऊंड्सशी संबंधित हा सिग्माचा पाचवा प्रकल्प आहे, जो तोफखान्याच्या दारुगोळ्याच्या संपूर्ण मूल्य साखळीमध्ये कंपनीच्या वाढत्या क्षमता दर्शवतो.

तोतरेपणा हा कमी बुद्धिमत्तेचा नव्हे, तर बोलण्याच्या प्रवाहाशी संबंधित विका

छत्रपती संभाजीनगर : दरवर्षी २२ ऑक्टोबर हा दिवस आंतरराष्ट्रीय तोतरेपणा जागरूकता दिन म्हणून पाळला जातो. तोतरेपणाबाबत समाजात जागरूकता निर्माण करणे, या समस्येचा सामना करणाऱ्या व्यक्तींना समजून घेणे आणि त्यांच्याबद्दल असलेले गैरसमज दूर करणे हा या दिनाचा प्रमुख उद्देश आहे. तोतरेपणा ही बोलण्याच्या प्रवाहाशी संबंधित समस्या असून, त्याचा व्यक्तीच्या बुद्धिमत्तेशी किंवा क्षमतेशी थेट संबंध नसतो. योग्य मार्गदर्शन, स्पीच थेरपी आणि कुटुंबीयांच्या सहकार्याने बोलण्यातील अडचणी हाताळण्यास मदत होऊ शकते. मेडिकवर हॉस्पिटल चे कान नाक घासा तज्ञ डॉ शरद शेळके डॉ अतुल पोरे, डॉ रितेश भाग्यवंत , वाचा विकार तज्ञ डॉ प्रिया भाले व बालरोग तज्ञ डॉक्टर राहुल गोसावी यांनी सांगितले की तोतरेपणामध्ये बोलताना एखादा शब्द किंवा अक्षर वारंवार उच्चारणे, आवाज लांबवणे, बोलताना मध्येच अडखळणे किंवा काही शब्द उच्चारताना अडथळा जाणवणे अशी लक्षणे दिसू शकतात. काही व्यक्तींना बोलताना ताण येणे, डोळ्यांची उघडझाप वाढणे किंवा बोलण्याची भीती वाटणे अशा अडचणीही जाणवतात. विशेषतः लहान मुलांमध्ये भाषाविकासाच्या काळात काही वेळा बोलण्यात अडखळणे दिसू शकते. मात्र, ही समस्या सतत जाणवत असेल, वाढत असेल किंवा मुलाच्या संवादावर परिणाम होत असेल, तर स्पीच अँड लँग्वेज थेरपिस्टचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

बाणेरमध्ये 103 उद्योजकांचा सहभाग

पुणे : रविवार, 18 ऑक्टोबर रोजी आयोजित उद्यमी बाजारात पुणे हे सर्वाधिक उद्योजकांचा सहभाग असलेले शहर ठरले. बाणेर येथील एमराल्ड मल्टिपर्पज हॉलमध्ये सकाळी 10 ते दुपारी 3 या वेळेत आयोजित बाजारात पुण्यातील 103 उद्योजकांनी आपली उत्पादने आणि सेवा सादर केल्या.पुणे, ठाणे, मुंबई, नागपूर आणि नाशिक या 5 शहरांमध्ये सहभागी झालेल्या एकूण 233 उद्योजकांपैकी 103 उद्योजक पुण्यातील होते. पुण्यातील उद्यमी बाजाराला 2,000 व्हिजीटर्सनी भेट दिली. पाचही शहरांतील बाजारांना मिळून एकूण 3,000 व्हिजीटर्स उपस्थित होतेपुण्यातील उद्यमी बाजारात खाद्यपदार्थ, फॅशन आणि हस्तकलेच्या वस्तूंपलीकडे अनेक प्रकारची उत्पादने आणि सेवा पाहायला मिळाल्या. येथे मिलेटपासून तयार केलेले आरोग्यदायी खाद्यपदार्थ, प्रक्रिया केलेले अन्नपदार्थ आणि कृषी उत्पादने उपलब्ध होती. याशिवाय अभियांत्रिकी व इलेक्ट्रॉनिक उत्पादने, व्हेंडिंग मशीन, सॉफ्टवेअर आणि विविध व्यावसायिक सेवांचेही प्रदर्शन करण्यात आले.

अस्पायर फाउंडेशन नाशिकचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार भागवत मसने यांना बहाल

अंबाजोगाई - अस्पायर फाउंडेशन नाशिक यांच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने येथील सुप्रसिद्ध कवि तथा वात्रटीकाकार भागवत मसने यांना विविध मान्यवरांच्या हस्ते वितरित करण्यात आला. संजीवनी बँक्वेट ग्रीन लॉन्स नाशिक या ठिकाणी एस्पायर फाउंडेशन आयोजित राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार सन्मान सोहळा संपन्न झाला. भागवत मसने यांना नाशिक महानगरपालिकेचे शिक्षण सभापती शरद मोरे , नगरसेवक गायधने, सामाजिक कार्यकर्ते उद्धव निमसे, शरद शिंदे (राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष) तसेच एस्पायर फाउंडेशनचे सचिव शिवाजी अमरे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

श्री योगेश्वरी नूतन विद्यालयाचे सहशिक्षक भागवत मसने यांना नुकतेच बारामती येथील शैक्षणिक तथा सामाजिक संस्थेकडून आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. मसने हे मागील तीस वर्षे अध्यापनाच्या कार्यासोबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून सर्वार्थाने घडवत आहेत. स्वलिखित विविध एकांकिका, वक्तृत्व वादविवाद स्पर्धा , पथनाट्य, समूहगीते, पोवाडे आदी कला प्रकारात विद्यार्थ्यांना त्यांनी बहुमोल मार्गदर्शन करून त्यांचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासोबतच विविध शैक्षणिक संस्था, महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन, एन एस.एस. शिबिरे, पदवीप्रदान कार्यक्रम, निरोप समारंभ आदी कार्यक्रमातून सामाजिक व राजकीय व्यंगाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना व समाजाला मार्गदर्शन करत समाजजागृती करण्यात मोलाचा वाटा उचलला आहे.

राजकीय वात्रटिका व सामाजिक वात्रटिका लिहून मिश्किल पद्धतीने सादर करून प्रेक्षकांना हसवत हसवत प्रश्नांची जाणीव करून देत श्रोत्यांची मने जिंकण्यात यशस्वी झाले आहेत. बालविवाह, प्रौढ साक्षरता, सेवा हमी कायदा, पर्यावरण, शेतकऱ्यांचे प्रश्न,आदी सामाजिक प्रश्नांवर विविध पथनाट्य, एकांकिका स्वतः लिहून विद्यार्थ्यां मार्फत स्वतः दिग्दर्शन करून सादर करून घेतल्या आहेत. त्यांनी आकाशवाणी बीड येथे देखील एकांकिका सादर करत समाजप्रबोधन केले आहे. नुकताच त्यांचा आकाशवाणी बीड येथे कवितांचा कार्यक्रम रेकॉर्ड करण्यात आला असून तो येत्या काही दिवसात तो प्रसारित देखील होणार आहे. या अगोदर त्यांना बीड, कोल्हापूर, पुणे, बारामती आदी ठिकाणाहून आदर्श शिक्षक तसेच उत्कृष्ट साहित्यिक या पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे. भागवत मसने यांना मिळालेल्या या सन्मानाबद्दल श्री योगेश्वरी शिक्षण संस्था तसेच अंबाजोगाई शहरातील अनेक सामाजिक, शैक्षणिक तथा साहित्य क्षेत्राकडून अभिनंदन होऊन शुभेच्छा दिल्या जात आहेत.

दुष्काळी परिस्थितीत एकही बालक व माता पोषण आहारापासून वंचित राहू नये; जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे निर्देश

बीड, दि.21 (जिमाका): जिल्ह्यातील संभाव्य दुष्काळजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर लहान बालके, गरोदर महिला आणि स्तनदा मातांचे आरोग्य अबाधित राहावे, यासाठी प्रशासनाने सतर्क राहावे. जिल्ह्यातील एकही पात्र लाभार्थी पूरक पोषण आहारापासून वंचित राहू नये, याबाबत विशेष दक्षता घेण्याचे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज दिले. जिल्हा परिषदेच्या महिला व बाल विकास विभागाच्या जिल्हास्तरीय पोषण आहार संनियंत्रण समितीची आढावा बैठक आज जिल्हाधिकारी जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली, त्यावेळी ते बोलत होते.

खरीप हंगामातील पावसाची तूट व प्रतिकूल परिस्थितीमुळे शासनाने जाहीर केलेल्या दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने, ग्रामीण व टंचाईग्रस्त भागातील संवेदनशील घटकांवर कोणताही विपरीत परिणाम होऊ नये, यासाठी एकात्मिक बाल विकास सेवा योजना (ICDS) प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना शासनाने दिल्या आहेत. या पार्श्वभूमीवर झालेल्या बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील पोषण आहार पुरवठा, अन्नधान्य साठा, पिण्याचे पाणी आणि इंधनाच्या उपलब्धतेचा सविस्तर आढावा घेतला.

जिल्ह्यातील अंगणवाडी केंद्रांमार्फत सध्या ३ ते ६ वर्षे वयोगटातील ५९ हजारांहून अधिक बालकांना गरम ताजा आहार (HCM) दिला जात आहे. तसेच, ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील बालके, तीव्र कमी वजनाची बालके आणि गरोदर व स्तनदा माता अशा एकूण सुमारे ८१ हजार लाभार्थ्यांना घरपोच पोषण आहार (THR) पुरविला जात असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. ग्रामीण भागासह बीड पूर्व व पश्चिम या नागरी प्रकल्पांमधील अंगणवाड्यांमध्येही महिला बचत गट व सेविकांमार्फत नियमितपणे सकाळचा नाश्ता व दुपारचा पौष्टिक आहार दिला.

शांतीब्रम्ह सद्गुरु श्रीधर (नाना) महाराज यांच्या तृतीय पुण्यस्मरणा निमित्त अखंड हरीनाम सप्ताह ह. भ. प. विवेक महाराज दळवे यांच्या भागवत कथेचे आयोजन

केज /प्रतिनीधी : श्रीराम मंदिर समाधीमठ संस्थान उत्रेश्वर पिंपरी ता. केज येथे शांतीब्रम्ह सद्गुरू श्रीधर (नाना) महाराज यांच्या तृतीय पुण्यस्मरणा निमित्त ह. भ. प. पुरुषोत्तम महाराज पिंपरीकर यांच्या मार्गदर्शनाखाली दि. 25/10/2026 वार रविवार ते 01/11/2026 वार रविवार पर्यंत अखंड हरीनाम सप्ताह व ह. भ. प. विवेक महाराज दळवे यांच्या भागवत कथेचे नियोजन केले असुन भागवत कथेस गायन साथ ह. भ. प. आबा महाराज मेहरकर व ह. भ. प रवि महाराज गायकवाड करतील, कथेस तबला साथ ह. भ. प. सुनील महाराज गालफाडे करणार असुन हरमोनियम साथ ह. भ. प. यादव साहेब व ह. भ. प

प. दादा मुळे करतील. सप्ताहाचे कलश पुजन ह. भ. प. श्री नारायण भाऊ महाराज पिंपरीकर, ह. भ. प. सुधाकर महाराज इंजेगावकर, समस्त ग्रामस्थ मंडळी सावंतवाडी ता. केज, श्री महेश चंदनशिव चेअरमन व ह. भ. प. ज्ञानेश्वर माऊली पावर यांचे हस्ते होणार आहे. तसेच टाळ विणा पुजन श्री मच्छिन्द्र महाराज पुरी, श्री चिंतामन खराडे, श्री. भाऊसाहेब मोकाशी, श्री अनंत मोकाशी, श्री परमेश्वर घोरपडे व उपस्थित भाविकभक्त यांचे हस्ते होणार आहे. या सप्ताहानिमित्त पहाटे 4 ते 6 काकडा आरती, 7 ते 10:30 विष्णुसहस्त्रनाम,ज्ञानेश्वरी

पारायण,10:30 ते 12:30 गाथा भजन, 12:30 ते 2 भावार्थ रामायण, 2 ते 5 भागवत कथा, 5 ते 6 हरीपाठ व रात्री 8:30 ते 10:30 हरीकिर्तन होणार आहे. दि. 25/10/2026 रोजी ह. भ. प. गणेश महाराज लटपटे परळीकर, दि 26/10/2026 ह. भ.प. मंगेश महाराज डाबीकर, दि. 27/10/2026 ह. भ. प. विठ्ठल महाराज उखळीकर, दि. 28/10/2026 ह. भ. प.बाबासाहेब महाराज मुंडे वडवणी, दि.29/10/2026 ह. भ. प. महंत पांडुरंग महाराज दि. 30/10/2026 ह. भ. प. महंत भगवान महाराज पुरी वरपगावकर, दि. 31/10/2026

ह. भ. प. विलास महाराज पिंगळे यांची हरिकीर्तन होणार आहे.

बोबडेवाडी ग्रामपंचायतीच्या कारभाराची माहिती द्या!

सन 2021 पासूनच्या विकासकामांचा हिशोब मागितला; संतोष क्षिरसागर यांचा गटविकास अधिकाऱ्यांकडे अर्ज

केज | प्रतिनिधी

केज तालुक्यातील बोबडेवाडी ग्रामपंचायतीच्या सन २०२१ पासून आजपर्यंतच्या प्रशासकीय कामकाजाची आणि विविध विकासकामांची सविस्तर माहिती मिळावी, अशी मागणी संतोष दिलीप क्षिरसागर यांनी पंचायत समिती केजचे गटविकास अधिकारी यांच्याकडे लेखी अर्जाद्वारे केली आहे. ग्रामपंचायतीच्या मासिक बैठका, ग्रामसभांचे इतिवृत्त, विकासकामांचे आदेश, खर्चाचा तपशील तसेच विविध योजनांमधून प्राप्त झालेल्या निधीच्या विनियोगाची माहिती देण्याची मागणी या अर्जात करण्यात आली आहे.

दिनांक २३ ऑक्टोबर २०२६ रोजी सादर केलेल्या या अर्जामध्ये सन २०२१ पासून आजपर्यंतच्या कालावधीतील ग्रामपंचायतीच्या कामकाजाशी संबंधित सात प्रमुख मुद्द्यांवर माहिती मागविण्यात आली आहे. संबंधित माहिती सात दिवसांच्या आत उपलब्ध करून द्यावी, अशी विनंतीही अर्जदाराने केली आहे.

मासिक बैठक आणि ग्रामसभांच्या नोंदींची मागणी

ग्रामपंचायतीच्या मासिक बैठकांसाठी काढण्यात आलेल्या नोटिसांच्या नोंदवहीच्या प्रमाणित प्रती, मासिक बैठकींचे संपूर्ण इतिवृत्त तसेच ग्रामसभांच्या कामकाजाच्या नोंदींच्या प्रमाणित प्रती देण्यात याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. ग्रामपंचायतीच्या निर्णयप्रक्रियेची माहिती मिळावी आणि विविध विषयांवर घेतलेल्या निर्णयांचा तपशील समोर यावा, हा या मागणीमागील उद्देश असल्याचे अर्जातून स्पष्ट होते.

ग्रामपंचायत कार्यालयासाठी विविध निधी व योजनांमधून आलेल्या रकमेचा वापर कोणत्या कामांसाठी करण्यात आला, याची माहिती अर्जदाराने मागितली आहे.

वायरमन गावात फिरकेना; चार दिवसांपासून ट्रान्सफॉर्मर जळालेलाच!

तभा वृत्तसेवा

कन्नड :दि.२३ ऑक्टोबर - तालुक्यातील जेहूर येथील बोलठाण मळा परिसरातील गट क्रमांक २४५ मधील ट्रान्सफॉर्मर गेल्या चार दिवसांपासून जळालेल्या अवस्थेत पडून आहे. शेतातील वीजपुरवठा खंडित झाल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. विशेष म्हणजे, वायरमन गावात येत नसल्याबाबत महिनाभरापूर्वीच ऑनलाइन तक्रार करण्यात आली होती. त्यानंतरही परिस्थितीत बदल न झाल्याने महावितरणच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

बोलठाण मळा परिसरातील ट्रान्सफॉर्मर जळाल्याने शेतीच्या वीजपुरवठ्यावर परिणाम झाला आहे. आधीच पावसाअभावी शेतीसमोर संकट उभे असताना वीजपुरवठा बंद पडल्याने सिंचनासह शेतीच्या कामांवर परिणाम होण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. ट्रान्सफॉर्मर जळाल्यानंतर चार दिवस उलटूनही दुरुस्ती न झाल्याने शेतकऱ्यांचा संताप वाढत आहे.वायरमन निलेश थोरात गावात येत नसल्याची तक्रार शेतकऱ्यांनी महिनाभरापूर्वी ऑनलाइन केली होती. मात्र, त्यानंतरही प्रश्न सुटला नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. आता ट्रान्सफॉर्मर जळाल्याने वीजपुरवठा बंद असून, दुरुस्ती कधी होणार, असा सवाल उपस्थित होत आहे.

या प्रकरणी गणेश पवार, सचिन शिंदे, कचरू सावंत आणि गणेश आसाराम पवार यांनी २१ ऑक्टोबर रोजी कार्यकारी अभियंत्यांकडे लेखी तक्रार दिली. जळालेल्या ट्रान्सफॉर्मरची तातडीने दुरुस्ती करून शेतीचा वीजपुरवठा पूर्ववत करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

शेतकऱ्यांचा सवाल; महावितरण दखल कधी घेणार?

शेतीसाठी वीज महत्त्वाची असताना ट्रान्सफॉर्मर दुरुस्तीसाठी इतका विलंब का होत आहे? महिनाभरापूर्वी तक्रार करूनही प्रश्न सुटत नसेल, तर शेतकऱ्यांनी दाद मागायची कुणाकडे, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

आता वरिष्ठ अधिकारी या प्रकरणात हस्तक्षेप करून तातडीने दुरुस्ती करतात का आणि शेतकऱ्यांना दिलासा मिळतो का, याकडे बोलठाण मळ्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

अंबाजोगाईत परवान्याशिवाय फटाके विक्रीवर बंदी; नियम मोडल्यास होणार कायदेशीर कारवाई

अंबाजोगाई : अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांनी शहरातील सर्व दुकानदार आणि व्यापाऱ्यांना परवान्याशिवाय फटाके विक्री न करण्याचे अत्यंत महत्त्वाचे आवाहन केले आहे. सणासुदीच्या काळात गर्दीच्या ठिकाणी तसेच नियमित दुकानांमध्ये वैध परवान्याशिवाय फटाक्यांची विक्री किंवा साठवणूक करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.

नियमांचे काटेकोर पालन आवश्यक

किराणा, कापड किंवा जनरल स्टोअर्ससारख्या नियमित दुकानांमध्ये फटाके विकू नयेत. फटाक्यांची विक्री केवळ परवान्यात नमूद केलेल्या निर्धारित जागेतच करावी आणि रस्ते, पदपथ किंवा सार्वजनिक जागांवर अनधिकृत स्टॉल लावू नयेत. सणासुदीच्या काळात तात्पुरती विक्री करायची असल्यास त्यासाठीही स्वतंत्र वैध परवाना घेणे सक्तीचे करण्यात आले आहे.

अग्निसुरक्षा आणि कारवाईचा इशारा

सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून विक्रेत्यांनी अग्निशमन व्यवस्था ठेवणे आणि सर्व नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. या सूचनांचे उल्लंघन केल्यास 'एक्स्प्लोझिव्ह्ज ॲक्ट, १८८४' चे कलम ९ बी आणि 'एक्स्प्लोझिव्ह्ज रुल्स, २००८' च्या तरतुदींनुसार कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा पोलिसांनी दिला आहे. नागरिकांची सुरक्षितता हीच पोलिसांची प्राथमिकता असल्याचे यातून स्पष्ट करण्यात आले आहे.

वनस्पतीशास्त्रात अंजली सावळकर-इंगळे यांना पीएच.डी.

अंबाजोगाई : येथील कन्या डॉ.अंजली शिवाजीराव सावळकर-इंगळे यांनी वनस्पतीशास्त्र विषयात पीएच.डी. संपादन करून उल्लेखनीय यश मिळविले आहे. त्यांच्या या यशामुळे अंबाजोगाईच्या शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

डॉ.अंजली सावळकर यांचे शालेय व महाविद्यालयीन शिक्षण अंबाजोगाई येथील श्री योगेश्वरी शिक्षण संस्थेत झाले. शिक्षणातील सातत्य, जिद्द आणि संशोधनाची आवड यांच्या बळावर त्यांनी पुढील शैक्षणिक वाटचाल यशस्वीपणे पूर्ण केली. त्यांनी राष्ट्रीय स्तरावरील गेट परीक्षा उत्तीर्ण केल्यानंतर एम.एस्सी.चे पदव्युत्तर शिक्षण सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात पूर्ण केले. त्यानंतर वनस्पतीशास्त्र विषयात सखोल संशोधन करून पीएच.डी. पदवी संपादन केली. या संशोधन कार्यासाठी त्यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील संशोधन मार्गदर्शक प्रा.डॉ.आर. एन.कदम (महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर, जि.लातूर) यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.अंजली यांनी संशोधनाची प्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण केली. आपल्या या यशाचे श्रेय त्यांनी आई सौ.मंगल, वडील डॉ.शिवाजीराव सावळकर तसेच संशोधन मार्गदर्शकांना दिले आहे. कुटुंबीयांचे प्रोत्साहन, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि स्वतःची मेहनत यांच्या जोरावर त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण टप्पा गाठला. डॉ.अंजली सावळकर-इंगळे यांच्या या यशाबद्दल माजी प्राचार्य डॉ.दामोदर थोरात यांच्यासह कुटुंबीय, मित्रपरिवार आणि हितचिंतकांनी त्यांचे अभिनंदन केले असून, त्यांच्या पुढील शैक्षणिक व संशोधनात्मक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

फर्दापूर येथे डिजे व बँन्ड ला फाटा देत वारकरी संप्रदायाचा विविध कलांनी दुर्गा देवी चे विसर्जन

तभा वृत्तसेवा

फर्दापूर दि .23 : फर्दापूर : फर्दापूर येथे नवयुवक दुर्गा मंडळ यांनी यंदा ना बँन्ड ना डिजे दुर्गा देवी विसर्जन मिरवणुकीत वाढली शोभा वारकरी संप्रदायाचा चिमुकल्या मुलांनी भजनातून विविध कला सादर करुन उपस्थितांची मन जिंकले फर्दापूर येथे यंदा नवयुवक दुर्गा मंडळ यांनी दुर्गा देवी विसर्जन मिरवणुकीत माऊली वारकरी शिक्षण संस्था निल्लोड अनाथाश्रम या वारकरी संप्रदायाचा मुलांना आमंत्रित करण्यात आले होते परंतु या अनाथ मुलांना फर्दापूर वासियांचे मन जिंकून घेतले कारण की हि मुलं अवघ्या अकरा ते बारा वर्षांची एकावन्न मुलं होती यांनी प्रत्येक चौकात प्रत्येक अभंगातून समाजाला जुन्या आठवणी ताज्या करून दाखविण्यात आले त्यामध्ये संत ज्ञानेश्वर महाराज यांनी भिंत चालवून दाखविली होती त्याप्रकारे यांनी सर्व कला करून दाखविण्यात आल्या तसेच फर्दापूर गावातील लहान मुलांचा हनुमान चालीसा गृप ने मुला मुलींनी तलवार,काठी, लेझीम, तसेच मुलींनी दुर्गा अवतार रुपी सजीव देखावा तयार करण्यात आला होता यावेळी देवीची मिरवणूक प्रभू श्री राम मंदिर येथून निघून गावातून टाळ मृदंग वीणा वाजवित मिरवणूक शांततेत पार पडली

स्तन कर्करोगाचे निदान व उपचार वेळीच करून घ्या

संभाजीनगर, २३ ऑक्टोबर, २०२६: मॅनकाइंड फार्माने स्तन कर्करोग जागरूकता महिन्याचे औचित्य साधत, आपल्या 'पिंक ऑक्टोबर' मोहिमेच्या माध्यमातून स्तन कर्करोगाविषयी जागरूकता, लवकरात लवकर निदान आणि वेळेवर उपचारांच्या महत्त्वावर प्रकाश टाकला आहे. हा उपक्रम कंपनीच्या '#१ मिलियन लाइव्ह्ज' या प्रवासाचाच एक भाग आहे, ज्याचा उद्देश कर्करोगाविषयीची जागरूकता अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवणे आणि नागरिकांना त्यांच्या आरोग्यासाठी सक्रिय पावले उचलण्यास प्रोत्साहित करणे हा आहे. स्तनांच्या बाबतीत काहीही असामान्य जाणवत असल्यास लवकरात लवकर वैद्यकीय सल्ला घेण्यास महिलांना प्रोत्साहित करण्यासाठी आणि या आजाराविषयीची त्यांची समज वाढवण्यासाठी जागरूकता अत्यंत महत्त्वाची ठरते. स्तनात गाठ येणे किंवा त्वचा जाड होणे, स्तनाचा आकार किंवा स्वरूपात बदल होणे, त्वचेवर बदल दिसणे, स्तनाग्रांमध्ये बदल होणे किंवा त्यातून असामान्य स्त्राव येणे, ही स्तनाच्या कर्करोगाची आजाराची संभाव्य लक्षणे असू शकतात. हे बदल म्हणजे कर्करोगच आहे असे नाही, तरीही त्यांची डॉक्टरांकडून वैद्यकीय तपासणी करून घेणे गरजेचे आहे. व्यक्तीचे वय आणि आजाराचा धोका लक्षात घेऊन केलेल्या क्लिनिकल तपासण्या आणि मॅमोग्राफीमुळे हा आजार सुरुवातीच्या टप्प्यात ओळखण्यास मोठी मदत होते.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

टीजेएसबी सहकारी बँक तर्फे अत्याधुनिक 'डिजिटल अकाउंट ओपनिंग' सुविधेचा शुभारंभ!

ठाणे : देशातील चौथ्या क्रमांकाची बहुराज्यीय नागरी सहकारी बँक असलेल्या टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड ने तंत्रज्ञान क्षेत्रात आणखी एक मोठे पाऊल टाकत दिनांक 17 ऑक्टोबर २०२६ रोजी पासून आपल्या ग्राहकांसाठी डिजिटल अकाउंट ओपनिंग या नावीन्यपूर्ण सुविधेची सुरुवात केल्याची जाहीर केले आहे या अत्याधुनिक सुविधेमुळे नवीन ग्राहकांना आता बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये न जाता केवळ काही मिनिटात आपले बचत खाते सुरू करता येणार आहे विशेष म्हणजे या डिजिटल सुविधेचा शुभारंभ झी मराठी वाहिनीवरील अत्यंत लोकप्रिय संगीत कार्यक्रम सारेगमप च्या मंचावर करण्यात आला आहे बँकेने आपल्या डिजिटल परिवर्तनाचा भाग म्हणून ही सुविधा विकसित केली असून याद्वारे संपूर्ण प्रक्रिया पेपरलेस सुरक्षित आणि जलद करण्यात आली आहे ग्राहकांनी त्यांच्या सोयीनुसार मोबाईल किंवा लॅपटॉप द्वारे व्हिडिओ केवायसी प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे व खाते उघडता येऊ शकते या शुभारंभ प्रसंगी बोलताना.टीजेएसबी चे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री निखिल आरेकर म्हणाले बँकेने डिजिटल आणि तंत्रज्ञान क्षेत्रात मोठी गुंतवणूक केली असून ही नवी सुरुवात म्हणजे टीजेएसबी च्या एका नव्या परिवर्तनाची नांदी आहे तरी सर्व ग्राहकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा.

'जेके नॅचरल्स ऑरा'सह सस्टेनेबल पेंट्स क्षेत्रात पदार्पण

छत्रपती संभाजीनगर : जेके मॅक्स पेंट्स या जेके सिमेंट लिमिटेडचा समृद्ध वारसा आणि तज्ज्ञतेचा आधार असलेल्या कंपनीने आपला नवीन सस्टेनेबल पेंट्स ब्रँड 'जेके नॅचरल्स' लॉंच केला आहे, तसेच जेके नॅचरल्स ऑरा हे ब्रँडचे पहिले उत्पादन सादर केले आहे. भारताचा पहिला नेचर लव्हर्स पेंट म्हणून सादर करण्यात आलेला हा ब्रँड घराचे सुशोभीकरण आणि दैनंदिन जीवनातील सजग पर्यावरणपूरक दृष्टिकोन यांचा सुरेख मेळ साधतो. आधुनिक घरांसाठी डिझाइन केलेले जेके नॅचरल्स ऑरा लक्झरी इंटिरियर इमल्शनमध्ये एअर-प्युरिफिकेशन तंत्रज्ञान आणि प्रीमियम फिनिशसह ४० टक्क्यांहून अधिक पर्यावरणपूरक घटक आहेत, ज्यामध्ये १० टक्क्यांहून अधिक बायो-आधारित इमल्शनचा समावेश आहे.डेन्मार्क येथील क्लीनटेक कंपनी आणि रिसायकलिंग क्षेत्रातील जागतिक आघाडीची कंपनी शार्क सोल्युशन्ससोबत सहयोगाने डिझाइन केलेल्या जेके नॅचरल्स ऑराच्या फॉर्म्युलेशनमध्ये मुदत संपलेल्या लॅमिनेटेड काचेपासून मिळवलेल्या रिसायकल केलेल्या पीव्हीबीचा (पॉलीविनाइल ब्युटिरल) समावेश करण्यात आला आहे.

हिंदुस्तान झिंकने विक्रमी निव्वळ नफा नोंदवला

छत्रपती संभाजीनगर - जगातील सर्वात मोठी एकात्मिक जस्त (झिंक) उत्पादक आणि जागतिक स्तरावर चांदीच्या पहिल्या 10 उत्पादकांपैकी एक असलेल्या हिंदुस्तान झिंक लिमिटे'ने आर्थिक वर्ष 2027 च्या दुसऱ्या तिमाहीत विक्रमी कामगिरी नोंदवली आहे. कंपनीने 15,093 कोटी रुपयांचा आतापर्यंतचा सर्वाधिक त्रैमासिक महसूल ऑपरेशन्सद्वारे मिळवला आहे, जो मागील वर्षाच्या याच कालावधीच्या तुलनेत 77% अधिक आहे. कंपनीचा त्रैमासिक ईबीआयटीडीए 9,285 कोटी रुपयांच्या उच्चांकी पातळीवर पोहोचला असून त्यात वार्षिक आधारावर 108% वाढ झाली आहे.

शॉपर्स स्टॉपनेअधिक उत्साहाची भर केली

छत्रपती संभजीनगर: दिवाळी म्हणजे रोषणाई, एकत्र येणे आणि प्रत्येक क्षण खास बनवणाऱ्या माणसांचा उत्सव. दिवाळीमध्ये विचारपूर्वक निवडलेली भेटवस्तू प्रेम, कृतज्ञता आणि आदर व्यक्त करण्याचे माध्यम बनते. यंदा दिवाळीत शॉपर्स स्टॉप या भारतातील प्रीमियम फॅशन, ब्युटी आणि भेटवस्तूंच्या आघाडीच्या गंतव्याने 'गिफ्ट्स ऑफ लव्ह'च्या माध्यमातून भेटवस्तू देण्याच्या आनंदाला अधिक उत्साहवर्धक केले आहे. हे खास सणासुदीच्या भेटवस्तूंचे कलेक्शन आहे, जे या सणाला अर्थपूर्ण बनवणाऱ्या अनेक नात्यांना साजरे करते.दिवाळीला कुटुंब, मित्र आणि प्रियजन येतात. 'गिफ्ट्स ऑफ लव्ह' सौंदर्य प्रसाधने, फ्रॅग्रन्सेस, वॉचेस्, हँडबॅग्ज, सनग्लासेस, फूटवेअर आणि ॲक्सेसरीजचे विस्तृत कलेक्शन एकाच छताखाली उपलब्ध करून देते, ज्यामुळे ग्राहकांना त्यांच्या गिफ्टिंग लिस्टवरील प्रत्येकासाठी काहीतरी खास शोधणे अधिक सोपे होते.

इंद्रियाकडून 'फेस्टिव्हल ऑफ लव्ह' लाँच

मुंबई: दरवर्षी आपण आपल्या आवडत्या व्यक्तींसोबत जल्लोषात दिवाळी सण साजरा करतो. यादरम्यान घराची सजावट, धार्मिक विधींची तयारी ते भेटवस्तूंची निवड करणे आणि कुटुंब व मित्रांचे स्वागत करण्यापर्यंत प्रत्येक छोटी गोष्ट महत्त्वाची ठरते. तरीही, या उत्सवाच्या गडबडीत, आपल्या अगदी जवळच्या व्यक्तींबद्दल साधे आणि मनापासून प्रेम व्यक्त करणे अनेकदा मागे पडते. 'आम्ही मध्ये आपण' ('Us in We') शोधण्याच्या इंद्रियाच्या तत्त्वज्ञानावर आधारित फेस्टिव्हल ऑफ लव्ह उपक्रम प्रत्येक उत्सवामध्ये नाती आणि आपुलकीचे बंध साजरे करतो. यंदा दिवाळीत, आदित्य बिर्ला ज्वेलरी ब्रँड इंद्रिया अदिती राव हैदरी आणि सिद्धार्थ यांचा सहभाग असलेल्या आपल्या नवीन मोहिमेच्या माध्यमातून हाच विचार प्रत्यक्षात साकारत आहे.

सायबर सुरक्षा जागरुकता मोहिमे अंतर्गत केले 1.8 लाख नागरिकांना शिक्षित

मुंबई-ग्राहकांमध्ये जागरुकता निर्माण करण्याबरोबरच सायबर गुन्ह्यांपासून त्यांचे रक्षण करण्याच्या त्यांच्या योजनेचा एक भाग तसेच 'सायबर फ्रॉड सुरक्षा' या उपक्रमाअंतर्गत एचडीएफसी बँके तर्फे संपूर्ण भारतात ८,८०० हून अधिक जागरुकता कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळा जुलै – ऑक्टोबर २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आल्या होत्या व त्यांचा लाभ हा देशभरांतील १.८ लाख नागरिकांनी घेतला. या मोहिमेचा उद्देश हा ग्राहकांना आणि सर्वसामान्य नागरिकांना आधुनिक सायबर गुन्ह्यांच्या बाबत जागरुक करण्यासह सुरक्षित डिजिटल बँकिंगच्या पध्दतीं विषयी माहिती देऊन सुरक्षित डिजिटल पध्दतींची निर्मिती करण्यात योगदान देणे हा आहे.

शरणापुरच्या साईबाबा मंदिराचा 15 वा वर्धापन दिन साजरा

पालकमंत्री संजय शिरसाट, परमानंदगिरीजी महाराज यांची उपस्थिती; महाप्रसादाचा हजारो भाविकांनी घेतला लाभ

तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर : 'मिनी शिर्डी' म्हणून ख्याती असलेल्या शरणापुर येथील श्री साईबाबा मंदिराचा १५ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. या सोहळ्यास महाराष्ट्राचे सामाजिक न्यायमंत्री तथा पालकमंत्री संजय शिरसाट, श्री श्री १००८ परमानंदगिरीजी महाराज आणि प्रसिद्ध वास्तुतज्ज्ञ व ज्योतिर्विद आनंद पिंपळकर गुरुजी यांची प्रमुख उपस्थिती होती.

वर्धापन दिनानिमित्त पहाटे श्री साईबाबांचा महाअभिषेक व विधिवत पूजाविधी मंदिराचे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र आदमाने पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ब्राह्मणवृंद आणि साईभक्त उपस्थित होते. त्यानंतर सकाळी ११ वाजता मुख्य

कार्यक्रमाला सुरुवात झाली.

पालकमंत्री संजय शिरसाट यांनी मंदिराचे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र आदमाने पाटील यांना वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच उपस्थितांना मार्गदर्शन केले. परमानंदगिरीजी महाराज यांनी मंदिर संस्थानच्या कार्याचे कौतुक केले. आनंद पिंपळकर गुरुजी यांनी गेल्या १५ वर्षांपासून मंदिराच्या माध्यमातून सुरू असलेल्या सामाजिक कार्याची प्रशंसा केली. यावेळी त्यांनी वास्तुशास्त्र व ज्योतिषशास्त्राविषयी मार्गदर्शन केले. उपस्थित नागरिकांच्या प्रश्नांनाही उत्तरे दिली.

संस्थापक अध्यक्ष राजेंद्र आदमाने पाटील यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून मंदिराच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. तसेच मंदिरात सुरू असलेल्या आणि भविष्यात प्रस्तावित असलेल्या विकासकामांचा आढावा मांडला. कार्यक्रमानंतर भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. अनेक भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

या सोहळ्यास माजी खासदार चंद्रकांत खैरे, माजी महापौर नंदकुमार घोडेले, त्र्यंबक तुपे, अशोक पटवर्धन, केंद्रे साहेब, भांगे काका, किशोर थोरात, अनिल चोरडिया, अर्जुन आदमाने, वाडकर आप्पा, साईदत्त सामानगावकर, जोंधळे, खन्ना, रत्नकुमार साबळे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कार्याध्यक्ष विशाल आदमाने पाटील, बाळासाहेब शिंदे, बाबा पाटील, सांडू पवार, कृष्णा आदमाने, बाळू जाधव, प्रतीक पखाले, गोकुळ सुरभाइये, रितेश गवळी यांच्यासह साईभक्त मित्र मंडळ व साई पालखी समितीच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

सोयगाव तालुक्यात डी जे मुक्त मिरवणुका; 65 मंडळांचे शांततेत विसर्जन

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२३ ऑक्टोबर : गणेशोत्सव पाठोपाठ सोयगाव सह हद्दीतील ५२ गावांमध्ये डी जे मुक्त दुर्गा उत्सव साजरा करण्यात आला तालुक्यात एकही ठिकाणी डी जे वाजला नसून केवळ ढोल ताशांच्या गजरात बुधवारी (दि.२१) दुर्गा उत्सव शांततेत साजरा झाला यंदा मात्र गणेशोत्सव आणि दूरगोत्सव डी जे मुक्त साजरा झाला आहे.

सोयगाव शहरात १८ दुर्गा मंडळांनी पारंपरिक वाद्य आणि ढोल ताशांच्या गजरात मिरवणुका सुरू केल्या रात्री दहा वाजेपर्यंत शहरातील सर्व मिरवणुका आटोपत्या होऊन शहराजवळील गवळण नाल्यात विसर्जन करण्यात आले. गवळणी नाल्यावर पोलीस आणि नगर पंचायत प्रशासनाने विसर्जन व्यवस्था केली होती.शहरात १८ मंडळांनी तर हद्दीत एकूण६५ मंडळांनी यंदा पोलीसांच्या आवाहनाला प्रतिसाद देत डी जे मुक्त उत्सव साजरा केला आहे दरम्यान मिरवणुका दरम्यान एस आर पी एफ ची एक तुकडी व सोयगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली चार अधिकारी,२३ कर्मचारी आणि चाळीस होमगार्ड असा बंदोबस्त तैनात होता.डी जे मुक्त दुर्गा विसर्जन झाल्याने यंदा पहिल्यांदाच सोयगावात नागरिकांना सुटकेचा श्वास घेतला होता

सोयगाव येथील संत ज्ञानेश्वर महाविद्यालय येथील विद्यार्थी वैभव शिंदे तिघी स्पर्धेत यश

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२३ ऑक्टोबर : संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथील 12 वी MCVC विद्यार्थी वैभव शिंदे यांनी आज क्रीडा संकुल परभणी येथे झालेल्या विभागस्तरीय मैदानी स्पर्धेत 3000 M, 1500 M आणि क्रॉस कंट्री या तिघी स्पर्धेत यश मिळवला आणि वैभव ची राज्यस्तरीय स्पर्धेत निवड झाली आहे त्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार,उपराचार्य डॉ.रावसाहेब बारोटे तसेच कनिष्ठ विभाग प्रमुख डॉ.उल्हास पाटील यांनी अभिनंदन केले. तसेच त्याला मार्गदर्शन डॉ. निलेश गाडेकर प्रा.शेख तौफिक सर यांनी केले.महाविद्यालयातील शिक्षक वृंद डॉ.एस.एल.पाटील, प्रा. रवींद्र जाधव, प्रा.दिपक लिंबे, प्रा.शंकर कानडे, प्रा.शेख तौफिक,प्रा. विनोद चव्हाण, प्रा.स्वाती देशमुख, प्रा.बी.ए. पाटील, प्रा.अनिल मानकर, प्रा.बुटुले , प्रा.योगेश काळे, प्रा.अश्विनी काळे, प्रा.दीपक सर व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

सोयगावच्या उर्दू जि. प.शाळेत मूलभूत सुविधांचा अभाव; स्वतंत्र इमारत, स्वच्छतागृह व पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी

सोयगाव, दि.२१ (प्रतिनिधी)

सोयगाव येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक उर्दू शाळेत स्वतंत्र इमारत, स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी यांसह इतर आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी शाळा व्यवस्थापन समितीने केली आहे. यासंदर्भात पंचायत समितीचे गटविकास अधिकारी शिवाजी यमुलवाड यांना लेखी निवेदन देण्यात आले.

निवेदनानुसार, शाळेत विद्यार्थ्यांची संख्या अधिक असून, पुरेशा स्वच्छतागृहांची व्यवस्था नसल्याने विद्यार्थ्यांना अडचणींचा

सामना करावा लागत आहे. तसेच, मूलभूत सुविधांच्या अभावामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उपक्रमांवरही परिणाम होत आहे.

या समस्यांबाबत यापूर्वीही चर्चा करण्यात आली असून, विद्यार्थ्यांच्या हितासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. प्रशासनाने या मागणीची दखल घेऊन शाळेसाठी स्वतंत्र इमारत, स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी आणि इतर आवश्यक सुविधा तातडीने उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी शाळा व्यवस्थापन समितीने केली आहे. सोयगाव येथील उर्दू शाळेच्या मूलभूत सुविधांसंदर्भात गटविकास अधिकारी शिवाजी यमुलवाड यांना निवेदन देताना जुबेर शाह,फिरोज पठाण,अनिस मौलाना,शाकीर शेख आदींच्या निवेदनावर सह्या आहेत.

फुलंब्री येथील अत्याचाराच्या गुन्ह्यातील दोन आरोपींना 24 तासांत अटक

फुलंब्री प्रतिनिधी : पोलीस ठाणे फुलंब्री येथे दि. २०/१०/२०२६ रोजी पीडित महिलेने तिच्यावर झालेल्या अत्याचाराच्या अनुषंगाने दिलेल्या तक्रारीनुसार भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील कलम ६४(१), ६४(२)(ई), ६४(२)(एम), २९६ व ३(५), माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० मधील कलम ६७(अ), ६७ व ६६(ई), तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ मधील कलमांनुसार गुन्हा नोंदविण्यात आला होता.

या प्रकरणाची मा. प्रकाश जाधव, पोलीस अधीक्षक यांनी गंभीर दखल घेत यातील आरोपींना तात्काळ अटक करण्याचे निर्देश दिले होते. गुन्ह्याचे अनुषंगाने यातील आरोपींना पोलिसांनी शिताफीने २४ तासात अटक केली आहे.

यामध्ये *१) रामदास महादू तरटे वय ५४ वर्षे रा. बाबूळगाव तरटे ह.मु. स्वामी विवेकानंदनगर फुलंब्री २) उत्तम भागजी ढोके वय ५४ वर्षे रा. गिरीजानगर फुलंब्री* यांना अटक करण्यात आली असून मा. न्यायालयाने आरोपींना पोलीस कस्टडी रिमांड दिला आहे. या गुन्ह्याचा तपास श्रीमती पूजा नागरे, उपविभागीय पोलीस अधिकारी, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण करीत आहेत.

नमूद कारवाई ही मा. प्रकाश जाधव, पोलीस अधीक्षक, मा. प्रशांत स्वामी, अपर पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली श्रीमती पूजा नागरे, उपविभागीय पोलीस अधिकारी, छ.संभाजीनगर ग्रामीण, श्रीमती सोनाली पाईकराव प्र. पोलीस उप अधीक्षक, श्री. सुग्रीव चाटे, पो.उप.नि. पोलीस अंमलदार अनिल शिंदे, दिनकर पांढरे, कौतिक चव्हाण यांनी केली आहे.

जैन टॅग ग्रुपतर्फे 25 ऑक्टोबरला 'नाद पौर्णिमा' कार्यक्रम

छत्रपती संभाजीनगर : संगीताची मधुरता, ध्यानाची शांती आणि भक्तीचा आनंद अनुभवण्याची संधी रसिकांना 'नाद पौर्णिमा – Healing By Music' या विशेष कार्यक्रमातून मिळणार आहे. जैन टॅग ग्रुपतर्फे रविवार, २५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता वेदांत नगर येथील वेदांत हॉलमध्ये या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, प्रवेश विनामूल्य आहे. शरद पौर्णिमेनिमित्त आयोजित या कार्यक्रमात संगीताच्या माध्यमातून मनःशांती, आत्मजागृती, आंतरिक संतुलन आणि आध्यात्मिक अनुभूतीचा संदेश दिला जाणार आहे. प्रमुख वक्ते अद्वैत डंके हे टेडएक्स वक्ते, संगीतकार व ध्वनी आणि ध्यान साधनेचे अभ्यासक असून, ते मार्गदर्शन करणार आहेत.

प्रकल्प अध्यक्ष म्हणून दीपिका बडजाते, पूजा झांझरी, पूजा सेठी, रीना ठोले व मोनिका चांदीवाल कार्यरत आहेत. अध्यक्ष जयश्री लोहाडे, उपाध्यक्ष उज्ज्वला पाटनी, सचिव पूजा झांझरी, कोषाध्यक्षा सीमा बडजाते यांच्यासह सदस्य परिश्रम घेत आहेत.

गोर-गरीब मुलांना शिक्षण देणे हेच अजिंठा शिक्षण संस्थेचे ध्येय - रंगनाथ काळे

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२३ ऑक्टोबर

अजिंठा शिक्षण संस्था संचालित पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर येथे थोर स्वातंत्र्यसेनानी,महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री,माजी खासदार, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे माजी उपाध्यक्ष तथा अजिंठा शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै.बाबुरावजी काळे ऊर्फ अप्पासाहेब यांच्या स्मृतिदिनानिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमात मान्यवरांनी बाबुरावजी काळे यांच्या मराठवाड्याच्या विकासातील योगदानाला उजाळा दिला

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जालना जिल्ह्याचे माजी कॉंग्रेस अध्यक्ष व छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेचे माजी सदस्य ज्ञानेश्वर भांदरगे होते. प्रमुख पाहुणे म्हणून द्वारकाभाऊ पाथ्रीकर, हरिश्चंद्र लधाने, तुकाराम पाटील, सुभाष चौधरी, विलासचन्द्र काबरा, अजिंठा शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी माजी प्राचार्य अशोक नाईकवाडे, माजी प्राचार्य संजय मून, माजी प्राचार्य डी. बी. चौधरी, गुलशन पवार, प्राचार्य डॉ. पंडित नलावडे, प्राचार्य अन्वरसाब नरेगल, प्राचार्य डॉ. शिरीष पवार, उपप्राचार्य डॉ. रावसाहेब बारोटे,उपप्राचार्य रवी कुमार गोटेड,प्राचार्य डॉ. राजेश यादव, प्राचार्य डॉ. संभाजी वाघमारे,डॉ. एम आर खान, पंकज साबळे, जय सोने आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शिल्पा जिवरग यांनी केले.

प्राचार्य डॉ. पंडित नलावडे यांनी प्रास्ताविकात कार्यक्रमाची भूमिका स्पष्ट केली. बाबुरावजी काळे यांनी सामाजिक, आर्थिक आणि प्रादेशिक विकासासाठी केलेल्या कार्याची माहिती त्यांनी दिली. डॉ. दिलीप बिरुटे यांनी आप्पासाहेबांचा जीवनपट सादर केला. त्यांच्या संघर्षमय जीवनप्रवासातून मराठवाड्याच्या विकासासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांवर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. प्रफुल देवरे यांनी उपस्थित मान्यवर, वक्ते, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे आभार मानले. या कार्यक्रमासाठी पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालय, संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव, स्वर्गीय बाबुरावजी काळे महाविद्यालय, अजिंठा आणि स्वातंत्र्यसेनानी उत्तमरावजी पाटील नर्सिंग कॉलेज, छत्रपती संभाजीनगर येथील प्राध्यापक व यांचे आभार मानले या कार्यक्रमासाठी कर्मचाऱ्यांनी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी अजिंठा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रंगनाथ काळे यांनी अप्पासाहेबांच्या आठवणी सांगून मराठवाड्याच्या प्रगतीसाठी त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा घेतला. सोयगाव येथे अप्पासाहेबांच्या नावाने ग्रंथालय उभारण्यात येईल असे आपल्या मनोगतात सांगितले.गोर-गरीब मुलांना शिक्षण देणे हेच अजिंठा शिक्षण संस्थेचे ध्येय आहे.आणि ते पूर्ण करण्याचे काम आम्ही करत आहोतअसे ते म्हणाले. सर्व वक्त्यांनी अप्पासाहेबांच्या कार्याविषयी सखोल विचार मांडल्याबद्दल त्यांनी त्यांचे आभार मानले.

अध्यक्षीय भाषणात ज्ञानेश्वर भांदरगे यांनी बाबूरावजी काळे यांच्याशी असलेल्या आपल्या आठवणी सांगितल्या. ते म्हणाले की,आप्पासाहेबांनी मला ओळख दिली आणि पुढे जाण्याची संधी दिली.आज मी जे काही यश मिळवले आहे, त्यामागे त्यांचे मार्गदर्शन आणि आशीर्वाद आहेत.त्यांनी मला स्वतःच्या मुलाप्रमाणे प्रेम दिले. बाबुरावजी काळे हे केवळ स्वतः काम करणारे नेते नव्हते, तर इतरांना घडवणारे नेते होते, असे त्यांनी सांगितले.

माजी प्राचार्य डॉ.एजाज शेख 'मराठवाडा मुक्तिसंग्राम व राजकीय क्षेत्रातील योगदान' या विषयावर मार्गदर्शन करताना असे म्हणाले की, बाबुरावजी काळे यांनी विद्यार्थी दशेपासूनच हैदराबाद मुक्तिसंग्रामात सहभाग घेतला. त्यांनी समाजातील विविध घटकांतील लोकांना मदत केली आणि अनेक कार्यकर्त्यांना सोबत घेऊन काम केले.अप्पासाहेबांचे नेतृत्व प्रभावी होते.

केसरी टूर्सला सलग तिसऱ्या वर्षी इंडिया ट्रॅव्हल अवॉर्ड्‌सचा सन्मान!

'बेस्ट इंटरनॅशनल ग्रुप टूर ऑपरेटर' पुरस्काराने गौरव; संचालिका झेलम चौबळ पाटील यांनी स्वीकारला पुरस्कार

नवी दिल्ली, ऑक्टोबर २०२६: केसरी टूर्सला इंडिया ट्रॅव्हल अवॉर्ड्स २०२६ मध्ये 'बेस्ट इंटरनॅशनल ग्रुप टूर ऑपरेटर' या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. सलग तिसऱ्या वर्षी हा सन्मान प्राप्त करत केसरीने आंतरराष्ट्रीय समूह सहलींच्या क्षेत्रातील आपल्या सातत्यपूर्ण कामगिरीची मोहोर उमटविली आहे. केसरी टूर्सच्या वतीने संचालिका झेलम चौबळ पाटील यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

पर्यटन आणि आदरातिथ्य क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या संस्था व व्यक्तींना डीडीपी ग्रुपतर्फे आयोजित इंडिया ट्रॅव्हल अवॉर्ड्समध्ये दरवर्षी सन्मानित करण्यात येते. ऑनलाइन मतदान आणि परीक्षक मंडळाच्या मूल्यमापनाच्या आधारे विविध श्रेणींतील पुरस्कार विजेत्यांची निवड केली जाते. आंतरराष्ट्रीय समूह सहलींच्या आयोजनासाठी केसरी टूर्सला मिळालेला हा पुरस्कार संस्थेसाठी अभिमानाचा क्षण आहे.

जगभरातील विविध पर्यटनस्थळांचा अनुभव देताना सहलींचे सुयोग्य नियोजन, दर्जेदार सेवा आणि पर्यटकांच्या अपेक्षांना प्राधान्य देण्याची भूमिका केसरीने सातत्याने जपली आहे. पर्यटकांचा विश्वास आणि केसरी परिवारातील प्रत्येक सदस्याचे योगदान या वाटचालीत मोलाचे ठरले आहे. सलग तिसऱ्या वर्षी मिळालेल्या या पुरस्कारामुळे पर्यटकांना अविस्मरणीय प्रवासानुभव देण्याच्या केसरीच्या प्रयत्नांना अधिक बळ मिळाले आहे.

या यशाबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना झेलम चौबळ

पाटील म्हणाल्या, "सलग तिसऱ्या वर्षी हा पुरस्कार केसरी टूर्सला मिळत असल्याचा आम्हाला मनापासून आनंद आहे. गेल्या ४२ वर्षांपासून केसरीने विश्वासाचा वारसा जपला आहे आणि याच विश्वासाच्या बळावर आमची वाटचाल अधिक भक्कम होत आहे. या प्रवासात साथ देणारे आमचे आदरणीय पर्यटक, विश्वासू भागीदार, प्रत्येक केसरीयन आणि सर्व हितचिंतकांचे मनःपूर्वक आभार."

हा सन्मान साजरा करताना पर्यटकांना दर्जेदार सेवा, संस्मरणीय अनुभव आणि आनंददायी सहली देण्याची बांधिलकी केसरी टूर्सने पुन्हा अधोरेखित केली आहे.

केसरी टूर्सविषयी

१९८४ साली भारतीय कौटुंबिक सहलींच्या माध्यमातून केसरी टूर्सची सुरुवात झाली. केवळ १३ पर्यटकांसह राजस्थानच्या पहिल्या सहलीतून सुरू झालेला हा प्रवास आज अष्टविनायकापासून अंटार्क्टिकापर्यंत विस्तारला आहे. केसरीचा हा ४२ वर्षांचा प्रवास म्हणजे पर्यटकांनी दाखवलेल्या विश्वासाची पोचपावती आहे. लाखो पर्यटकांच्या पाठिंब्याने आणि आशीर्वादांनी केसरी टूर्सने पर्यटन क्षेत्रातील एक विश्वासार्ह आणि अग्रगण्य नाव म्हणून आपली ओळख निर्माण केली आहे.

मुंबई आणि महाराष्ट्रापुरते मर्यादित न राहता केसरीच्या शाखांचे जाळे संपूर्ण भारतात विस्तारले आहे. भारतातील सहलींबरोबरच युरोप, अमेरिका, मिडल ईस्ट, साऊथ ईस्ट एशिया, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि अंटार्क्टिका अशा जगभरातील विविध प्रदेशांमध्ये केसरी टूर्स सहलींचे आयोजन करते.

महिलांसाठी खास 'माय फेअर लेडी टूर्स', नवविवाहितांसाठी 'हनिमून टूर्स', ज्येष्ठांसाठी 'सेकंड इनिंग टूर्स', धार्मिक यात्रांसाठी 'मारीगोल्ड टूर्स', कॉर्पोरेट क्षेत्रासाठी 'MICE टूर्स', विद्यार्थ्यांसाठी 'स्टुडंट्स स्पेशल टूर्स', तर वैयक्तिक आवडीनुसार 'केसरी सिलेक्ट'च्या कस्टमाईज्ड टूर्स, असे विविध पर्याय केसरी उपलब्ध करून देते. तसेच, 'केसरी अवेडिंग्स'द्वारे पसंतीच्या पर्यटनस्थळी विवाहसोहळ्यांचे आयोजनही केले जाते.

प्रवासोपयोगी विविध वस्तूंच्या खरेदीसाठी केसरीचे ऑनलाइन स्टोअर उपलब्ध आहे. यासोबतच, जगभरातील क्रूझ पॅकेजेसच्या बुकिंगसाठी केसरीने नुकतीच 'केसरी क्रूझ' ही सेवा सुरू केली आहे.

जाहिर प्रकटन

मा. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात.

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. २१८/२०२६.

अर्जदार - १. कासाबाई अन्ना पहारे, वय ६५ वर्षे, धंदा शेती, रा. घोसला, ता. सोयगांव, जि. छ.संभाजीनगर. २. नंदाबाई निमचंद कुचे, वय ४० वर्षे, धंदा घरकाम, रा. कन्नड, ता. कन्नड, जि. छ संभाजीनगर. ३. मिरा गंभीर शिखरे, वय ३९ वर्षे, धंदा घरकाम, रा. गोविंद पुरा भोपाल. ४. शिवदास अन्ना पहारे, वय ३७ वर्षे, धंदा मजुरी, रा. घोसला, ता. सोयगांव, जि. छ संभाजीनगर हल्ली मुक्काम चेतना नगर, हर्सुल छ. संभाजीनगर. ५. अंकुश अन्ना पहारे, वय ३६ वर्षे, धंदा शेती, रा. घोसला, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर.

विरुद्ध- निल

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. स्वप्निल सुरळकर सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत अन्ना मोहन पहारे यांचा दिनांक ३१/०३/२०२४ रोजी घोसला येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ ते ५ वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते ५ हे मयत अन्ना मोहन पहारे यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल.

आजरोजी दिनांक २२/१०/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. २०/११/२०२६

विभागीय लिपीक सहाय्यक अधीक्षक
(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव)

जाहिर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगाव यांचे न्यायालय, ता. सोयगाव जि. औरंगाबाद.

दिवाणी अर्ज क्र. :- 216/2026.

अर्जदार :- 1) कलाबाई हिरामण अवसारे (मांग), वय – 77 वर्षे, धंदा – शेती, रा.भवरखेडे ता.धरणगांव जि. जळगाव. 2) शेनफडू झीपरु सावळे (साळवे), वय – 73 वर्षे, धंदा – शेती, रा. माळेगाव ता. सोयगाव जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद).

// विरुद्ध //

गैरअर्जदार :- निरंक.

अर्ज :- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितांस जाहीर प्रगटन द्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगाव ता. सोयगाव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे झीपरु परसराम सावळे (साळवे) हे मुळचे रा. माळेगाव ता. सोयगाव जि. छत्रपती संभाजीनगर येथील रहिवासी होते ते दिनांक :- 23/08/1988 ला माळेगाव ता. सोयगाव जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), येथे मयत झाले असून त्यांना वरील, अर्जदार हे कायदेशीर वारसदार आहेत. अर्जदारांना शासकीय तसेच खाजगी कार्यालयाशी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यक आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळविण्यासाठी दाखल केलेला आहे.

(पुढील दिनांक :- 26/10/2026).

तरी, ज्या कोणास अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरिता उत्तर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनाद्वारे प्रसिद्ध झाल्यापासून 30 दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रांसह उत्तर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक :- 22/10/2026 ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

विभागीय लिपिक. सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी प्रशासन, सोयगाव ता. सोयगाव जि. औरंगाबाद.

जाहीर प्रगटन/सायटेशन

मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापूर जि. औरंगाबाद

सिव्हील एम.ए.क्र. 787/2026

अर्जदार :- १) जिजाबाई भागीनाथ गायके, वय. ५६ वर्षे, धंदा, घरकाम, रा. घाणेगांव ता. गंगापूर जि. औरंगाबाद २) वंदना मधुकर उगले, वय. ३५ वर्षे, धंदा, घरकाम, रा. अंबेलोहळ ता. गंगापूर जि. औरंगाबाद. ३) नंदा बाळु हिवाळे, वय. ३५ वर्षे, धंदा, घरकाम, रा. सावतानगर, रांजनगांव शे.पुं. ता. गंगापूर जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण :- वारस प्रमाणपत्र (हेअरशिप प्रमाणपत्र) मिळणे बाबत

याअर्थी, वरील अर्जदारांनी ॲड. एस. के. लांडे यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क. १ चे पती व अर्जदार क. २ व ३ चे वडील नामे भागीनाथ धुळाजी गायके हे मौजे घाणेगांव ता. गंगापुर येथील रहीवासी होते व ते दि. २८/०९/२०१० रोजी मौजे घाणेगांव ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदार क. १ चा अविवाहीत मुलगा व अर्जदार क. २ व ३ चा अविवाहीत भाऊ नामे ज्ञानेश्वर भागीनाथ गायके हा दि. २७/०२/२०२५ रोजी मौजे घाणेगांव ता. गंगापूर येथे मयत झालेला आहे. अर्जदार क. १ ते ३ हे वर नमुद पत्त्यावरील रहीवासी असून मयत नामे भागीनाथ धुळाजी गायके यांना अर्जदार क. १ ही पत्नी असून अर्जदार क. २ व ३ हया विवाहीत मुली आहे. मयतास अर्जदारां व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयताच्या माघारी केवळ अर्जदार क. १ ते ३ हेच एकमेव कायदेशीर वारसदार आहे व इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदारांना शासकीय/निमशासकीय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यास कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा आक्षेप, उजर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः किंवा वकिला मार्फत आक्षेप उजर नोंदवावा. मुदतीत आक्षेप /उजर न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. करिता हे जाहीर प्रगटन.

दिनांक :- 19/10/2026. आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी व फौजदारी न्यायालय, गंगापूर

अग्रलेख

आवईमधून उगवले आशेचे अंकुर !

आभासी मंचावर केवळ गंमत म्हणून उदयास आलेल्या झुरळ पक्षाने देशात काही काळ माजविलेल्या गदारोळानंतर ज्यांना सत्तापरिवर्तनाची स्वप्ने पडू लागली आहेत, त्यामध्ये महाराष्ट्राच्या जनतेने पुरते नाकारल्याने केवळ बोलघेवडेपणा करीत आपले अस्तित्व टिकविण्याचा प्रयत्न करणाऱ्या राज ठाकरे यांचादेखील आता समावेश झाला, हे बरे झाले! झुरळ पार्टीच्या आंदोलनानंतर देशातील विरोधकांना सत्तापरिवर्तनाची स्वप्ने पडू लागली आहेत आणि कायम शेळीसारखे जगणाऱ्यांना एक दिवस तरी वाघासारखे जगावे, असे वाटू लागले आहे. गेल्या चार-पाच वर्षांत उद्धव ठाकरे यांच्या पक्षाची अवस्था शेळीसारखीच झाली होती. पक्षाची पडझड आणि अवकळा थांबविण्यासाठी महाविकास आघाडीत सामील होऊन काँग्रेसचे बोट धरून आणि जो कोणी हात पुढे करेल त्याच्यासमोर मतांच्या बेरजेसाठी लोटांगण घालून वाटणीस येणाऱ्या सत्तेची लाचारपणे रवंथ करण्यातच सारा काळ संपला. आम्ही 'रिजीम चेंज' घडविणारच, अशी आरोळी विजयादशमीला उद्धव ठाकरे यांनी ठोकली, तेव्हा तमाम विरोधकांचे स्वघोषित प्रवक्ते म्हणून काम करणारे त्यांच्या पक्षाचे नेते संजय राऊत यांचे लक्ष मात्र, राहुल गांधी यांच्या व्हिएतनाम दौऱ्याच्या परतवारीकडे लागले होते. विरोधी पक्षांतील जनाधार नसलेल्या काही नेत्यांनी उठविलेल्या सत्तापरिवर्तनाच्या आवईमध्ये भविष्यातील अस्तित्वाच्या आशा दिसू लागल्याने ठाकरे परिवाराच्या आनंदाला पारावार राहिलेला नाही. त्याच आनंदातून, भाकितांचा भडिमार सुरू करण्यासाठी राज ठाकरे यांनीही दंड थोपटले आहेत. पण सत्तापालटासाठी निवडणुका हाच लोकशाहीचा एकमेव वैध मार्ग असतो आणि निवडणुकांतील जनतेचा कौल महत्त्वाचा असतो. अशा निवडणुकांत ज्यांना सातत्याने जनतेने नाकारले आहे, अशा परिवारास आता एक दिवसापुरते तरी वाघ व्हावेसे वाटू लागले असले, तरी त्यामुळे लगेचच परिवर्तनाची संधी हात जोडून समोर उभी राहील, हा त्यांचा तद्दन हतबल आशावाद आहे. लोकशाहीमध्ये विरोधी पक्ष बलवान असलाच पाहिजे. अशा विरोधी पक्षाने सत्ताधाऱ्यांवर अंकुश ठेवण्यात व जनतेच्या हितासाठी काम करण्याकरिता सरकारला भाग पाडण्यात महत्त्वाची भूमिका निभावलीच पाहिजे. पण सध्या विरोधी पक्षांकडे संख्याबळ असले, तरी त्यांचे नैतिक बळ मात्र खंगत चाललेले दिसते. एका आभासी पक्षाच्या कचकड्याच्या आंदोलनातून मिळालेल्या तात्पुरत्या शक्तीचा वापर करून उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या शिल्लक मनसेसह अन्य पक्षांना बळ मिळाल्यासारखे वाटत असेल, तर आपल्या वर्तमानाचा आणि भविष्याचा नेमका अंदाज घेण्यात ते अजूनही चाचपडतच आहेत, असे म्हणावे लागेल.

सरकारच्या भविष्याची भाकड भाकिते वर्तविण्यात संजय राऊत यांच्यासारख्या 'थोर' भविष्यवेत्त्याचा हात कोणीच धरू शकणार नाही. गेल्या बारा वर्षांतच नव्हे, तर त्याही आधीपासून ते केवळ बिनबुडाची भाकिते वर्तवत राहिले असून काही मोजक्या माध्यमांना त्यामुळे आयता मसाला मिळत असल्याने त्यास बऱ्यापैकी प्रसिद्धीही मिळत राहिली आहे. तथापि, त्यांनी वर्तविलेले एकही भाकीत आजपावेतो खरे झालेले नाहीच; उलट अन्य पक्षांच्या भविष्याची भाकिते वर्तविण्यात व्यग्र राहिल्यामुळे स्वपक्षाची होत गेलेली वाताहत त्यांना जाणवलीच नाही आणि राऊत यांच्या भाकितावर अंधविश्वास ठेवून त्यांच्या शब्दांची री ओढणाऱ्या उद्धव ठाकरेंचेही हसे होत गेले. आता त्यांच्या कंपूमध्ये सामील झालेले राज ठाकरे यांनाही त्याच मार्गाने चालणे गरजेचे वाटू लागल्याने, राऊत यांनी पेरलेल्या पोकळ बियाणातून उगवणाऱ्या अफवांचे पीक पसरविण्यात त्यांना मजा वाटू लागली असावी. हाच प्रयत्न राष्ट्रीय पातळीवर सुरू झाला आणि त्याचा धागा पकडून आता राज ठाकरे यांनी नवे भाकीत मांडले. येत्या तीन-चार महिन्यांत देशात मोठी गडबड होणार, संपूर्ण जनता रस्त्यावर उतरणार आणि काही काळ तर पंतप्रधानाविनाच पाहावा लागणार अशी मुक्ताफळे उधळून राज ठाकरे यांनी पुन्हा माध्यमांच्या रकान्यांमधील जागा व्यापली आहे. झुरळ पार्टीने मुख्य निवडणूक आयुक्तांच्या विरोधात सुरू केलेल्या आंदोलनानंतर आता विरोधकांना ज्या काही नव्या युक्ती सुचू लागल्या आहेत, त्यामध्ये मतपत्रिकांद्वारे मतदान हा जुना आवाज पुन्हा बुलंद करण्याचा प्रयत्न स्पष्ट दिसतो. मतपत्रिकांद्वारे होणाऱ्या मतदानात राजकारणातील बाहुबलींनी घातलेल्या धुमाकुळाची असंख्य उदाहरणे अजूनही इतिहासात कायमची बासनबंद झालेली नाहीत. पेट्यांची पळवापळव, बोगस मतपत्रिकांची अदलाबदल आणि मतदान केंद्रांचा ताबा घेऊन सत्तेची संधी साधण्याचे हरतऱ्हेचे प्रयत्न वेगवेगळ्या काळात उघडकीस आले होते. गेल्या काही वर्षांत मतदान यंत्रांचा वापर सुरू झाला आणि अशा प्रयत्नांना आळा बसला. पण त्यामुळे सातत्याने पराभव पत्करावा लागलेल्या पक्षांना जनतेच्या समाधानाचीच सल बोचत असल्याने, आता निवडणुका हा परिवर्तनाचा प्रामाणिक मार्गच अमान्य करून रस्त्यावर उतरण्याचा अविवेकी प्रयत्न सुरू झाला आहे. राज ठाकरे यांच्या परिवर्तनाच्या भाकिताला याच अविवेकाचा वास येतो. झुरळ पार्टीच्या आंदोलनाचे खंदे समर्थक म्हणविणाऱ्या प्रशांत भूषण यांनी सत्तापरिवर्तनाच्या या मार्गास मान्यता देऊन लोकशाहीच्या संकेतांना पहिली तिलांजली दिली. त्यांचे अन्य साथीदारही त्याचीच री ओढू लागले. त्यामध्ये आघाडीवर असलेले योगेंद्र यादव हे स्वतःस निवडणूकशास्त्राचे तज्ज्ञ म्हणवितात. निवडणुकीच्या राजकारणाचे विश्लेषण करताना त्यांच्या चेहऱ्यावर तज्ज्ञपणाचे तेज उफाळून येत असते. त्याचा आधार घेऊन अशी भाकिते वर्तविण्यात तेदेखील आघाडीवर असतात. राज ठाकरे यांनाही स्वपक्षाची भक्कम बांधणी करता आलेली नाही. राज ठाकरे यांनी शिवसेना सोडून महाराष्ट्र नवनिर्माण सेना स्थापन केल्यानंतर या पक्षात मनोरंजनाची काहीशी पोकळी निर्माण झाली होती. ती भरून काढण्याचा बराच प्रयत्न उद्धव ठाकरे यांनी सातत्याने केला, पण या जनतेला प्रयत्नांतही मनोरंजन दिसू लागले. आदित्य ठाकरे यांनीही उद्धव ठाकरे यांचा वारसा पुढे चालविण्याचा प्रयत्न केला. त्याकडे जनतेने फारसे लक्ष दिले नाही. राज ठाकरे यांनी अस्तित्व टिकविण्याचा अखेरचा प्रयत्न म्हणून उद्धव ठाकरे यांच्या पक्षांसोबत हातमिळवणी करण्याचा निर्णय घेतल्याने मनोरंजनाच्या राजकारणातील एक मोठी पोकळी भरून निघाल्याची या परिवाराची समजूत झाली असावी. सत्तापरिवर्तनाचे स्वप्न हा त्याच समजुतीचा परिणाम असावा. गेल्या अनेक वर्षांपासून उद्धव ठाकरे यांच्या पक्षाला नाईलाजास्तव शेळीचे कातडे पांघरून राहावे लागले आहे. सत्तापरिवर्तनाचे स्वप्न पाहताना, हे कातडे भिरकावून देऊन वाघाचे कातडे पांघरल्याचा भास आता त्यांना होऊ लागला असावा. मागे एकदा, भाजपसोबतच्या युतीचा कटोरा अशाच आवेशांत भिरकावून दिल्यानंतर काँग्रेस, शरद पवार गट आणि जे जे सोबत येऊ शकतात त्या सर्वांसोबत युती करण्यासाठी कटोरा फिरवला आणि सत्ता बळकावण्याचे स्वप्न साकार झाले. त्या योगायोगाची पुनरावृत्ती होईल, येत्या तीन-चार महिन्यांत देशात मोठी गडबड होईल, जनता रस्त्यावर उतरून आपला राग व्यक्त करेल आणि आपोआप 'रिजीम चेंज' होऊन सत्तेचे स्वप्न साकार होईल या अपेक्षेने येत्या दोन-चार महिन्यांच्या भविष्याकडे डोळे लावून बसलेल्या ठाकरे परिवाराच्या स्वप्नरंजनातून जनतेचे मनोरंजन होत असेल, तर ते तसे होणे चांगलेच आहे. पण केवळ स्वप्ने पाहून 'रिजीम चेंज' किंवा सत्तापरिवर्तन होत नाही, तर जनतेने निवडणुकीतून ते घडवावे लागते आणि अशा परिवर्तनासाठी जनतेचा विश्वास संपादन करावा लागतो. केवळ विनोदी आणि भाकड भाकिते वर्तवून ते साध्य होत नसते. ■

अर्थ विशेष

ॲड. हितेश पारसे

...तर कर कोणाला भरावा लागतो ?

आजच्या काळात अनेक पालक आपल्या मुलांना घर खरेदी करण्यासाठी पैसे देतात, फ्लॅट घेण्यासाठी आर्थिक मदत करतात, बँक खात्यात मोठी रक्कम हस्तांतरित करतात किंवा स्वतःच्या मालकीची मालमत्ता मुलांच्या नावावर करतात. काही वेळा परदेशात राहणारी मुले भारतातील आई-वडिलांना घरखर्चासाठी किंवा वैद्यकीय गरजांसाठी पैसे पाठवतात. अशा व्यवहारांबाबत एक प्रश्न वारंवार विचारला जातो- पालकांनी मुलांना पैसे दिले तर कर कोणाला भरावा लागतो? या प्रश्नांच्या उत्तरासाठी या सर्व बाबी विचारात घ्याव्या लागतात.

१. आई-वडिलांनी आपल्या मुलाला किंवा मुलीला कोणताही मोबदला न घेता पैसे भेट म्हणून दिल्यास, सामान्यतः प्राप्तकर्त्या मुलाच्या किंवा मुलीच्या हातात त्या रकमेवर उत्पन्नकर लागत नाही. आयकर कायद्यात नातेवाईकांकडून मिळालेल्या भेटींसाठी विशेष सवलत आहे. उदाहरणार्थ, वडिलांनी आपल्या मुलाला घर खरेदी करण्यासाठी २५ लाख रुपये दिले किंवा आईने मुलीच्या बँक खात्यात १० लाख रुपये हस्तांतरित केले, तर केवळ ही रक्कम भेट म्हणून मिळाल्यामुळे मुलाला किंवा मुलीला त्या रकमेवर उत्पन्नकर भरावा लागत नाही. महत्त्वाची बाब म्हणजे, इतर व्यक्तींकडून मिळालेल्या काही भेटींवर वार्षिक एकूण रक्कम ५०,००० रुपयांपेक्षा जास्त झाल्यास कर लागू होऊ शकतो; मात्र पात्र नातेवाईकांकडून मिळालेल्या भेटींना ही सवलत लागू होते. तथापि, व्यवहार खरोखर भेट आहे की कर्ज, गुंतवणूक किंवा अन्य प्रकारचे हस्तांतरण आहे, हे स्पष्ट असणे आवश्यक आहे.

२. मोठी रक्कम बँक खात्यात जमा झाली म्हणजे ती आपोआप करपात्र उत्पन्न ठरत नाही. मात्र, व्यवहाराचे स्वरूप आणि पैशांचा स्रोत स्पष्ट नसल्यास बँक किंवा आयकर विभागाकडून स्पष्टीकरण मागितले जाऊ शकते. उदाहरणार्थ, एखाद्या वडिलांनी स्वतःच्या बचतीतून मुलाच्या खात्यात ३० लाख रुपये हस्तांतरित केले. वडिलांच्या उत्पन्नाचे आणि बचतीचे स्रोत स्पष्ट असतील, बँक व्यवहाराची नोंद उपलब्ध असेल आणि पैसे भेट म्हणून दिल्याचे पुरावे असतील, तर व्यवहाराचे स्पष्टीकरण देणे सोपे होते. याउलट, मुलाच्या खात्यात अचानक मोठी रक्कम जमा झाली, परंतु ती कुठून आली, कोणी दिली आणि कशासाठी दिली याची माहिती उपलब्ध नसेल, तर अडचण निर्माण होऊ शकते. अशा व्यवहारांसाठी पुढील कागदपत्रे जतन करावीत : - • पैसे देणाऱ्या पालकांचे बँक स्टेटमेंट. • पैसे हस्तांतरित केल्याचा पुरावा. • देणारा आणि घेणारा यांच्यातील नात्याचा पुरावा. • आवश्यकतेनुसार गिफ्ट डीड किंवा भेटीचे लेखी घोषणापत्र. • पैशांचा स्रोत स्पष्ट करणारी उत्पन्नाची किंवा बचतीची कागदपत्रे.



३. मुलांना पैसे दिल्यानंतर त्या पैशांवर मिळणाऱ्या व्याजाचा कर कोण भरेल? हा महत्त्वाचा मुद्दा आहे. समजा, वडिलांनी मुलाला २० लाख रुपये भेट म्हणून दिले. मुलाने त्या पैशांची बँकेत मुदत ठेव केली आणि त्यावर वर्षभरात १.४० लाख रुपये व्याज मिळाले. अशा परिस्थितीत मुलगा सज्ञान असेल आणि रक्कम त्याला वैधरीत्या भेट म्हणून दिलेली असेल, तर सामान्यतः त्या ठेवीवरील व्याज मुलाच्या उत्पन्नात समाविष्ट होईल आणि लागू नियमानुसार त्याच्या कराची गणना होईल. म्हणजेच, मूळ भेटीच्या रकमेवर कर नसला, तरी त्या रकमेतून मिळणारे पुढील उत्पन्न करपात्र असू शकते. मात्र, मुलगा किंवा मुलगी अल्पवयीन असल्यास वेगळे नियम लागू होऊ शकतात. अल्पवयीन मुलाच्या उत्पन्नाचे पालकांच्या उत्पन्नात एकत्रीकरण करण्याची तरतूद लागू होऊ शकते, काही अपवादांच्या अधीन राहून.

४. मुलांना घर खरेदीसाठी पैसे दिले... अनेक पालक मुलांना स्वतःचे घर घेण्यासाठी मोठी आर्थिक मदत करतात. उदाहरणार्थ, मुलाने ८० लाख रुपयांचा फ्लॅट खरेदी केला आणि त्यासाठी पालकांनी २० लाख रुपये दिले. ही रक्कम खरोखर भेट म्हणून दिली असल्यास, सामान्यतः मुलाच्या हातात भेटीच्या रकमेवर आयकर लागत नाही. मात्र, घराच्या खरेदीसाठी लागणारे मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, गृहकर्ज आणि इतर खर्च यांचा स्वतंत्र विचार करावा लागतो. याशिवाय, मुलाने पुढे घर विकल्यास भांडवली नफा कराचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. पालकांकडून मिळालेल्या पैशातून खरेदी केलेल्या घराच्या बाबतीत, घराची खरेदी किंमत, मालकीचा कालावधी आणि विक्रीच्या वेळी लागू असलेल्या करनियमांनुसार गणना केली जाते. पालकांनी पैसे भेट म्हणून दिले आहेत की कर्ज म्हणून, हेही स्पष्ट असावे. पैसे परत घेण्याचा उद्देश असल्यास व्यवहाराला भेट म्हणण्याऐवजी योग्य कर्जकरार व परतफेडीच्या अटी नोंदविणे अधिक योग्य ठरू शकते.

५. पालकांनी आपल्या मुलाला किंवा मुलीला घर, फ्लॅट, प्लॉट किंवा अन्य स्थावर मालमत्ता भेट म्हणून दिल्यास, पात्र नातेवाईकाकडून मिळालेल्या मालमत्तेसाठी असलेल्या आयकर सवलतीचा लाभ सामान्यतः मिळतो. मात्र, येथे दोन बाबी स्वतंत्रपणे तपासाव्या लागतात. पहिली म्हणजे आयकर. पात्र भेट व्यवहारात केवळ मालमत्ता मिळाल्यामुळे मुलाच्या हातात सामान्यतः कर लागत नाही. दुसरी म्हणजे मुद्रांक शुल्क आणि नोंदणी. महाराष्ट्रात काही विशिष्ट कौटुंबिक भेटींना मुद्रांक शुल्काची सवलत उपलब्ध असू शकते. मात्र, मालमत्तेचा प्रकार, नातेसंबंध आणि लागू कायदेशीर अटी तपासणे आवश्यक आहे. याशिवाय, मुलाने पुढे मालमत्ता विकल्यास भांडवली नफा कर लागू होऊ शकतो. त्यामुळे मालमत्तेचे हस्तांतरण करण्यापूर्वी गिफ्ट डीड, मुद्रांक शुल्क, नोंदणी आणि भविष्यातील करपरिणाम यांचा एकत्रित विचार करावा.

६. मुलांना पैसे दिले आणि त्यांनी ते व्यवसायात गुंतवले तर? समजा, पालकांनी मुलाला १५ लाख रुपये भेट म्हणून दिले आणि मुलाने ती रक्कम स्वतःच्या व्यवसायात गुंतवली. अशा परिस्थितीत, पात्र भेटीच्या मूळ रकमेवर सामान्यतः कर लागत नाही; मात्र व्यवसायातून मिळणारा नफा मुलाच्या लागू करनियमांनुसार करपात्र होऊ शकतो. त्याचप्रमाणे, मुलाने ती रक्कम शेअर्स, म्युच्युअल फंड किंवा बँक ठेवींमध्ये गुंतवली, तर त्यातून मिळणाऱ्या लाभांश, व्याज किंवा भांडवली नफ्याचे करपरिणाम स्वतंत्र असतील.

७. अनेक मुले नोकरी किंवा व्यवसायासाठी परदेशात राहतात आणि भारतातील आई-वडिलांना घरखर्च, वैद्यकीय खर्च किंवा इतर गरजांसाठी पैसे पाठवतात. पात्र नातेवाईकाकडून मिळालेल्या भेटीला सामान्यतः आयकर सवलत उपलब्ध असते. त्यामुळे परदेशात राहणाऱ्या मुलाने भारतातील पालकांना पैसे पाठवले म्हणून केवळ त्या भेटीच्या रकमेवर आपोआप आयकर लागत नाही. मात्र, रक्कम कोणत्या स्रोतामधून आली, व्यवहार बँकिंग माध्यमातून झाला आहे का आणि परकीय चलनविषयक नियमांचे पालन झाले आहे का, हे तपासणे आवश्यक असते. मोठ्या रकमेच्या व्यवहारात पाठवणाऱ्या व्यक्तीचा तपशील, बँक व्यवहाराचा पुरावा आणि भेटीचे स्वरूप स्पष्ट करणारी कागदपत्रे जतन करावीत. जर पालकांना परदेशातून मोठी रक्कम मिळाली आणि त्याच काळात त्यांनी मोठी गुंतवणूक किंवा मालमत्ता खरेदी केली, तर त्या व्यवहारामागील पैशांचा स्रोत स्पष्ट असणे विशेष महत्त्वाचे ठरते.

८. पालकांनी मुलांना पैसे देताना कोणती काळजी घ्यावी? पैसे भेट म्हणून दिले असतील, तर व्यवहाराची तारीख, रक्कम, देणारा आणि घेणारा यांचे तपशील स्पष्ट ठेवावेत. शक्यतो बँक हस्तांतरणाचा वापर करावा आणि व्यवहाराशी संबंधित कागदपत्रे जतन करावीत. मालमत्ता भेट देताना योग्य गिफ्ट डीड, आवश्यक मुद्रांक शुल्क आणि नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करावी. मुलांना दिलेल्या रकमेवर मिळणारे व्याज, भाडे किंवा गुंतवणुकीतून निर्माण होणारे उत्पन्न कोणाच्या हातात करपात्र होईल, याचा स्वतंत्र विचार करावा. तसेच, पालकांनी स्वतःच्या निवृत्तीनंतरच्या गरजा, वैद्यकीय खर्च आणि आर्थिक सुरक्षितता लक्षात घेऊनच मोठ्या रकमेचे हस्तांतरण करावे.

निष्कर्ष : मुलांना पैसे देणे, त्यांच्या खात्यात मोठी रक्कम जमा करणे किंवा घर-मालमत्ता भेट देणे हे सामान्य कौटुंबिक व्यवहार आहेत. मात्र, या व्यवहारांमध्ये कराचे नियम समजून घेणे आणि आवश्यक पुरावे जतन करणे महत्त्वाचे आहे. ■

९०९६३३२३५३
(लेखक कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार आहेत)

वेध

प्रफुल्ल व्यास

कंत्राटदारांच्या आत्महत्या

शेतकऱ्यांनंतर आता शासकीय कंत्राटदारांच्या आत्महत्या डोकं वर काढत आहेत. राज्य सरकारकडे जवळपास ९७ हजार कोटी रुपये थकित असल्याने कंत्राटदार कर्जबाजारी झाले. परिणामी ते आत्महत्येचा मार्ग स्वीकारतात. पैशांचं सोंग करता येत नाही. त्यामुळे हा निर्णय घेतला जाऊ शकतो, यात दुमत असण्याचे कारण नाही. पण, मनुष्य जन्मही एकदाच मिळतो. आपल्या हातात ताकद आहे. त्या भरवशावर अजून कमवा, पण आत्महत्या करू नका. तुम्ही मरता, मोकळे होता. पण, आई-वडील, मायबापाचे घर सोडून आलेली बायको आणि तुम्हीच जन्माला घातलेली मुलं यांचा विचार कोण करणार? एकदा का तुमचा श्वास थंडावला की जास्तीत जास्त १५ दिवस घरचे, महिनाभर नातेवाईक आठवण काढतील आणि वर्षश्राद्ध झाले की सर्वच समाप्त झालेले असते! अडचण होते ती त्या घरात असलेल्या बायकोची आणि वयाने लहान असलेल्या मुलांची! आत्महत्या हे औषध नाही. आलेल्या संकटांना तोंड देऊन पुन्हा उभे राहणाऱ्यांचे कौतुक होते, हे ध्यानात घेतलेच पाहिजे. त्यासाठी थोडी बेशरमकी घेतली तरी चालते. पण, कोणाला फसवू नका! पैसे उद्या दिले जाऊ शकतात. आयुष्य परत मिळत नाही.

शेतकऱ्यांच्या आत्महत्यानंतर शासकीय कंत्राटदारांच्या आत्महत्या होणे हे महाराष्ट्रासारख्या राज्याला अशोभनीयच! कंत्राटदार हा विकासातील सर्वात महत्त्वाचा भाग आहे. लाचखोरी ही सर्वत्र फोफावते आहे. हिस्सेवाटे कसे होतात हे सर्वश्रुत आहे. निविदा निघण्यापासून ते शेवटचे बिल निघेपर्यंत पैसे वाटावेच लागतात. राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग तर सर्वात आघाडीवर आहे. सरकारी यंत्रणा काम करू शकत नाही म्हणून कंत्राटदारांच्या माध्यमातून कामं करून घेतली जातात. मात्र, गेल्या दोन-अडीच वर्षांत हेच ठेकेदार कामाचे पैसे मिळावे म्हणून फिरत आहेत. सर्वच कंत्राटदार स्वच्छ आहेत किंवा सर्वच भ्रष्टाचारी आहेत, असे अजिबात म्हणता येणार नाही. दारिद्र्यरेषेखालील किंवा सामान्य नागरिकांना देण्यात येणाऱ्या सवलतींना आमचा विरोध नाही आणि असण्याचे कारणही नाही. पण, विकास कामं करणाऱ्यांची बिलं असे वर्षोनुवर्षे अडकत तर मग... विकासाचं कामच ठप्प पडले तर ती कामं करणार तरी कोण? पैसे दिल्याशिवाय कामं होत नाहीत हे माहिती आहे. मग, वाटता वाटता जे शिल्लक राहतं त्यात तो स्वतःचा नफा काढण्याचा प्रयत्न करतो आणि उरलेल्या निधीतून 'विकास' होतो. त्या विकासाचे आयुष्य किती हे उघड्या डोळ्यांनी दिसतेच आहे. सार्वजनिक बांधकाम विभागात 'बीडीएस' प्रणाली काम करते. जो जास्तीचे पैसे मोजेल त्याच्यासाठी ती प्रणाली रात्री उघडली जाते. जो पैसे देत नाही त्याला मग साहेबांच्या कॅबिनचे उंबरठे झिजवावे लागतात. राज्यात रस्ते, इमारती बांधकामाचा विकास करणाऱ्या ठेकेदारांचे ९७ हजार कोटी थकित आहेत. आजपर्यंत १० कंत्राटदारांनी आत्महत्या केली.

१५ दिवसांपूर्वी दोन-अडीच कोटी कर्ज असलेल्या जरुड जि. अमरावती येथील सुनील वागद्रे या युवा कंत्राटदाराने आत्महत्या केली. ते होत नाही तोच वर्धेतही एका कंत्राटदाराचा आर्थिक विवंचनेत मृत्यू झाला. एकंदरीत हे आत्महत्येचे लोण वाढत गेले तर शेतकऱ्यांनंतर ठेकेदारांच्या आत्महत्यांचे राज्य म्हणून या पुरोगामी राज्याची काळी ओळख होता कामा नये. कामं करून घेणं जितकं महत्त्वाचं, तितकंच कामाचे पैसे वेळेत देणंही महत्त्वाचं आहे. कंत्राटदारांनीही जरा खर्चाच्या मर्यादा ठरवून घेतल्या पाहिजेत. कामाचा पैसा देत नाही ही सरकारची, सरकारी यंत्रणांची चूकच आहे. परंतु, आपणही जरा आलेल्या पैशांच्या विनियोगाचे नियोजन केले पाहिजे. 'व्हाईट कॉलर'ची सवय बरेचदा जुने दिवस विसरायला भाग पाडते; मग बरेचदा अनाठायी कर्जाचा बोजा होतो आणि सरकारी पैसा मिळाला नाही म्हणून आपणच बोंब ठोकतो आणि गळास जवळ करतो. त्यामुळे फक्त आपलं कुटुंबच उघडं पडतं. कोणाचं काहीही बिघडत नाही! म्हणून आमचा एक शायर मित्र प्रदीप सातपुते म्हणतो...

मालूम है कि ख्वाब झूठे है और ख्वाहिश अधूरी है...
पर जिंदा रहने के लिये कुछ, गलतफहमियां भी जरूरी हैं!

काही गोष्टींना समजून घेतले पाहिजे. टोकाचा निर्णय घेऊन आपलं घर उघड्यावर आणण्यात पुरुषार्थ नाही... येऊ दे संकटं कितीही.. परतून लाव त्या मजबूत हातांनी! तुम्हीच रस्ते बांधता आणि आयुष्याचा रस्ता अर्धवट सोडून जग सोडून जाता... पळकुटे कुठले! सरकारी यंत्रणेनेही कंत्राटदारांच्या आत्महत्यांची वाट पाहू नये. गोडीगुलाबीने राहतच हे गाडं हाकायचं आहे बरं... ■

९८८१९०३७६५

डिजिटल जनजागृती

सीए अभय सगदेव

कन्सेंट मॅनेजर्स आणि कन्सेंट व्यवस्थापनाचे भविष्य

कल्पना करा की, तुमची खाती एका हॉस्पिटल ॲपमध्ये, इन्शुरन्स ॲपमध्ये, बँकमध्ये, ऑनलाईन लर्निंग प्लॅटफॉर्ममध्ये, शॉपिंग ॲपमध्ये आणि गव्हर्न्मेंट सर्व्हिस पोर्टलमध्ये आहेत. वेगवेगळ्या वेळी यापैकी प्रत्येक संस्था तुमची पर्सनल डेटा वापरण्यासाठी कन्सेंट मागते. आपण घाईत होकार देतो, नेमके कशाला कन्सेंट दिली हे विसरतो आणि नंतर ती कन्सेंट कशी पाहायची किंवा मागे घ्यायची, असा प्रश्न पडतो. डीपीडीपी ॲक्ट या व्यावहारिक अडचणीची दखल घेतो. या कायद्यात कन्सेंट मॅनेजर ही नवी संकल्पना दिली आहे. कन्सेंट मॅनेजरचा उद्देश असा आहे की, डेटा प्रिंसिपलला ॲक्सेसिबल, ट्रान्सपरंट आणि इंटरऑपरेबल प्लॅटफॉर्मद्वारे कन्सेंट देणे, व्यवस्थापित करणे, पाहणे आणि मागे घेणे सोपे व्हावे.

सोप्या भाषेत सांगायचे तर कन्सेंट मॅनेजर हा नागरिकासाठी एक विश्वासार्ह डिजिटल विंडो ठरू शकतो, ज्याद्वारे वेगवेगळ्या डेटा फिड्युशिअरीला दिलेली कन्सेंट नागरिक पाहू आणि नियंत्रित करू शकतो. अनेक स्वतंत्र वेबसाईट्स आणि ॲप्सची सेटिंग लक्षात ठेवण्याऐवजी डेटा प्रिंसिपलला एकाच कन्सेंट मॅनेजमेंट प्लॅटफॉर्मचा वापर करता येऊ शकतो, अर्थात कायदा आणि नियमामध्ये दिलेल्या चौकटीच्या अधीन राहून. ही कल्पना महत्त्वाची आहे. कारण डीपीडीपी कायद्यांतर्गत कन्सेंट ही एकदाच घेतली जाणारी औपचारिकता नाही. कन्सेंट फ्री, विशिष्ट, माहितीपूर्ण, विनाअट आणि स्पष्ट असली पाहिजे. त्यात स्पष्ट सकारात्मक कृती असणे आवश्यक आहे. डेटा प्रिंसिपलला कन्सेंट मागे घेण्याचाही हक्क आहे आणि कन्सेंट मागे घेणे हे कन्सेंट देण्याइतकेच सोपे असले पाहिजे. कन्सेंट मॅनेजरमुळे डेटा फिड्युशिअरीची जबाबदारी संपत नाही. डेटा फिड्युशिअरीने योग्य सूचना देणे, पर्सनल डेटाची कायदेशीर प्रक्रिया करणे, सुरक्षा राखणे, विनंतीला प्रतिसाद देणे आणि कायद्याचे कम्प्लायन्स करणे आवश्यकच राहते. कन्सेंट मॅनेजर फक्त डेटा प्रिंसिपलच्या वतीने कन्सेंट मॅनेज करण्यासाठी एक मान्यताप्राप्त मॅकेनिझम उपलब्ध करून देतो.

कायद्यानुसार कन्सेंट मॅनेजरची नोंदणी डेटा प्रोटेक्शन बोर्ड ऑफ इंडियाकडे असणे आवश्यक आहे. नियमामध्ये रजिस्ट्रेशनसाठी अटी आणि त्यानंतरच्या जबाबदाऱ्या दिल्या आहेत. त्यामुळे कोणतेही सामान्य ॲप किंवा वेबसाईट स्वतःला डीपीडीपी फ्रेमवर्क अंतर्गत कन्सेंट मॅनेजर म्हणू शकत नाही. रजिस्टर्ड कन्सेंट मॅनेजरने डेटा प्रिंसिपलप्रति फिड्युशिअरी कॅपॅसिटीमध्ये काम करणे अपेक्षित आहे. याचा अर्थ असा की, ज्याची कन्सेंट तो मॅनेज करतो त्या व्यक्तीच्या हिताला प्राधान्य दिले पाहिजे. डेटा फिड्युशिअरीसोबत कन्फ्लिक्ट ऑफ इंटरेस्ट टाळला पाहिजे आणि एखाद्या व्यवसायाला दुसऱ्यावर अनुचित फायदा करून देण्यासाठी किंवा नागरिकावर अन्याय्य प्रभाव टाकण्यासाठी आपली भूमिका वापरू नये.

कन्सेंट मॅनेजरच्या भूमिकेत सुरक्षा हाही मध्यवर्ती मुद्दा आहे. कन्सेंट रेकॉर्ड्स आणि संबंधित डिजिटल इंटरॅक्शन्स यांच्याशी तो व्यवहार करणार असल्यामुळे पर्सनल डेटा ब्रीच टाळण्यासाठी वाजवी सुरक्षा उपाय ठेवणे आवश्यक आहे. नागरिकांना कन्सेंट मॅनेज करण्यास मदत करणाराच प्लॅटफॉर्म जर डेटाबाबत बेफिकीर असेल, तर कायद्याचा उद्देशच निष्फळ ठरेल. नियमानुसार कन्सेंट मॅनेजरने वेबसाईट किंवा ॲप किंवा दोन्ही, हे डेटा प्रिंसिपल्सना सेवा उपलब्ध करून देण्याचे मुख्य माध्यम म्हणून ठेवणे अपेक्षित आहे. काळानुसार यामुळे कन्सेंट मॅनेजमेंट अधिक व्यावहारिक होऊ शकते; विशेषतः जे लोक अनेक डिजिटल सर्व्हिस वापरतात आणि परवानगी पाहण्यासाठी किंवा मागे घेण्यासाठी एकच जागा इच्छितात त्यांच्यासाठी.

नागरिकांसाठी याचा प्रत्यक्ष फायदा म्हणजे स्पष्टता. तुमची कन्सेंट कोणी मागितली, कोणत्या उद्देशासाठी मागितली आणि तुम्हाला ती प्रक्रिया पुढे चालू ठेवायची आहे का, हे कळणे आवश्यक आहे. व्यवसायांसाठी याचा फायदा म्हणजे चांगले कन्सेंट रेकॉर्ड्स, अधिक सुव्यवस्थित कम्प्लायन्स आणि कन्सेंट खरोखर घेतली किंवा मागे घेतली गेली का याबद्दल कमी वाद. तरीही नागरिकांनी सावध राहणे आवश्यक आहे. कन्सेंट मॅनेजरला जादूची ढाल समजू नये. कन्सेंट मॅनेज करण्याचा दावा करणारा कोणताही प्लॅटफॉर्म वापरण्यापूर्वी तो योग्यरीत्या नोंदणी आहे का, त्याची भूमिका, कॉन्टॅक्ट डिटेल्स, ग्रीव्हन्स प्रोसेस आणि सिक्युरिटी अप्रोच स्पष्टपणे सांगितला आहे का, हे तपासले पाहिजे. कन्सेंट मॅनेजर्स विशेषतः हेल्थकेअर, आर्थिक, शैक्षणिक, विमा, ई-कॉमर्स आणि डिजिटल पब्लिक सर्व्हिसेस अशा क्षेत्रांत महत्त्वाचे ठरू शकतात. मोठा संदेश असा आहे की, डीपीडीपी ॲक्ट कन्सेंटकडे एक जिवंत आणि मॅनेज करता येणारा हक्क म्हणून पाहतो, विसरलेली खूण म्हणून नाही. नागरिकाला हो म्हणता आले पाहिजे, त्या 'हो' चे पुनरावलोकन करता आले पाहिजे आणि नंतर नाही म्हणता आले पाहिजे, अर्थात इतर कायद्यांनुसार किंवा वैध आवश्यकतांनुसार कायदेशीर धारणा आणि प्रक्रिया आवश्यक असल्यास त्याच्या अधीन राहून.

समजा एखादा रुग्ण अपॉईंटमेंट बुक करण्यासाठी, तपासणी अहवाल मिळविण्यासाठी आणि इन्शुअर सोबत रेकॉर्ड्स शेअर करण्यासाठी हेल्थ ॲप वापरतो. नंतर त्या रुग्णाला कोणती कन्सेंट दिली होती हे पाहायचे आहे आणि एका पर्यायी सेवेसाठी कन्सेंट मागे घ्यायची आहे. भविष्यात कन्सेंट मॅनेजर अशा कन्सेंटचे पुनरावलोकन आणि व्यवस्थापन अधिक सोप्या व सुव्यवस्थित पद्धतीने करण्यास मदत करू शकतो. ■

sagdev1@gmail.com

पदवीधरांनो, मत अवैध ठरू देऊ नका!

आज होत असलेल्या पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत लाखो पदवीधारक मतदान करतील. प्रत्येक मत अमूल्य असते. प्रत्येक मत वैधच ठरायला हवे, याचा सारासार विचार करून जर प्रत्येक मतदाराने मतदान केले तर एकही मत अवैध होणार नाही व खऱ्या अर्थाने ही शिक्षितांची निवडणूक ठरेल. अनेकदा पसंतीक्रम मतदानात केलेले मतदान अवैध होण्याचा धोका मोठा असतो. २०२० मध्ये नागपूर विभागात झालेल्या पदवीधर निवडणूक मतदानामध्ये जवळपास ११,५६० मते अवैध झाली होती. त्यामुळे अत्यंत काळजीपूर्वक, आयोगाने ठरवलेल्या नियमानुसारच मतदान करणे अत्यंत आवश्यक आहे. या निवडणुकीत मतपत्रिकेवर उमेदवारांच्या नावासमोर पसंतीक्रम नोंदवावा लागतो. त्यामुळे मतदानाची योग्य पद्धत समजून घेणे आणि निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. मतदारांनी मतदान करण्यासाठी निवडणूक अधिकाऱ्याने पुरविलेले जांभळ्या रंगाचे स्केच पेनच वापरावे. उमेदवाराच्या नावाच्या स्तंभासमोर पसंतीक्रम म्हणून असलेल्या स्तंभात प्रथम पसंतीचा उमेदवार म्हणून निवडलेल्या उमेदवाराच्या नावासमोर १ असा आकडा लिहून मतदान करावे. हा १ आकडा फक्त एकाच उमेदवाराच्या नावासमोर असावा. उर्वरित उमेदवारांबाबतचा पसंतीक्रम २, ३, ४ असे आकडे घालून दर्शवावेत. जेवढे उमेदवार निवडणूक लढवत असतील, तेवढे पसंतीक्रम देता येतात. कोणत्याही उमेदवाराच्या नावासमोर फक्त एकच आकडा घातलेला आहे, याची आणि तोच आकडा इतर उमेदवारांच्या नावासमोर घातलेला नाही, याची खात्री करणे गरजेचे आहे. मतपत्रिकेवर स्वतःचे नाव, स्वाक्षरी वा काहीही लिहू नये. अंगठ्याचा ठसा देखील उमटवू नये. तसे केल्यास मतपत्रिका अवैध ठरेल.

२०२६ च्या निवडणुकीसाठी पदवीधर मतदारांची संख्या वाढून २ लाख ५५ हजार ८२३ झाली आहे. २०२० च्या तुलनेत ४९ हजार ३६९ मतदारांची वाढ झाली आहे. वाढलेल्या मतदारसंख्येच्या पृष्ठभूमीवर प्रत्येक मतदाराने मतदानाची पद्धत समजून घेऊन आपले मत वैध राहील, याची काळजी घेणे आवश्यक आहे. प्रत्येक पदवीधर मतदाराने जबाबदारीने मतदान करावे. कारण प्रत्येक मत महत्त्वाचे आहे आणि प्रत्येक वैध मत लोकशाही प्रक्रियेला बळकटी देते.

वैभव बावनकर/नागपूर । ९५४५७४५५८०

■■■

वाचक पत्रे

दसरा झाला; जनता सगळं विसरेल?

दसरा झाला, रावणदहन झालं, पण सामान्य माणसाच्या आयुष्यातील संकटांचा रावण अजूनही जिवंत आहे. महागाईने सर्वसामान्यांचं कंबरडं मोडलंय. पेट्रोल, डिझेल, गॅस, किराणा, भाजीपाला आणि औषधांचा खर्च भागवताना सामान्य माणसाच्या नाकीनऊ येत आहेत. सण आले की मोठमोठी भाषणं होतात, सण संपल्यानंतर जनतेच्या प्रश्नांचं काय? जनता सगळं विसरून पुन्हा त्याच परिस्थितीत जगेल, असं सरकारला वाटतं का? दुसरीकडे शेतकऱ्यांची अवस्था बिकट आहे. कुठे दुष्काळ, कुठे पिकांचं नुकसान तर कुठे पाण्याची टंचाई! शेतकऱ्याच्या घामाला योग्य भाव मिळणार कधी? तरुणांनी अभ्यास करायचा, स्पर्धा परीक्षांसाठी मेहनत घ्यायची आणि शेवटी पेपरफुटीच्या बातम्यांनी निराश व्हायचं, ही परिस्थिती बदलणार कधी? तरुणांच्या हाताला काम नाही, शेतकऱ्याला आधार नाही आणि सामान्य माणसाला महागाईतून दिलासा नाही, मग विकासाच्या घोषणांचा उपयोग काय? सरकार कोणत्याही पक्षाचं असो, जनतेच्या प्रश्नांची उत्तरं देणं ही त्यांची जबाबदारी आहे. दसरा हा वाईटावर चांगल्याच्या विजयाचा सण आहे, पण आज सामान्य माणसाच्या आयुष्यातील महागाई, बेरोजगारी आणि अन्यायाचा रावण जिवंत असेल, तर खऱ्या विजयाचा अर्थ काय? सरकारने लक्षात ठेवावं, जनता केवळ सण साजरे करत नाही, तर आपल्या प्रश्नांची उत्तरंही शोधत असते. दसरा झाला म्हणून जनता सगळं विसरेल, असा समज कुणी करून घेऊ नये. कारण जनतेचे प्रश्न संपलेले नाहीत आणि जनतेचा आवाजही थांबलेला नाही!

सचिन नागरे/किनगाव जट्टु । ९६०४३२१४३२

■■■

ट्रम्प तात्यांचा दुटप्पीपणा

भारताने रशियाकडून कच्चं तेल खरेदी केल्यामुळे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर अतिरिक्त आयात शुल्क लादले. युक्रेन युद्धाच्या पृष्ठभूमीवर रशियावर दबाव आणण्यासाठी हे पाऊल उचलल्याचा दावा अमेरिकेने केला. दुसरीकडे ट्रम्प तात्यांनी तः रशियाचे राष्ट्राध्यक्ष ब्लादिमिर पुतिन यांच्याशी चर्चा करून रशियन डिझेलवरील बंदी उठवली आणि अमेरिका रशियाकडून डिझेल घेणार असल्याचे जाहीर केले. भारतावर मोठ्या प्रमाणावर आयात शुल्क लावत असताना रशियाकडून मोठ्या प्रमाणात तेल खरेदी करणाऱ्या युरोपीय देशांना मात्र कमी शुल्काची सवलत दिली गेली आहे. तात्या जे करतील ते चांगलं आणि इतरांनी केलं तर वाईट असं म्हणून कसं चालेल? हा तात्यांचा निव्वळ दुटप्पीपणा आहे. जागतिक व्यासपीठावर अमेरिकेच्या धोरणांतील दुटप्पीपणावर टीका झाल्यावर सारवासारव करीत तात्यांनी भारतीय वस्तूंवर लादलेले परस्पर शुल्क कमी केले आणि अतिरिक्त शुल्क मागे घेतले. ■

डॉ. मदन काकडे/९३७३११२४८७

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

संक्षिप्त...

स्मशान भूमीत स्वच्छता करण्याची मागणी

तभा वृत्तसेवा

औसा दि. २३ ऑक्टोबर : शहरात असलेल्या स्मशान भूमीत कसल्यास प्रकारची स्वच्छता होत नाही . जेव्हा एखादी व्यक्ती मरण पावते तेव्हाच स्मशान भूमीत स्वच्छता केली जात असून येथे जेष्ठ नागरिकांना बसण्यासाठी व्यवस्था नाही त्यामुळे त्यांचे अतोनात हाल होत आहेत . तसेच येथे झाडे - झुडूपे असल्यामुळे तेथे विंचू किंवा साप किंवा अन्य कीटक असू शकतात त्यामुळे येथे अंत्यविधीसाठी येणाऱ्या नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे .

याची त्वरित व्यवस्था करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते विलास डोलारे यांनी नगर परिषद मुख्याधिकारी यांना पाठविलेल्या पत्रातून केली आहे .

शिरूर अनंतपाळमध्ये पदवीधर मतदारांचा संमिश्र प्रतिसाद

तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. २३ ऑक्टोबर : येथील मतदान केंद्रावर संमिश्र वातावरणात मतदान प्रक्रिया पार पडली.मतदानाच्या प्रारंभी संतोष गायकवाड यांनी सर्वप्रथम मतदानाचा हक्क बजावला.त्यांच्या मतदानाने केंद्रावरील मतदान प्रक्रियेला सुरुवात झाली.यानंतर अनेक पदवीधर मतदारांनी मतदान केंद्रावर उपस्थित राहून आपल्या मतदानाचा हक्क बजावला.

मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडावी, तसेच केंद्रावरील घडामोडींवर योग्य लक्ष ठेवता यावे,यासाठी शिरूर अनंतपाळ शहर काँग्रेसचे अध्यक्ष बसवराज मठपती व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव महादेव आवाळे हे मतदान केंद्रावरील परिस्थितीवर बारकाईने आणि काळजीपूर्वक लक्ष ठेवून होतेशिरूर अनंतपाळ येथील या मतदान केंद्रावर पदवीधर मतदारांनी उत्साहाने सहभाग नोंदविल्याने मतदान प्रक्रियेला चांगला प्रतिसाद मिळाल्याचे चित्र पाहायला मिळाले या काँग्रेस पक्षाचे जिल्हा सचिव अशोक कोरे, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष व्यंकट हांद्राळे, अकबर तांबोळी, कपिल डिगोळे उपस्थित होते वेळी पोलिस प्रशासनाच्या वतीने योग्य पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

पाणी पुरवठा गुत्तेदाराच्या चुकीमुळे जनतेच्या जिवाशी खेळ
रात्रभर लाईट बंद नागरिक उकाड्याने त्रस्त

तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. २३ ऑक्टोबर : शहरातील प्रभाग क्रमांक ३,४ व ७ मध्ये नगरपंचायतच्या माध्यमातून पाणी पुरवठा योजनेचे काम चालू असून संबंधित गुत्तेदाराच्या निष्काळजीपणामुळे मोठ्या प्रमाणात विद्युत पुरवठा कराणारे लाईट चे पोल आणि तारा तुटून रात्रभर शहरातील तीन प्रभागातील लाईट बंद पडल्याने नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास झाला या बाबतीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव महादेव आवाळे व अकबर तांबोळी यांनी संबंधित घटनेची माहिती लातूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ.भारत बास्टेवाड यांना दुरध्वनी द्वारे दिली असता जिल्हाधिकारी यांनी तातडीने विद्युत पुरवठा सुरळीत करण्याच्या सूचना मुख्याधिकारी यांनी दिली असता दुसऱ्या दिवशी सकाळी ८ वा वाजता मुख्याधिकारी व नगराध्यक्ष प्रतीनिधी रतन शिवणे यांनी घटनास्थळी उपस्थित राहून विद्युत पुरवठा सुरळीत केला या वेळी प्रभाग क्रमांक ४ चे नगरसेवक रुषिकेश आवाळे,सचिन बेंबळगे, कपिल डिगोळे,प्रसाद शिवणे आदी युवकांनी विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी पुढाकार घेतला होता.

शेतकरी कर्जमुक्ती योजना जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांची चौथी यादी प्रसिद्ध

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २३ ऑक्टोबर : राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत लातूर जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांची चौथी यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या यादीमध्ये एकापेक्षा जास्त बँकांमध्ये कर्ज खाती असलेल्या आणि २ लाख रुपयांपेक्षा कमी थकबाकी असलेल्या लातूर जिल्ह्यातील एकूण २ हजार ५२९ पात्र शेतकऱ्यांचा समावेश आहे. ही यादी आधार प्रमाणीकरणासाठी संबंधित बँक शाखा, विविध कार्यकारी विकास संस्था आणि ग्रामपंचायतींमध्ये उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

ऐन दुष्काळात औसा तालुक्यातील २९०० कुटूंबाचे रेशन बंद

सुधीर गंगणे

तभा वृत्तसेवा

औसा दि. २३ ऑंक्टोंबर : सार्वजनिक वितरण प्रणालीत पारदर्शकता आणण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या वतीने संयुक्तपणे ' मिशन सुधार अभियान ' सुरू करण्यात आले आहे.या अंतर्गत आजपर्यंत केलेल्या कारवाईत अपात्र, बोगस आणि निष्क्रिय रेशन कार्ड धारकांची नावे राशन मधून वगळण्यात आली आहेत. याचा औसा तालुक्यातील २९०० कुटुंबाला फटका आहे.

खंऱ्या व गरजू लाभार्थ्यांना स्वस्त आणि मोफत रेशन योजनेचा लाभ मिळावा. या मुख्य उद्देशातून केंद्र व राज्य सरकारच्या वतीने संयुक्तपणे पारदर्शी योजना राबविण्यात येत आहे.या अंतर्गत रेशन कार्डावरील लाभार्थ्यांनी आधार लिंक,केवायसी करणे बंधनकारक करण्यात आले आहे.ज्यांनी प्रक्रिया पूर्ण केली नाही.अशा लाभधारकांनी नावे तात्पुरती वगळण्यात आली आहेत.ज्या लाभार्थ्यांनी सहा ते बारा महिने धान्य घेतले नाही.ते लाभार्थी निष्क्रिय समजून वगळण्यात आली आहेत.शासनाने ठरवून दिलेल्या उत्पन्नापेक्षा अधिक उत्पन्न असलेले लाभार्थ्यांचा लाभ या योजनेतून बंद करण्यात आला आहे.

कार्डधारकातील कोणत्याही सदस्यांच्या नावावर चार चाकी वाहन आढळून आलें आहे.अशा कार्डधारकांना या योजनेतून अपात्र करण्यात आले आहे.तसेच कुटूंबातील कोणताही व्यक्ती इन्कम टॅक्स व व्यवसायिक जीएसटी चा परतावा करत आहे .अशा लाभार्थ्यांना वगळण्यात आले आहे. पाच एकरपेक्षा अधिक क्षेत्र सिंचनाखाली असलेली किंवा शहरात १०० मीटरपेक्षा जमीन,जागा असलेल्या लाभार्थ्यांना वगळले आहे. एकाच व्यक्तीच्या नावावर दोन कार्ड किंवा खोट्या कागदपत्रांच्या आधारे मिळवलेले कार्ड या तपासणीत रद्द करण्यात आले आहे.तसेच कुटुंब दुसऱ्या शहरात किंवा राज्यात स्थलांतरित झाले.तर रेशन कार्ड रद्द करण्यात आले आहे.

शासनाच्या या नवीन निकषातून औसा तालुक्यातील ६४ हजार ७३३ लाभार्थ्यांपैकी पहिल्या टप्प्यात २९०० रेशन कार्ड धारक लाभार्थी वगळण्यात आले आहेत.त्यामुळे या वगळण्यात आलेल्या कार्ड धारकांचे रेशन बंद करण्यात आले आहे.

लाभासाठी कागदपत्रांची पूर्तता करावी : प्रियंका बोरकर

शासनाच्या नवीन निकषानुसार लाभार्थ्यांचे नाव चुकीच्या कारणातून वगळले असेल तर रेशन कार्ड धारकांनी तहसिल कार्यालयाच्या पुरवठा विभागात किंवा संबंधित रेशन दुकानदार यांच्याकडे कागदपत्रांची पुर्तता करावी. असे आवाहन पुरवठा विभागाच्या नायब तहसिलदार प्रियंका बोरकर यांनी केले आहे.

अपात्र लाभार्थ्यांची संख्या वाढणार......?

केंद्र व राज्य सरकारच्या वतीने संयुक्तपणे राबविण्यात येणाऱ्या या अभियान अंतर्गत पहिल्या टप्प्यात औसा तालुक्यातील २९०० रेशनकार्ड धारकांच्या कुटूंबातील जवळपास १५ते २०हजार जणांचे राशन बंद झाले आहे. यापुढील टप्प्यात यामध्ये आणखी वाढ होणार हे निश्चित आहे.यामध्ये नेमकी वाढ किती होणार....? हे आज सांगता येत नाही.पण या योजनेत असलेल्या अपात्र लाभार्थ्यांचे धाबे दणाणले आहे.

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळेच समाजातील वंचित, शोषित आणि उपेक्षित घटकांना सन्मानाने जगण्याचा अधिकार : आ बनसोडे

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. २३ ऑक्टोबर : भारतीय संविधानाचे शिल्पकार, विश्र्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानामुळे, समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूल्यांमुळे समाजातील वंचित, शोषित आणि उपेक्षित घटकांना सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळाला. शिक्षण, सामाजिक न्याय आणि लोकशाहीच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या जीवनात सुख, समृद्धी आणि प्रगतीच्या नव्या संधी निर्माण झाल्या. त्यामुळेच आज आपण सन्मानाने जीवन जगत आहोत, असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांनी केले.

उदगीर शहरातील जगप्रसिद्ध विश्र्वशांती बुद्ध विहारात आयोजीत ७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिना निमित्त आयोजीत कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ माजी मंत्री आमदार संजय बनसोडे महामानव भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

तसेच विश्र्वशांती बुद्ध विहारात ७० वा धम्मचक्र प्रवर्तन दिना निमित्त बुद्ध वंदनेचे आयोजन करण्यात आले. बुद्ध वंदना, त्रिशरण आणि पंचशीलाच्या स्मरणातून उपस्थितांनी भगवान गौतम बुद्धांच्या शांती, करुणा आणि मानवतेच्या संदेशाला अभिवादन केले.

धम्मचक्र प्रवर्तन दिनाला ऐतिहासिक महत्त्व असून १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथील दीक्षाभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. भारतीय सामाजिक इतिहासातील ही एक क्रांतिकारी घटना मानली जाते. या ऐतिहासिक निर्णयातून त्यांनी समता, स्वाभिमान, विवेकनिष्ठ विचार आणि मानवतावादी जीवनमूल्यांचा मार्ग समाजासमोर ठेवला. त्यामुळे धम्मचक्र प्रवर्तन दिन हा केवळ धार्मिक उत्सव नसून सामाजिक परिवर्तन, मानवी प्रतिष्ठा आणि अन्यायाविरुद्धच्या संघर्षाची प्रेरणा देणारा दिवस आहे.

भगवान गौतम बुद्धांनी जगाला अहिंसा, करुणा, मैत्री, प्रज्ञा आणि शांतीचा संदेश दिला. द्वेषाने द्वेष संपत नाही, तर प्रेम आणि मैत्रीनेच समाजात शांतता निर्माण होऊ शकते, हा बुद्धांचा विचार आजच्या काळातही तितकाच महत्त्वाचा आहे. धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त या विचारांचे आचरण करण्याचा संकल्प प्रत्येकाने करणे आवश्यक असल्याचे आमदार संजय बनसोडे यांनी सांगितले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले. शिक्षण, संघटन आणि संघर्ष या विचारांच्या माध्यमातून त्यांनी समाजाला अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची ताकद दिली. भारतीय संविधानाच्या माध्यमातून प्रत्येक नागरिकाला समान अधिकार, मूलभूत स्वातंत्र्य आणि न्यायाची हमी मिळवून देण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. यावेळी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखो समाज बांधव विश्र्वशांती बुद्ध विहार परिसरात आली होती.

यावेळी विश्र्वशांती बुद्ध विहारात महाबुद्ध वंदना घेण्यात आली .

उपस्थितांनी अनुयायांनी भगवान गौतम बुद्ध व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना अभिवादन केले.

शिरूर अनंतपाळ येथे देशासमोरील संकटरुपी रावणाचे दहन

तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. २३ ऑक्टोबर : शहरात महाविकास आघाडीच्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव महादेव आवाळे यांच्या संकल्पनेतून देशासमोरील वास्तववादी रावण दहन कार्यक्रमाचे आयोजन काँग्रेस पक्षाचे नेते डॉ अरविंद भातांब्रे यांच्या उपस्थितीत करण्यात आले होते या वेळी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष बस्वराज मठपती,राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष व्यंकट हांद्राळे,जेष्ठ व्यक्तिमत्व गुरूनाथ अचवले,डॉ.वैभव हासबे, बाळासाहेब पाटील, युवक काँग्रेसचे अध्यक्ष प्रतीक पारशेटे, काशिनाथ धुमाळे, बालाजी बरबटले, विशाल गिलचे आदी मंडळी उपस्थित होते या प्रसंगी डॉ.अरविंद भातांब्रे यांच्या हस्ते सध्या देशातील वास्तवदर्शी रावणाचे दहन करण्यात आले या वेळी बोलताना डॉ.अरविंद भातांब्रे यांनी सांगितले की सध्या देश व आपले राज्य हे भ्रष्टाचार,मतदानचोरी,

पक्षफोडी, पेपरफुटी,चंदाचोरी, महागाई,जातीवाद, हुकूमशाही व बेरोजगारी अश्या संकटाला सामोरे जात आहे याचे मुख्य कारण देशातील व राज्यातील सत्ता ही निवडणूक आयोगाला हाताशी धरून सत्ता काबीज करणे व देशात हुकूमशाही पद्धतीने कारभार करून काही ठराविक लोकांच्या फायद्यासाठी सामान्य माणसाला त्रास देणे अश्या प्रकारचा कार्यभार चालू असून यामुळे आज देशात अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत शेतकरी,युवक,सामान्य नागरिक अडचणीत आला असून या सर्व गोष्टींना सध्याचे सत्ताधारी हे जबाबदार आहेत अश्या सत्ताधारी रावणाचा आज दहन करण्यात आले अशी भुमिका मांडली या वेळी युवक व नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हास्तरीय संशोधन महोत्सवात शिवलिंगेश्वर फार्मसीने ७ पदकं पटकावली

तभा वृत्तसेवा

औसा दि.२३ ऑंक्टोंबर : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या पेठ उपकेंद्रात आयोजित 'जिल्हास्तरीय आविष्कार संशोधन महोत्सव २०२६-२७' मध्ये औसा तालुक्यातील आलमला येथील शिवलिंगेश्र्वर कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे.सलग दुसऱ्या वर्षी यशाची परंपरा कायम राखत या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी विविध संशोधन व सृजनशील सादरीकरणांमध्ये उत्कृष्ट कामगिरी बजावत एकूण ७ पारितोषिके पटकावून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विविध विद्या शाखांमध्ये मिळवलेले यश उल्लेखनीय असून मानव्यशास्त्र पदवी गटातून भाषा आणि ललित कला विभागात अनुष्का भोसले प्रथम आली आहे. वाणिज्य, व्यवस्थापन आणि कायदा विभागात अमरजीत पाटील पदवी गटातून द्वितीय क्रमांक मिळविला आहे.कृषी आणि पशुसंवर्धन विभागात सोहम उलागड्डे प्रथम ,अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान विभागात श्रद्धा कापसे प्रथम, गौतम दुर्गम प्रथम, ओंकार कोटगीरे तृतीय, वैद्यकशास्त्र आणि औषधनिर्माणशास्त्र विभागः यश मोरे द्वितीय आला आहे.

डॉं. व्ही.एम. धाराशिवे, डॉं एस. एस. कुलकर्णी, डॉं. ए. बी. गिरी, डॉं. व्ही. बी. वडेवाले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे.

विद्यार्थ्यांच्या या नेत्रदीपक यशामुळे शिवलिंगेश्र्वर कॉलेज ऑफ फार्मसीचा संशोधन, नवोपक्रम आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासातील अग्रक्रम पुन्हा एकदा सिद्ध झाला आहे.या यशाबद्दल विद्यार्थी आणि मार्गदर्शक प्राध्यापकांचे संस्थेचे अध्यक्ष शिवचरण धाराशिवे, उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, सचिव बसवेश्र्वर धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे, प्राचार्य डॉ. विश्र्वेश्र्वर धाराशिवे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष अभिनंदन केले आहे.

शास्त्री शैक्षणिक संकुलाच्या वतीने निर्माल्य संकलन; विद्यार्थ्यांनी दिला पर्यावरण संवर्धनाचा प्रेरणादायी संदेश!

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. २३ ऑक्टोबर : भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाईच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त लाल बहादुर शास्त्री शैक्षणिक संकुलाच्या वतीने सोमनाथपूर,उदगीर येथील देवीच्या मंदिरात निर्माल्य संकलन उपक्रम राबविण्यात आला.या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत धार्मिक श्रद्धेसोबतच पर्यावरण संवर्धनाची जबाबदारीही जपण्याचा प्रेरणादायी आदर्श समाजासमोर ठेवला.

भारतीय संस्कृतीत सण-उत्सव आणि धार्मिक परंपरांना विशेष महत्त्व आहे.देवीच्या पूजेसाठी वापरण्यात येणारी फुले, हार, पाने यांसारखे निर्माल्य अनेकदा मंदिर परिसरात किंवा नदी-नाल्यांमध्ये टाकले जाते.त्यामुळे पर्यावरणाचे प्रदूषण होण्याची शक्यता असते.ही बाब लक्षात घेऊन निर्माल्याचे योग्य संकलन करून पर्यावरणपूरक व्यवस्थापन करण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

औशात आनंद अनुभूती शिबीरास उत्सफुर्त प्रतिसाद

तभा वृत्तसेवा

औसा दि.२३ ऑंक्टोंबर : औसा शहरात श्री श्री रविशंकर प्रणित 'आनंद अनुभूती शिबीर झाले.या दरम्यान घ्या काळात दररोज सकाळी ०६ ते ०९ या वेळेत मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात शहर व तालुका वासी यांनी उत्फुर्त प्रतिसाद देत सहभाग घेतला.

सुरू असलेल्या दुष्काळसदृश परिस्थितीमुळे समाजामध्ये वाढलेले नैराश्य, नकारात्मकता, भीती, असुरक्षितता आणि त्यातून निर्माण झालेला मानसिक ताण-तणाव कमी व्हावा. लोकांचे मनोबल वाढावे. या उदात्त हेतूने आर्ट ऑफ लिव्हिंग औसा परिवाराच्या वतीने या विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबिराला औसा शहर व तालुक्यातून नागरिकांचा प्रचंड आणि उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. औसा शहराच्या इतिहासात प्रथमच तब्बल २५३ साधकांनी एकत्र येऊन केलेले ह ऐतिहासिक शिबिर अत्यंत यशस्वी ठरले.

या शिबिरामध्ये डॉक्टर, व्यापारी, उद्योजक, शेतकरी, विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, आध्यात्मिक, सामाजिक आणि धार्मिक अशा विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी तसेच सर्वसामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.या सहा दिवसीय शिबिरात प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करण्यासाठी आर्ट ऑफ लिव्हिंगचे वरिष्ठ प्रशिक्षक श्री. कैलास भैय्या पाटील यांनी सेवा दिली. त्यांनी सहा दिवस सर्व सहभागींना खळखळून हसवले, त्यांना मनमोकळे केले, अंतर्मुख केले. प्रत्येक व्यक्तीने आपले पुढील आयुष्य अधिक आनंदी, निरोगी, तणावमुक्त आणि सकारात्मक कसे जगावे, यासाठी श्री श्री रविशंकरजी यांनी मानवजातीला दिलेली दिव्य देणगी असलेली 'सुदर्शन क्रिया' सर्वांना प्राप्त करून दिली.

या क्रियेच्या नियमित अभ्यासाने शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुदृढ होते. असा अनुभव अनेक साधकांनी यावेळी व्यक्त केला.या शिबिरामध्ये सात दिवस घेतलेला अनुभव अनेक उपस्थितांकडून व्यक्त करण्यात आला.

या शिबिराच्या समारोप समारंभास औसा मतदार संघाचे आमदार मा. अभिमन्यू पवार साहेब यांनी विशेष उपस्थिती लावली. यावेळी त्यांनी उपस्थित आरोग्याचे महत्त्व पटवून दिले तसेच सध्याच्या गंभीर परिस्थितीत पाण्याचा काटकसरीने आणि जपून वापर करण्याचे अत्यंत सुंदर आणि मोलाचे मार्गदर्शन केले.

शिबिर यशस्वीपणे एस. के. टर्फचे सुनील कावळे यांनी आपला प्रशस्त हॉल विनामूल्य सहा दिवस उपलब्ध करून दिला, त्याबद्दल आयोजकांनी त्यांचे विशेष आभार मानले. तसेच औसा तालुक्यातील आर्ट ऑफ लिव्हिंगचे टीचर सुमित शिंदे, बसवराज वाघदरे, नागेश सड्डू, अँड.केदार गाजरे, धनराज गोमदे, सुनील कावळे, प्रशांत राजमाने, डॉ. युनुस पटेल, प्रतिक उटगे स्वयंसेवकांनी, व्हॉलेंटियर्सनी अथक परिश्रम घेऊन हे शिबिर मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडले.

थोडक्यात महत्वाचे....

नापिकीला कंटाळून शेतकऱ्याची आत्महत्या

कौसडी: अल्प पाऊस झाल्यामुळे सोयाबीनला उतारा घटला या उत्पन्नात घरगाडा चालवणे चिंतेचे झाले.यामुळे धानोरा देवगाव येथील लिंबाजी सतोबा सानप या ४८ वर्षीय शेतकऱ्याने बोरीच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना दि. २३ रोजी सकाळी उघडकीस आली. या घटनेची माहिती बोरी पोलिसांना दिल्यानंतर घटनास्थळी बिट जमादार संतोष आबुज व त्यांचे सहकाऱ्यांनी भेट देऊन पंचनामा केला.सानप यांना दोन एकर शेती असून शेती सोयाबीनची पीक घेतले होते. सोयाबीनचे उत्पन्न नझाल्यामुळे आत्म हत्या केल्याची मुलगा जगदीश सानप यांनी सांगितले. बोरी पोलीस ठाण्यात नोंद घेण्यात आली. सानप यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले असा परिवार आहे.

अल्पभूधारक शेतकऱ्याची आत्महत्या

परभणी : जिंतुर तालुक्यातील साडेगाव येथील अल्पभुधारक शेतकरी श्रीरंग मुगाजी हराळे यांनी सामाईक विहीरीमध्ये उडी मारून आत्महत्या केल्याची घटना दि.२३ रोजी उघडकीस आली. अल्पभुधारक शेतकरी श्रीरंग हराळे यांनी शेती व पिके पावसामुळे हातची गेल्याने आर्थीक विवंचनेतुन आत्महत्या केली असल्याचे समजते. दरम्यान जि.प. सदस्य दिलीपराव देशमुख यांनी जिल्हा रूग्णालयात जावून नातेवाईकांची भेट घेत सांत्वन केले. दरम्यान श्रीरंग हराळे यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी असा परिवार आहे. त्यांच्यावर साडेगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



डिग्रस बंधाऱ्यातील पाणी भागविणार तहान

पालम:मराठवाड्यात यंदा पावसाने ओढ दिल्याने अनेक भागांत पाणी टंचाईचे संकट गंभीर बनले आहे.धरणांमधील घटता पाणीसाठा, आटत आहे.तसेच विहिरी कोरड्या पडल्याने जलस्रोतांमुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.अशा परिस्थितीत तालुक्यातील डिग्रस बंघारा व गोदावरी नदीतील आरक्षित पाणी तहान भागविण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. पिण्याच्या पाण्यासाठी आरक्षित केलेल्या पाण्याचा नियोजनबद्ध वापर झाल्यास ग्रामीण तसेच शहरी भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळू शकतो. मात्र, पाणी उपलब्ध असणे एवढेच पुरेसे नसून त्याचे योग्य नियोजन,वितरण आणि काटकसरीने वापर करणेही तितकेच आवश्यक आहे.

झरीतील एनसीसी कॅडेटस प्रशिक्षणासाठी रवाना

झरी : कै.बाबारावजी बोबडे पाटील माध्यमिक विद्यालयातील ५२ महाराष्ट्र बटालियन एनसीसी, नांदेड अंतर्गत जीडी व जेडब्ल्यू विभागातील विद्यार्थी-विद्यार्थिनी २२ ते ३१ या कालावधीत परभणी येथील जवाहर नवोदय विद्यालयात आयोजित दहा दिवसीय वार्षिक प्रशिक्षण शिबिरासाठी रवाना झाले. या शिबिरात शिस्तबद्ध कवायती, शस्त्र हाताळणी, नकाशा वाचन, प्रथमोपचार, शारीरिक कवायती आणि आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. मुख्याध्यापक विष्णू गावंडे यांनी शिबिराचे महत्त्व सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्राचार्य बाळासाहेब देवकर यांनी विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेऊन प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करावे, असे आवाहन केले. एनसीसी विभागाचे मार्गदर्शक राठोड यांनी विद्यार्थ्यांची शिबिरासाठी तयारी करून घेतली. यावेळी प्राध्यापक पांढरपोटे, भोसले, कांबळे, जाधव, शिंपले, शेवटे, टार्फे मॅडम, धनगे मॅडम, दामोदर गायकवाड, नामदेव वईद तसेच पालकवर्गाने विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेत प्रिन्स स्कुलचे यश



सेलू : राज्य कलाशिक्षण मंडळामार्फत राज्यातील विविध माध्यमांच्या शाळांमध्ये राज्यस्तरीय बाल चित्रकला स्पर्धा २०२६ चे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा एकाच दिवशी चार गटांमध्ये घेण्यात आली. या स्पर्धेत सेलू येथील एल.के.आर.आर. प्रिन्स इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या दोन विद्यार्थिनींनी जिल्हास्तरावर उल्लेखनीय यश संपादन केले. गट क्र.१ मध्ये कु. सानवी सुदर्शन मोगल हिने द्वितीय तर गट क्र.२ मध्ये कु.ओवी कैलास ढेरे हिने द्वितीय क्रमांक मिळवून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. विद्यार्थिनींच्या या यशामागे त्यांचे सातत्यपूर्ण परिश्रम, कलागुण आणि कला शिक्षक महादेव बोरकर यांचे मार्गदर्शन व मेहनत यांचा मोलाचा वाटा आहे. या यशाबद्दल श्रीराम प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय रोडगे, सचिव डॉ. सविता रोडगे, प्रशासकीय अधिकारी प्रा. महादेव साबळे, प्राचार्य सोबत हिवराळे, अनिल कुमार व अब्दुल बादशहा यांनी यशस्वी विद्यार्थिनी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

परभणी जिल्ह्यात ६१.८१ टक्के मतदान

जिल्ह्यातील ७६ मतदान केंद्रावर मतदान शांततेत, १६४८२ मतदारांनी बजावला हक्क

परभणी : मराठवाडा पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीसाठी परभणी जिल्ह्यातीलील एकुण ७६ मतदान केंद्रावर सायंकाळी ४ वाजेपर्यंत शांततेत मतदान पार पडले असुन एकुण २६ हजार ६८४ मतदारांपैकी १६ हजार ४८२ मतदारांनी आपला हक्का बजावला असुन एकुण ६१.८१ टक्के मतदानाची नोंद करण्यात आली आहे.

मराठवाडा पदवीधर मतदार संघात जवळपास ४२ उमेदवारांनी आपल्या भवितव्य अजामावले असले तरी खरी तिरंगी लढत झाल्याची चर्चा होत आहे. या मतदार संघात उच्च शिक्षीत मतदारांनी नेमका कौल कोणाला दिला हे आता २७ रोजी होणाऱ्या मतमोजणीनंतर स्पष्ट होणार आहे. दरम्यान परभणी जिल्ह्यातील ७६ मतदान केंद्रावर आज सकाळी ८ वाजल्यापासुन मतदानाला प्रारंभ झाला. पहिल्या दोन तासातच जवळपास १२ टक्के मतदान झाले होते. दुपारनंतर मात्र अनेक मतदान केंद्रावर मतदारांच्या रांगा

पहावयास मिळाल्या. मतदानाची ४ ची वेळ संपत आल्यानंतरही अनेक मतदान केंद्रावर रांगा पहावयास मिळाल्या होत्या. मानवत येथील नगर पालिकेच्या इमारतीतील मतदान केंद्रावर सायंकाळी ४ नंतरही जवळपास ५०-५५ मतदार हे रांगेत मतदानाची उभे होते. दुपारनंतर मतदारांनी दाखवलेला उत्साह लक्षणीय होता. त्यामुळेच नेमका लाभ कोणत्या उमेदवाराला होणार हे आता दोन दिवसानंतर स्पष्ट होणार आहे. एकंदरीतच सर्वच मतदान केंद्रावर मतदारांनी उत्सपुर्तपणे मतदानाचा हक्क बजावला आहे.

परभणी जिल्ह्यातील गंगाखेड तालुक्यातील ७ मतदान केंद्रावर ५८.८८ टक्के मतदारांनी हक्क बजावला. या ठिकाणी २ हजार ५०५ मतदारांपैकी १ हजार ४७५ मतदारांनी हक्क बजावला. सोनपेठ येथील ४ केंद्रावर ६१.३६ टक्के मतदान झाले. या ठिकाणी १ हजार १४१ मतदारांपैकी ७०० मतदारांनी हक्क बजावला. पुर्णा तालुक्यातील ६४.९३ टक्के मतदान झाले. एकुण ७ बुधवरील १ हजार ९५६ मतदारांपैकी १ हजार २७० मतदारांनी हक्क बजावला. मानवत तालुक्यातील ६ मतदान केंद्रावर ६२.६१ टक्के मतदान झाले. यात १ हजार ६६६ पैकी १ हजार ०४३ मतदारांनी आपला हक्क बजावला आहे. दरम्यान जिल्ह्यातील ७६ मतदान केंद्रावर सरासरी ६१ टक्के मतदारांनी हक्क बजावला आहे.

चायनीज फटाक्यांविरोधात प्रशासनाची विशेष मोहीम

परभणी (प्रतिनिधी): दिवाळीच्या पार्श्वभूमीवर चायनीज, निकृष्ट दर्जाचे आणि प्रतिबंधित फटाक्यांची साठवणूक व विक्री रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने विशेष तपासणी मोहीम हाती घेतली आहे.अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी अनुराधा ढालकरी यांनी सर्व उपविभागीय दंडाधिकारी व तहसीलदारांना तपासणी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

ग्राहक दक्षता कल्याण फाउंडेशन यांनी २५ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडे याबाबत तक्रार केली होती. त्याची दखल घेत प्रशासनाने फटाके विक्रीची दुकाने, गोदामे, साठवणूक केंद्रे आणि तात्पुरत्या स्टॉल्सची तपासणी करण्याचे निर्देश दिले आहेत. या मोहिमेत पोलीस, अग्निशमन विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था आणि पेट्रोलियम व विस्फोटक सुरक्षा संघटना यांचा समन्वय राहणार आहे.

विनापरवाना साठा, प्रतिबंधित फटाके, परवान्यातील मर्यादेपेक्षा अधिक साठवणूक तसेच अग्निसुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन आढळल्यास साठा जप्त करणे, आस्थापना बंद करणे आणि नियमानुसार फौजदारी कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

ग्राहक दक्षता कल्याण फाउंडेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन सोळंके यांनी ग्राहकांची निकृष्ट फटाक्यांमुळे फसवणूक होऊ नये, यासाठी प्रशासनाने अवैध फटाके बाजारातून हटवावेत, अशी मागणी केली. ग्राहकांनी फटाके खरेदी करताना अधिकृत मान्यता व सुरक्षिततेची खात्री करावी असे आवाहन केले आहे.

कोयत्याने हल्ला करणाऱ्यास कारावास

परभणी (प्रतिनिधी): लग्न करण्यास नकार दिल्याच्या कारणावरून तरुणीवर कोयत्याने हल्ला करून तिला जखमी करणाऱ्या गणेश कुलदिपके याला न्यायालयाने दोषी ठरवून तीन वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली.तसेच त्याला एकूण ३० हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी एम.डी. गौतम यांनी हा निकाल दिला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ३ ऑगस्ट २०२० रोजी फिर्यादी तरुणी काम करत असलेले दुकान बंद झाल्यानंतर ती वडिलांची वाट पाहत दुकानासमोर थांबली होती. त्यावेळी तिच्या मावस बहिणीचा पती गणेश कुलदिपके तेथे आला.'तू माझ्यासोबत लग्न का करत नाहीस,' असे म्हणत त्याने तिला शिवीगाळ करून गालावर चापट मारली. यावेळी बाजूच्या दुकानातील एक मुलगा तिला सोडविण्यासाठी आला असता आरोपीने कमरेला असलेला कोयता काढून तरुणीच्या दोन्ही हातांवर व हाताच्या पोटरीवर वार करून तिला जखमी केले. त्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पळून गेला. या प्रकरणी नानलपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.या गुन्ह्याचा तपास सहायक पोलीस निरीक्षक कल्पना राठोड यांनी करून आरोपीविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

न्यायालयीन सुनावणीदरम्यान सरकार पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता व्ही.के.पोटफोडे यांनी बाजू मांडली. या खटल्यात एकूण दहा साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. फिर्यादी, जप्ती पंच, घटनास्थळ पंच आणि तपास अधिकारी यांच्या साक्षींसह रासायनिक विश्लेषण अहवाल महत्त्वाचा ठरला. न्यायालयाने आरोपीला भादविच्या कलम ३२४ अन्वये दोन वर्षांचा सश्रम कारावास व १५ हजार रुपये दंड, तर शस्त्र अधिनियमाच्या कलम ४/२५ अन्वये तीन वर्षांचा सश्रम कारावास व १५ हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली. दंड न भरल्यास संबंधित कलमांनुसार अतिरिक्त साध्या कारावासाची शिक्षाही सुनावण्यात आली आहे.

पदवीधर मतदार संघासाठी परभणी जिल्ह्यातील आज सकाळपासून मतदारांनी मतदान केंद्रावर गर्दी केली होती. दुपारी ३ च्या सुमारास शहरातील उद्देश्वर विद्यालयाच्या केंद्रावर महिला व पुरूषांनी रांगा लावत मतदानाचा हक्क बजावला. (छाया: राहुल धबाले)

कौसडीच्या वळणावर बोलेरो पिकअप पलटी

कौसडी (प्रतिनिधी):कौसडी-बोरी वळण रस्त्यावर बोलेरो पिकअप वाहन पलटी होऊन झालेल्या भीषण अपघातात एक मजूर गंभीर जखमी झाला, तर वाहनचालक किरकोळ जखमी झाला आहे. अपघाताची तीव्रता एवढी होती की, बोलेरो पिकअप वाहनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. ही घटना शुक्रवार, दि.२३ रोजी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, बोलेरो पिकअप (क्र. एमएच १४ ईएम १८२५) हे वाहन बोरी येथून गुळखंड फाटा परिसरातील समृद्धी कॅम्पकडे जात होते. दरम्यान, कौसडीजवळील वळण रस्त्यावर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने पिकअप रस्त्यालगतच्या शेतातील वड्यात जाऊन पलटी झाले. या अपघातात वाहनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, समृद्धी कॅम्पवर काम करणारा एक मजूर गंभीर

जखमी झाला, तर वाहनचालकाला किरकोळ दुखापत झाली.अपघाताची माहिती मिळताच पत्रकार दत्ता काळे,पत्रकार शेख नईमोद्दीन, पं.स.सदस्य आवेस कादरी, शाकीर पटेल, संजय एरमुले आणि शेख इमरान यांच्यासह स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. नागरिकांच्या मदतीने जखमींना उपचारासाठी रुग्णालयात पाठविण्यात आले. दरम्यान, बोरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवसांभ स्वामी, पोलीस उपनिरीक्षक महादेव गायकवाड आणि पोलीस कर्मचारी श्रीराम दंडवते हे पेट्रोलिंगसाठी जात असताना त्यांना अपघात झाल्याचे दिसले. त्यांनी तत्काळ वाहन थांबवून अपघाताची माहिती घेतली.

कौसडी-बोरी रस्त्यावर दोन ते तीन ठिकाणी धोकादायक वळणे असून, यापूर्वीही या वळणांवर अनेक अपघात घडले आहेत. काही जणांना या अपघातांत आपला जीव गमवावा लागल्याचे ग्रामस्थ सांगतात. वारंवार घडणाऱ्या अपघातांमुळे या रस्त्यावरील प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. प्रत्येक अपघातानंतरच उपाययोजना होणार का, असा सवाल उपस्थित होत असून, सार्वजनिक बांधकाम विभागाने या वळण रस्त्यांची पाहणी करून तातडीने संरक्षक कठडे बसवावेत, धोकादायक ठिकाणी सूचना फलक लावावेत आणि आवश्यक सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

पेडगाव पाणी प्रश्नावरून उपोषणाचा इशारा

परभणी (प्रतिनिधी): तालुक्यातील पेडगाव येथील पाणीपुरवठा सुरळीत करावा, १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून जुन्या नळयोजनेवर झालेल्या खर्चाची चौकशी करावी आणि ग्रामपंचायतीचे मागील आठ महिन्यांचे प्रोसीडिंग बुक व संबंधित दप्तर उपलब्ध करून द्यावे, या मागण्यांसाठी अभय देशमुख यांनी २९ ऑक्टोबरपासून ग्रामपंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

देशमुख यांच्या पत्नी तथा ग्राम पंचायत सदस्य स्नेहा देशमुख यांनी वारंवार तक्रार करूनही कार्यवाही झाली नसल्याचे निवेदनात म्हटले आहे. जुन्या व सध्याच्या ग्राम सेवकांनी दप्तर ताब्यात नसल्याचे लेखी कळविल्याने त्याची चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. गावात नियमित पाणीपुरवठा सुरू करावा, पाणी खासगी वापरासाठी वळविले जात आहे का याची चौकशी करावी आणि पाणी न मिळणाऱ्या वस्त्यांना टँकरद्वारे पाणी द्यावे, अशीही मागणी देशमुख यांनी जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी व पोलीस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

परभणी शहरातील सिंचन नगरातील श्री तुळजाभवानी देवी व मारूती मंदिर उत्सव समितीच्या वतीने आयोजीत अखंड हरिनाम सप्ताहास मोठ्या उत्साहपुर्ण वातावरणात सुरूवात झाली. यावेळी हभप भागवताचार्य अनिल महाराज माजलगावकर यांनी कथेचे निरूपन केले. यावेळी महिला व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. (छाया: श्रीकांत कुलकर्णी)

नकारात्मक विचारांचे दहन करा: खा. जाधव

परभणी (प्रतिनिधी): दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी व कष्टकऱ्यांनी खचून न जाता संकटाचा धैर्याने सामना करावा. रावणाच्या पुतळ्यासोबत मनातील नकारात्मक विचारांचेही दहन करून नव्या उमेदीने परिस्थितीला सामोरे जावे, असे आवाहन खासदार संजय जाधव यांनी केले.

पूर्णा येथील जुना मोंढा मैदानावर राजे संभाजी मित्र मंडळाच्या वतीने विजयादशमीनिमित्त आयोजित ५१ फुटी रावण दहन व आतषबाजी सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी त्यांच्या हस्ते रावण दहन करण्यात आले. शिवसेनेच्या वतीने जिल्ह्यातील सुमारे २५ हजार माता-भगिनींना शिलाई मशीन व सायकलींचे वाटप करण्यात आले असून, आर्थिक अडचणीत असलेल्या कुटुंबांतील मुलींसाठी येत्या मार्च महिन्यात ५०० जोडप्यांचे सामूहिक विवाह आयोजित करण्याचा संकल्पही खा. जाधव यांनी जाहीर केला.अध्यक्षस्थानी ज्येष्ठ व्यापारी प्रतापसिंग राम चंदानी होते. जिल्हाप्रमुख विशाल कदम यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते. सूत्रसंचालन जगदीश जोगदंड व जगन्नाथ कदम यांनी केले,तर संकेत कदम यांनी आभार मानले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख विशाल कदम यांनी दुष्काळाच्या काळात शेतकरी व शेतमजुरांच्या मदतीसाठी शिवसेना कटिबद्ध असल्याचे सांगितले.

शिवसेनेच्या वतीने दुष्काळग्रस्तांना दिवाळी शिधा

भगवा खांद्यावर शिवसैनिक शेतकऱ्यांच्या बांधावर, गरजू कुटूंबाना शिवसेनेचा मदतीचा हात, जिल्हाप्रमुख आनंद भरोसे यांची उपस्थिती

परभणी (प्रतिनिधी): दुष्काळाच्या संकटामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकरी आणि गरजू कुटुंबांची दिवाळी गोड व्हावी, या उद्देशाने शिवसेनेच्या वतीने दिवाळीचा शिधा परभणीत दाखल झाला आहे. शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खा.डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या वतीने हा मदत उपक्रम राबविण्यात येत असून, दुष्काळग्रस्त कुटुंबांपर्यंत मदत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जात आहे.

यंदाच्या दुष्काळी परिस्थितीमुळे परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे. खरीप पिकांचे नुकसान, शेती उत्पादनातील घट आणि वाढत्या खर्चामुळे अनेक शेतकरी कुटुंबांसमोर आर्थिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यातच दिवाळीचा सण जवळ आल्याने सर्वसामान्य कुटुंबांवरील खर्चाचा भार वाढला आहे. अशा परिस्थितीत गरजू कुटुंबांना दिवाळीसाठी शिधा उपलब्ध करून देत त्यांच्या आनंदात सहभागी होण्याचा उपक्रम शिवसेनेच्या वतीने हाती घेण्यात आला आहे.

'भगवा खांद्यावर, शिवसैनिक शेतकऱ्यांच्या बांधावर!' या घोषवाक्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या सुख-दुःखात

(छाया: राहुल धबाले)

सहभागी होण्याचा संदेश शिवसैनिक देत आहेत. शेतकरी हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असून, त्याच्यावर संकट आले की त्याचा परिणाम संपूर्ण कुटुंबावर होतो. त्यामुळे संकटाच्या काळात शेतकरी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना मदतीचा हात देण्याची भूमिका या उपक्रमातून मांडण्यात येत आहे.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकारातून तसेच खा.डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाच्या माध्यमातून दिवाळीच्या सणात गरजू कुटुंबांना दिलासा देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.सणाचा आनंद समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचावा,या भावनेतून शिवसैनिकांनी मदतकार्याचा पुढाकार घेतला आहे.

परभणीत दिवाळीचा शिधा दाखल झाल्यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख आनंद भरोसे,महिला जिल्हाप्रमुख गीता सूर्यवंशी, तालुकाध्यक्ष प्रभाकर कदम, शहरप्रमुख सचिन पाटील, रामदेव ओझा, निखिल जैन, नरेश एरळकर, भागवत डुकरे यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते.

यावेळी दुष्काळग्रस्त शेतकरी आणि गरजू कुटुंबांपर्यंत मदत पोहोचविण्याच्या उपक्रमात शिवसैनिकांनी सहभाग नोंदविला. आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या कुटुंबांना सणासुदीच्या काळात आधार मिळावा आणि त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी आणि गरजू कुटुंबांना दिवाळीचा शिधा उपलब्ध करून देण्याच्या उपक्रमातून सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. केवळ घोषणांपुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष मदतीच्या माध्यमातून संकटग्रस्त कुटुंबांच्या पाठीशी उभे राहण्याचा संदेश शिवसेनेच्या वतीने देण्यात येत आहे.

दै सोलापुर तरुण भारतच्या जिल्हा कार्यालयाच्या उदघाटन समारंभात मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या

सामाजिक कार्यकर्ते सलीम इनामदार, पांडूरंग रणखांब

सामाजिक कार्यकर्ते संजय किन्हीकर देशमुख

प्रत्येक ग्रामपंचायतीत १०० जलतारा प्रकल्प साठ्यांची निर्मिती करा- जिल्हाधिकारी

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २३ ऑक्टोबर

औंढा नागनाथ तालुक्यात संभाव्य दुष्काळी परिस्थितीत पाणी व चारा टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने उपाययोजना कराव्यात. प्रत्येक ग्रामपंचायतीने किमान १०० जलतारा प्रकल्प साठ्यांची निर्मिती करावी, तसेच ऑगस्ट २०२७ पर्यंत पाणीटंचाई टाळण्यासाठी दीर्घकालीन नियोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले.

औंढा नागनाथ येथील पंचायत समिती सभागृहात ग्राम पंचायत अधिकारी व तलाठी यांच्या संयुक्त आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीत तालुक्यातील पाणी उपलब्धता, चारा नियोजन आणि संभाव्य टंचाईच्या उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला.

पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्यासाठी जलसंवर्धनाच्या कामांना प्राधान्य द्यावे. पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता वाढविण्यासाठी कुरण लागवडीला प्रोत्साहन द्यावे. जिल्ह्याबाहेर चारा वाहून नेण्यावरील बंदीची प्रभावी अंमलबजावणी करावी. पाण्याचा अनधिकृत उपसा रोखण्यासाठी तलाठ्यांनी आवश्यक कार्यवाही करावी, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

गावपातळीवरील परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी दर शुक्रवारी संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घ्यावी. टंचाईसंदर्भातील समस्यांचे तातडीने निराकरण करून कार्यवाहीचा अहवाल नियमित सादर करावा. बैठकीला गैरहजर राहणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. अधिग्रहण केलेल्या बोअर आणि विहीर पासून ५०० मीटर अंतरावर कुठलाही बोअर किंवा विहीर घेता येणार नाही त्याचबरोबर पाण्याचे स्रोत जीओ टॅगिंग करून घ्यावे, ऑगस्ट २०२७ महिना पर्यंत पाणी पुरेल याच नियोजन करावे, गावात जनावरे किती गावात चारा किती प्रमाणात उपलब्ध आहे याची माहिती घ्या असेही निर्देश यावेळी देण्यात आले.

सोयाबीन कुटार बाहेर जात असेल तर त्यावर कार्यवाही करावी असे निर्देश यावेळी देण्यात आले.

बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुधीर ठोंबरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी केशव गड्डापोड, उपविभागीय अधिकारी विकास माने, तहसीलदार हरीश गाढे, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता, गटविकास अधिकारी गोपाल कल्हारे, सहायक गटविकास अधिकारी अनंता घोरपडे,, तालुका कृषी अधिकारी शिवप्रसाद संगेकर, पशुसंवर्धन विभागाचे पारवेकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

लाल बहादूर शास्त्री विद्यालयात बाल वैज्ञानिक प्रदर्शन

तभा वृत्तसेवा
वसमत, २३ ऑक्टोबर

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविणे, संशोधनवृत्तीला चालना देणे आणि नवकल्पनांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने पंचायत समिती शिक्षण विभाग, वसमत आणि लाल बहादूर शास्त्री स्कूल, वसमत यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५४ वे तालुकास्तरीय बाल वैज्ञानिक प्रदर्शन 'इनोव्हिजन २०२६' बुधवार, दि. २१ ऑक्टोबर रोजी लाल बहादूर शास्त्री विद्यालय, वसमत येथे उत्साहात संपन्न झाले. या प्रदर्शनाचे उद्घाटन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड होते. यावेळी गटविकास अधिकारी प्रफुल्ल तोटेवाड, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) विपुल भागवत आणि शिक्षणाधिकारी(प्राथमिक) मंजुश्री कल्लेवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

या विज्ञान प्रदर्शनात इयत्ता सहावी ते आठवीच्या गटातून ११०, तर इयत्ता नववी ते बारावीच्या गटातून २६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. तसेच विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या गटातून इयत्ता सहावी ते आठवीचे ३ आणि इयत्ता नववी ते बारावीचे २ विद्यार्थी सहभागी झाले. अशा प्रकारे एकूण १४१ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक जिज्ञासेला, कल्पकतेला आणि प्रयोगशीलतेला प्रोत्साहन देणे, हा या प्रदर्शनाचा प्रमुख उद्देश होता.

प्रदर्शनाच्या यशस्वी आयोजनासाठी लाल बहादूर शास्त्री विद्यालयाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, गटशिक्षणाधिकारी योगेश पाटील तसेच विवेक पेडगावकर, संगीता जाधव आणि गंगाधर साखरे यांनी सहकार्य केले. पंचायत समिती शिक्षण विभागाच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

हिंगोलीत पदवीधरांच्या निवडणुकीसाठी महायुतीचे नेते एकवटले

जिल्ह्यात सर्व मतदान केंद्रांवर शांततेत मतदान

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २३ ऑक्टोबर

औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघासाठी दि २३ ऑक्टोबर रोजी सकाळी आठ वाजल्यापासून मतदानासाठी सुरूवात झाली. यावेळी महायुतीचे उमेदवार सतीश चव्हाण यांच्यासाठी महायुतीचे स्थानिक नेत्यांनी मतदान केंद्राबाहेर हजेरी लावीत पदवीधर मतदारांना मतदानाचे आवाहन केले.

हिंगोली येथील तहसील कार्यालयाच्या मतदान केंद्रावर शुक्रवार दि २३ ऑक्टोबर रोजी औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी मतदान पार पडले. यावेळी महायुतीतील राष्ट्रवादीचे नेते तथा माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, शिवसेनेचे आ. संतोष बांगर, माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर, भाजपचे युवा जिल्हाध्यक्ष शिवाजीराव मुटकुळे यांनी मतदान केंद्राला भेट दिली. तसेच मतदान केंद्राबाहेर उभारण्यात आलेल्या मंडपात बसून पदवीधर मतदारांच्या याद्या हातात घेवून मतदारांना जास्तीत जास्त संख्येने मतदान करण्याचे आवाहन केले.

औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघात महायुतीचे उमेदवार सतीश चव्हाण यांनी दौरे करीत पदवीधरांना भेटी दिल्या होत्या. मराठवाडा शिक्षक संघाचे उमेदवार सुशील घोटे यांनीही मराठवाड्यात झंझावती दौरे केले तर महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ प्रतापसिंह पाटील, उबाठा शिवसेनेचे दिलीप घुगे यांनीही प्रचार केला. या तीनही उमदेवारांचे भवितव्य मतपेटीत बंद झाले असून दि २७ ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथे मतमोजणी होणार आहे.

औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघासाठी शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान होणार आहे. हिंगोली जिल्ह्यातील ३६ मतदान केंद्रांवर सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदानाची प्रक्रिया पार पडली. जिल्ह्यात एकूण १० हजार ३१५ मतदार असून, त्यामध्ये ८ हजार ३३७ पुरुष आणि १ हजार ९७८ महिला मतदारांचा समावेश आहे. मतदारांना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी मतदान केंद्रांवरील आवश्यक सुविधा, दिशादर्शक सूचना, मतदान साहित्याची उपलब्धता आणि अधिकारी-कर्मचाऱ्यांची सज्जता दिसत होती. मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सर्व मतदान पेट्या जिल्हाधिकारी कार्यालयात जमा करण्यात येणार आहेत. त्यानंतर त्या विभागीय आयुक्त तथा ०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या अधिपत्याखालील निर्धारित सुरक्षित कक्षात (स्ट्राँग रूम) पाठविण्यात येणार आहेत. या प्रक्रियेसाठी वरिष्ठ उपजिल्हाधिकारी व त्यांचे पथक तसेच पोलीस विभागाचे सशस्त्र सुरक्षा पथक तैनात राहणार आहे. मतपेट्यांची सुरक्षित वाहतूक आणि जमा करण्याची प्रक्रिया काटेकोरपणे पार पाडण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, तहसीलदार श्रीकांत भुजबळ, निवडणुक अधिकारी श्रीमती चोंडेकर यांनी मतदान प्रक्रियेवर लक्ष ठेवून सुरळीत मतदान प्रक्रिया पार पाडली. यावेळी मतदान केंद्रांवर चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. जिल्ह्यात सर्व मतदान केंद्रावर शांततेत आणि सुरळीत मतदान पार पडले आहे. २७ ऑक्टोबरला मतमोजणी होणार असून सर्वांचे लक्ष निकालाकडे लागले आहे.

संक्षिप्त वृत्त

दुचाकीसाठी नवीन वाहन क्रमांक मालिका सुरू

हिंगोली- हिंगोली येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या मोटारसायकल संवर्गातील यापूर्वीची 'चक३८-अछ' ही वाहन क्रमांक मालिका संपुष्टात आली आहे. त्यामुळे आता मोटारसायकल संवर्गासाठी 'एमएच३८- अेपी ०००१ ते एमएच ३८- अेपी ९९९९' ही नवीन वाहन क्रमांक मालिका सुरू करण्यात येत आहे. नवीन वाहन खरेदी करणाऱ्या ज्या वाहनधारकांना आपल्या वाहनासाठी आकर्षक क्रमांक राखीव ठेवायचा आहे, त्यांनी उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाशी संपर्क साधावा किंवा ऑनलाइन पद्धतीने विहित शासकीय शुल्क भरून आपला पसंतीचा क्रमांक राखीव करून घ्यावा. वाहनधारकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन हिंगोलीचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी सतीश मरगू जाधव यांनी केले आहे.

काठोडा पाझर तलाववरील पाणी ऊपसा थांबवा

औंढा नागनाथ- काठोडा येथे वन विभागाचे असलेले पाझर तलावाच्या खालच्या ठिकाणी वन्य प्राणी, पक्षी तसेच गुरेढोरे यांना पाणी पिण्यासाठी तयार करण्यात आलेल्या पानवठ्यामध्ये पाईप व मोटारी टाकून सर्रास पाणी उपसा करीत असणाऱ्या इसमाविरुद्ध कायदेशीर कारवाई करावी, कारवाई न झाल्यास दि २८ ऑक्टोबर रोजी काठोडा येथील पाझर तलावामध्ये जलसमाधी घेणार असल्याचा इशारा शैलेश यादव मोरे, गणपत हौसाजी मोरे, सदाशिव गोमाजी मोरे, विश्वनाथ मुंजाजी कबले यांनी दिला आहे. या प्रकरणात वन विभाग महसूल विभाग व कृषी विभाग काय कारवाई करते याकडे जनतेचे लक्ष वेधले आहे. जिल्हा प्रशासनाने आदेश देऊनही हिंगोली तालुक्यातील चोरजवळा, बोराळा आदी तलावात मोटारीने पाण्याचा मोठ्या प्रमाणात उपसा होत आहे. संबंधित अधिकारी व कर्मचारी चिरीमिरी घेवून कार्यवाही करण्यास टाळाटाळ करीत असल्याचा आरोप गावकरी करीत आहेत.

हिंगोलीत भव्य ऑल इंडिया हॉकी स्पर्धा- दुबे

हिंगोली- हिंगोली शहरात येत्या डिसेंबर जानेवारी मध्ये ऑल इंडिया हॉकी टूर्नामेंटचे आयोजन करण्यात येणार असून सदरील टूर्नामेंट हे हिंगोली हॉकी हिंगोलीच्या संघटनेच्यावतीने लवकरच टूर्नामेंट ची तारीख जाहीर करण्यात येणार आहे सदरील टूर्नामेंट हे पोलीस परेड ग्राउंड येथे घेण्यात येणार असून या स्पर्धेत हिंगोलीतील क्रीडाप्रेमींनी या ऑल इंडिया हॉकी स्पर्धा लान सहकार्य करावे असे आवाहन हॉकी हिंगोलीच्यावतीने करण्यात आले असून येत्या रविवारी हॉकी संघटनेची स्पर्धेनिमित्त नियोजन बैठकीचे आयोजन शासकीय विश्रामगृह येथे दुपारी दोन वाजता करण्यात आली आहे. याच बैठकीनंतर स्पर्धेच्या तारीख जाहीर होण्याची शक्यता आहे. बैठकीमध्ये सर्व हिंगोलीतील हॉकीच्या पदाधिकारीसह आजी-माजी खेळाडूंनी सहभाग नोंदवावा असे आवाहन हॉकी हिंगोलीचे सचिव केशव दुबे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

महिला बस चालकाच्या प्रसंगावधानामुळे प्रवाशांचे जीव बचावले

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २३ ऑक्टोबर

वसमत आगाराची बस क्रमांक एमएच २० बीएल ३९६७ शुक्रवार दि २३ रोजी सकाळी ९.१५ वाजता भारती कॅम्प ते नांदगाव या रस्त्यावरून जात असतांना दुसऱ्या एका वेगाने येणाऱ्या बसने ओव्हरटेक केल्यामुळे महिला बस चालकाचे बसवरील नियंत्रण सुटले परंतु प्रसंगावधान दाखवून त्यांनी ती बस रस्त्याच्या बाजूला असलेल्या शिवारात सुरक्षितपणे नेली. त्यामुळे बसमधील प्रवाशांचा जीव वाचला.

वसमत आगाराची बस सकाळी ९.१५ वाजता भारती कॅम्प ते नांदगाव रस्त्यावरून जात होती. या बसमध्ये अनेक प्रवासी प्रवास करीत होते. अचानक ई शिवाई बसने या बसला ओव्हरटेक केल्यामुळे आणि रस्ता लहान असल्यामुळे महिला बस चालक करूणा पंडित यांचे बसवरील नियंत्रण सुटले परंतु त्यांनी प्रसंगावधान दाखवून ही बस रस्त्याच्या कडेला असलेल्या शिवारात नेली. त्याठिकाणी असलेल्या नाल्यामध्ये बस सुरक्षितपणे थांबवली. त्यामुळे बसमधील प्रवाशांचा जीव वाचला आहे. चालक करूणा पंडित आणि वाहक आंबादास दळवी यांनी प्रवाशांना सुरक्षितपणे बाहेर काढले. बस चालक, वाहक यांच्यासह प्रवाशी सुरक्षित आहेत अशी माहीती अधिकारी दिपक भुसारे यांनी दिली आहे. बस शिवारात गेल्यामुळे ज्वारीच्या पिकाचे नुकसान झाले आहे तसेच बसचेही नुकसान झाले आहे.

हिंगोलीत विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांचा सत्कार

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २३ ऑक्टोबर

सार्वजनिक दसरा महोत्सव समितीच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय करणाऱ्या महिलांचा सत्कार करण्यात आला यांप्रसंगी नगराध्यक्षा सौ रेखा श्रीराम बांगर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय अधिकारी भुते, राजामती शिवाजी मुटकुळे, नंदाताई गजानन घुगे, श्रद्धा वीर यांची प्रमुख उपस्थिती होती.

महिला समितीच्या प्रमुख विद्या पवार व अर्चना जाधव यांच्या वतीने हिंगोली शहरातील विविध क्षेत्रात ज्या महिलांनी आपले नेतृत्वाच्या बळावर नावलौकिक मिळविले अशा महिलांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते समाजातील विविध क्षेत्रात त प्राविण्य मिळविलेल्या महिलांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये सामाजिक क्षेत्रात संगीता चौधरी, सौंदर्यतज्ञ मंजुषा शहाणे, महिला सुरक्षा या क्षेत्रात सा.पो.नि. सौ. प्रेमलता गोमासे,वैद्यकीय क्षेत्रात डॉ माधुरी देशमुख,संगीत क्षेत्रात अनुराधाताई नांदेडकर, व्यापारी क्षेत्रात नंदा शंकर भारस्कर, राजकीय क्षेत्रात सुनिता मुळे,शिक्षण क्षेत्रात मंजुषा गिरीश सगरोळीकर, योगा क्षेत्रात माधुरी शास्त्री या नऊ महिलांचा यांचा सार्वजनिक दसरा महोत्सव समिती महिला समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे आयोजन सार्वजनिक दसरा महोत्सव समिती व महिला समितीच्या प्रमुख विद्या पवार अर्चना जाधव यांनी केले होते. यावेळी रांगोळी तसेच महिलांच्या इतर स्पर्धेतील विजेत्यांनाही पारितोषिके वितरीत करण्यात आली.

सांदीपनी पब्लीक स्कूलमध्ये विजया दशमीनिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २३ ऑक्टोबर

सांदीपनी पब्लिक स्कूल सुनील नगर तरोडा बुद्रुक नांदेड येथील शाळेत विजयादशमीचे औचित्य साधून विविध कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने झाली विजयादशमीचा सण हा संपूर्ण भारतात मोठ्या उत्साहाने आणि भक्तिभावाने साजरा केला जातो. या दिवशी प्रभू श्रीरामाने रावणाचा वध केला तसेच देवी दुर्गेने महिषासुराचा पराभव केला. चिमुकल्या मुलांनी नाट्यस्वरूपाच्या माध्यमातून हिंदू धर्माचे महत्त्व पटवून दिले व त्यानंतर शाळेच्या मैदानात लहान मुलीसाठी दांडिया खेळण्याचा कार्यक्रम आयोजित केला होता. अनेक मुला-मुलींनी खूप उत्साहात दांडिया खेळताना दिसून आल्या. यावेळी शाळेचे संचालक सुनील राठोड सौ पुष्पा सुनील राठोड, सौ रेश्मा विपुल राठोड, सौ माहेश्वरी मुकुल राठोड मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी शाळेचे सहसंचाल मुकुल राठोड शाळेच्या उपमुख्याध्यापिका सौ हरप्रीत कौर, प्रशासक मारुती मेखाले यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक, शिक्षिका तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

समुह नृत्य स्पर्धेत दराडे विद्यालयाचे यश

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २२ ऑक्टोबर

भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलित श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे माध्यमिक विद्यालय येथील विद्यार्थिनींनी सार्वजनिक दसरा महोत्सव समितीच्या वतीने आयोजित समूह नृत्य स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला. महाभारतातील प्रसंगावर आधारित नृत्य सादर करून विद्यार्थिनींनी आपल्या कलागुणांचे दर्शन घडविले. या यशाबद्दल संघाला पाच हजार रुपये रोख रक्कम व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेत विद्यार्थिनींनी नृत्यातील तालबद्धता, सांघिक समन्वय आणि कलात्मक अभिव्यक्ती यांचा सुंदर मिलाफ साधला. भारतीय संस्कृती व पौराणिक परंपरेचे दर्शन घडविणाऱ्या सादरीकरणामुळे विद्यालयाच्या संघाने स्पर्धेत मानाचे स्थान मिळविले. या संघात रुद्रिका घुगे, तन्वी गव्हाणे, आराध्या जरे, श्रावणी मारकड, नम्रता वैद्य, स्वरा साखरेकर, धनश्री गुठ्ठे, आरुषी पालवे, अंकिता राऊत, तनिष्का राऊत, वंशिका निरगुडे, हर्षदा कुगावकर आणि श्रद्धा साळेगावकर या विद्यार्थिनी सहभागी झाल्या. त्यांना अध्यापक संजय गुठ्ठे, श्रीमती संगीता जाधव आणि श्रीमती शोभा कल्याने यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यालयात आयोजित सत्कार समारंभात मुख्याध्यापक डॉ. प्रकाश अंभोरे आणि उपमुख्याध्यापक अनिल लोळेवार यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थिनी व मार्गदर्शक शिक्षकांचा पुष्पहार घालून गौरव करण्यात आला. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रा. मदन मार्डीकर, सचिव ॲड. गयबाराव नाईक आणि सर्व संचालकांनी विद्यार्थिनी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले. या यशामुळे विद्यालयाच्या सांस्कृतिक उपक्रमांना प्रोत्साहन मिळाले आहे.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

पदवीधर मतदारसंघासाठी नांदेडमध्ये ५९.८१ टक्के मतदान

तभा वृतसेवा
नांदेड, दि.२३ ऑक्टोबर -

औरंगाबादं विभाग पदवीधर मतदारसंघाच्या मतदारसंघीय निवडणूक प्रक्रियेदरम्यान आज, २३ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत एकूण ५९.८१ टक्के मतदान झाल्याची माहिती निवडणूक प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

जिल्हा निवडणूक कार्यालय, नांदेड यांच्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या आकडेवारीनुसार, या मतदान प्रक्रियेसाठी एकूण ३६ हजार ६८७ मतदार नोंदणीकृत होते. त्यापैकी २१ हजार ९४२ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

मतदान केलेल्यांमध्ये १८ हजार १८० पुरुष, ३ हजार ७६१ महिला आणि इतर प्रवर्गातील एका मतदाराचा समावेश आहे. पुरुष मतदारांची मतदानाची टक्केवारी ६३.३६ टक्के, महिलांची ४७.०७ टक्के, तर इतर प्रवर्गाची ३३.३३ टक्के नोंदविण्यात आली.

नांदेड जिल्ह्यातील मतदानाची ही आकडेवारी उपजिल्हाधिकारी तथा उपनिवडणूक अधिकारी राजकुमार माने यांनी सादर केलेल्या अहवालातून स्पष्ट झाली आहे.

सिडकोत पदवीधर मतदान ६०टक्के

नवीन नांदेड- औरंगाबाद विभागातील पदवीधर संघातील उमेदवारात तिरंगी लढत होऊन दिनांक २३ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ८ ते ४ पर्यंत पदवीधरांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला असून एकूण ६० टक्के मतदान सिडको हडको परिसरातून झाले आहे .

औरंगाबाद विभागातून पदवीधर मतदारसंघातून ४१ उमेदवार आपले नशीब आजमावत दिनांक २३ ऑक्टोबर रोजी सिडकोत कुसुमताई विद्यालय मतदान केंद्रावरून ५०८ मतदानापैकी ३०९ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला आहे तर शिवाजी विद्यालय मतदान केंद्रावरून ५१२ मतदानापैकी २९३ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. या दोन मतदान केंद्रावरून १०२० मतदानापैकी ६०२ एवढ्या मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला असल्याने एकूणच ६० टक्के मतदान सिडको हडको परिसरातून झाले आहे. पदवीधर मतदारसंघातून तिरंगी लढत ही लक्षवेधी ठरणारी आहे. आठ जिल्ह्यात पदवीधर मतदार कुणाच्या बाजूने कौल देणार व कोण बाजी मारणार याकडे जनतेचे लक्ष लागले आहे पदवीधर संघातून निवडणूक झालेला उमेदवार आपल्या कार्यकाळात कितपत पदवीधर व शिक्षक यांचे किती प्रश्न मार्गी लावणार याकडे इच्छुकांचे लक्ष लागले आहे या तिरंगी लढत ती बाजी कोण मारणार हे येणाऱ्या२७ ऑक्टोबरला जनतेसमोर येणार आहे. पदवीधर मतदार संघात मतदारांना मतदान कसे करावे याचा अधिक माहिती नसल्यामुळे बरेचसे मतदान बाद होण्याची शक्यता अधिक आहे. सदरील मतदान केंद्रावर कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अशोक जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचा कडेकोट बंदोबस्त होता.

सहा मतदान केंद्रांवर शांततेत मतदान प्रक्रिया

नायगाव- लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी मतदारांचा सहभाग महत्त्वाचा मानला जातो. याच लोकशाही मूल्यांचे दर्शन ०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक २०२६ च्या मतदान प्रक्रियेत नायगाव तालुक्यात घडून आले. तालुक्यातील सहा मतदान केंद्रांवर शुक्रवारी मतदान प्रक्रिया शांततेत आणि सुरळीतपणे पार पडली. या निवडणुकीत एकूण २ हजार १५६ मतदारांपैकी १ हजार ३१८ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला असून, तालुक्यात ६१.१३ टक्के मतदानाची नोंद झाली आहे. या मतदानाचा केंद्रनिहाय तपशील आणि अंतिम अहवाल तहसीलदार डॉ. धम्मप्रिया गायकवाड यांनी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, नांदेड यांच्याकडे सादर केला आहे.

नायगाव तालुक्यातील नायगाव, नरसी, मांजरम, घुंगराळा, बरबडा आणि कुंटूर येथील सहा मतदान केंद्रांवर मतदानाची व्यवस्था करण्यात आली होती. या केंद्रांवर मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडली. एकूण मतदारांमध्ये १ हजार ७८९ पुरुष आणि ३६७ महिला मतदारांचा समावेश होता. त्यापैकी १ हजार १२७ पुरुष आणि १९१ महिला अशा एकूण १ हजार ३१८ मतदारांनी मतदान केले.

मतदान केंद्रनिहाय आकडेवारीनुसार, मांजरम येथे ६४.५९ टक्के, बरबडा येथे ६३.९६ टक्के, कुंटूर येथे ६२.७८ टक्के, नरसी येथे ६०.२२ टक्के आणि घुंगराळा येथे ६०.०९ टक्के मतदानाची नोंद झाली आहे. नायगाव येथील मतदानाची टक्केवारी अधिकृत अहवालातील आकडेवारीच्या पडताळणीनंतर निश्चित करता येईल.

मतदान प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी निवडणूक यंत्रणेने आवश्यक नियोजन केले होते. मतदान पूर्ण झाल्यानंतर सर्व सहा केंद्रांवरील मतदानाची आकडेवारी संकलित करून अंतिम अहवाल जिल्हा निवडणूक कार्यालयाकडे पाठविण्यात आला आहे. लोकशाही प्रक्रियेत पदवीधर मतदारांचा सहभाग हा केवळ मतदानापुरता मर्यादित नसून, सुजाण नागरिक म्हणून आपली जबाबदारी पार पाडण्याचेही प्रतीक आहे. नायगाव तालुक्यातील या मतदान प्रक्रियेमुळे पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीतील स्थानिक सहभागाचे चित्र स्पष्ट झाले आहे.

अशोकनगर गेट क्रमांक १ समोरील चौकाला 'स्वातंत्र्यवीर सावरकर चौक' नाव देण्याची मागणी

तभा वृतसेवा
नांदेड, दि.२३ ऑक्टोबर -

नांदेड शहरातील अशोकनगर गेट क्रमांक एकसमोरील चौकाला 'स्वातंत्र्यवीर सावरकर चौक' असे नाव देण्यात यावे, अशी मागणी अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष निखिलभाऊ लातूरकर यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी महानगरपालिका आयुक्त आणि महापौरांना निवेदन दिले आहे.

मातृभूमीवरील असीम प्रेम, राष्ट्राप्रती अढळ निष्ठा आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठी सर्वस्व समर्पित करण्याची जाज्वल्य प्रेरणा देणारे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एक महत्त्वपूर्ण व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी अशोकनगर परिसरातील एका चौकाला त्यांचे नाव देण्यात यावे, अशी भूमिका लातूरकर यांनी निवेदनातून मांडली आहे.

'ने मजसी ने परत मातृभूमीला, सागरा प्राण तळमळला!' या सावरकरांच्या अजरामर काव्यपंक्तींमधून मातृभूमीविषयीची उत्कट ओढ आणि राष्ट्रनिष्ठेची प्रखर भावना आजही प्रत्ययास येते. त्यांचे जीवन म्हणजे संघर्ष, त्याग, धैर्य आणि देशभक्तीचा प्रेरणादायी इतिहास आहे. त्यांच्या कार्यातून युवा पिढीला केवळ देशावर प्रेम करण्याचीच नव्हे, तर राष्ट्रहितासाठी कृतिशील होण्याची प्रेरणाही मिळते. त्यामुळे त्यांच्या नावाने चौकाचे नामकरण करणे ही केवळ नामफलकापुरती मर्यादित बाब नसून, राष्ट्रप्रेरणेचा विचार समाजात रुजविण्याचा प्रयत्न असल्याचे लातूरकर यांनी नमूद केले.

तीन ते चार दशकांपासून समाजोपयोगी उपक्रमांची परंपरा

अशोकनगर परिसरात तत्कालीन नगरपालिकेने सावरकर प्रतिष्ठानसाठी जागा उपलब्ध करून दिली होती. गेल्या तीन ते चार दशकांपासून या माध्यमातून विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्याची परंपरा सुरू आहे. या पार्श्वभूमीवर अशोकनगर गेट क्रमांक एकसमोरील चौकाला स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

नगरसेवकांनी नामकरणाचा ठराव मांडावा

या मागणीला मूर्त स्वरूप देण्यासाठी प्रभाग क्रमांक पाचमधील भाजपचे नगरसेवक ड. महेश कनकदंडे, साहेबराव गायकवाड, जयश्रीताई पावडे आणि शांभवी साले यांनी महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत नामकरणाचा ठराव मांडून तो मंजूर करून घ्यावा, असे आवाहनही लातूरकर यांनी केले आहे.

राष्ट्रप्रेम व सामाजिक कर्तव्याची भावना दृढ होईल

महाराष्ट्रात सावरकरांच्या विचारांचा प्रसार करणाऱ्या मोजक्या प्रतिष्ठानांमध्ये नांदेडमधील सावरकर प्रतिष्ठानचे योगदान महत्त्वाचे आहे. या चौकाचे नामकरण झाल्यास परिसरातील नागरिकांसह युवा पिढीमध्ये राष्ट्रप्रेम, राष्ट्रनिष्ठा आणि सामाजिक कर्तव्याची भावना अधिक दृढ होईल, असा विश्वास लातूरकर यांनी व्यक्त केला.

भ्रष्ट कर्मचाऱ्यावरील कारवाईस विलंबाचा आरोप; नागरिकांचा उपोषणाचा इशारा!

मुदखेड -संबंधित कर्मचाऱ्याविरुद्ध तक्रार करूनही कारवाई होत नसल्याचा आरोप मुदखेड येथील ज्येष्ठ नागरिक तथा सामाजिक कार्यकर्ते राम चौधरी यांनी केला आहे. कथित गैरव्यवहाराची चौकशी करून संबंधित कर्मचाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल करावा, अशी मागणी त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे केली आहे. चौधरी यांनी दि. १४ ऑक्टोबर २०२६ रोजी नांदेड येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधीक्षकांकडे तक्रार अर्ज सादर केला. यापूर्वीही विविध शासकीय कार्यालयांकडे तक्रारी करून पाठपुरावा केल्याचे त्यांनी नमूद केले आहे. मात्र, अद्याप ठोस कारवाई झाल्याची माहिती मिळाली नसल्याचा दावा त्यांनी केला. संबंधित कर्मचाऱ्याने गरीब नागरिकांची आर्थिक फसवणूक करून पैसे उकळल्याचा आरोप चौधरी यांनी केला आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून संबंधित कर्मचाऱ्याच्या मालमत्तेचीही चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. यासंदर्भात लोकायुक्त, राज्यपाल, सीबीआय, ईडी, आयकर विभाग आणि जिल्हाधिकाऱ्यांसह विविध कार्यालयांकडे तक्रारी पाठविल्याचेही त्यांनी सांगितले. राम चौधरी यांनी आपण ८१ वर्षांचे ज्येष्ठ नागरिक असून सामाजिक कार्यकर्ता म्हणून जनहिताच्या प्रश्नांसाठी आवाज उठवत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. संबंधित कर्मचाऱ्याविरुद्ध कोणताही वैयक्तिक द्वेष नसून, जनतेच्या हितासाठी आणि कथित भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी तक्रार केल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. एका महिन्याच्या आत संबंधित कर्मचाऱ्याविरुद्ध एफ.आय.आर. दाखल करून त्याला अटक करावी आणि त्याच्या मालमत्तेची चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. या मागण्यांवर कार्यवाही न झाल्यास दि.१० नोव्हेंबर २०२६ पासून नांदेड येथील संबंधित कार्यालयासमोर आपल्या कार्यकर्त्यांसह आमरण उपोषण सुरू करणार असल्याचे त्यांनी निवेदनात म्हटले आहे.

महिलांच्या दहा दिवसीय योगशिबिराला प्रतिसाद

नांदेड-लोकविहार कॉलनी नांदेड येथे दुर्गा महोत्सवाच्या निमित्ताने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक,आरोग्य विज्ञान शाखा , गजानन पाटील योग केंद्र, नांदेड व नवदुर्गा महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेले 'महिलांसाठी प्राणायाम आणि ध्यान विशेष योगशिबिर' उत्साहात संपन्न झाले. १२ ते २१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत पार पडलेल्या या दहा दिवसीय शिबिराला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरामध्ये महिलांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याला प्राधान्य देत विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यानाचे मार्गदर्शन करण्यात आले. नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक तंदुरुस्ती वाढविणे, मनःशांती मिळविणे, ताणतणाव कमी करणे आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण करणे याविषयी महिलांना मार्गदर्शन करण्यात आले.

गोवंश वाहतूक करणाऱ्यांवर रामतीर्थ पोलिसांची कारवाई

तभा वृतसेवा
नरसी, दि.२३ ऑक्टोबर -

नरसी येथे गोवंशांची वाहतूक करणाऱ्या पिकअप वाहनावर रामतीर्थ पोलिसांनी कारवाई करत तीन गोवंश आणि एका म्हशीसह एकूण ५ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई गुरुवार, दि. २२ ऑक्टोबर रोजी करण्यात आली. या प्रकरणी वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू असल्याची माहिती सपोनि विक्रम हराळे यांनी दिली आहे.

याबाबत रामतीर्थ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नायगाव येथील जनावरांच्या बाजारातून गोवंश कत्तलीसाठी पिकअप वाहनातून नेले जात असल्याची गोपनीय माहिती रामतीर्थ पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार नरसी येथे पिकअप क्रमांक चक

२६ उक १५४२ हे वाहन थांबवून तपासणी करण्यात आली. यावेळी वाहनात तीन गोवंश आणि एक म्हैस आढळून आली. या जनावरांच्या कानाला अधिकृत ओळख दर्शविणारे एअरटॅग नसल्याचेही निदर्शनास आले.

विशेष म्हणजे, संबंधित पिकअप वाहनाविरुद्ध यापूर्वी देगलूर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ५६२/२०२४ दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणी रामतीर्थ पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २२४/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम २८१ तसेच प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० मधील कलम ११(१)(अ), (ड), (ई) व (ह) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

वर्षभरापासून अवैध धंद्यांविरोधात धडक कारवाई

रामतीर्थ पोलीस ठाण्याचे सपोनि विक्रम हराळे यांनी मागील वर्षभरापासून अवैध धंद्यांविरोधात धडक कारवाई सुरू ठेवली आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण कारवायांमुळे पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अवैध धंदेवाल्यांमध्ये खळबळ उडाली असून, पोलिसांच्या या कामगिरीचे नागरिकांतून कौतुक होत आहे.

४ तास थ्री फेज विद्युत पुरवठ्यासाठी महावितरणला निवेदन;अन्यथा रास्ता रोको

तभा वृतसेवा
आदमपूर, दि.२३ ऑक्टोबर -

बिलोली देगलूर तालुक्यासह संपूर्ण महाराष्ट्रात पावसाने खंड दिल्याने दुष्काळ परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे महावितरण कंपनीने २४ तास शेतकऱ्यांना थ्री फेज विद्युत पुरवठा देऊन दिलासा द्यावा, अन्यथा २८ रोजी आदमपूर फाटा येथे रास्ता रोको करण्यात येणार असल्याचे शेतकऱ्यांच्या वतीने प्रभाकर पेंटे यांनी प्रशासनास निवेदन दिले आहे.

आदमपूर, बिलोली, देगलूरसह,खतगांव,आळंदी, टाकळी,अटकळी,गळेगांव सह परिसरात भीषण परिस्थिती निर्माण झाली. या परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांनी रब्बी पेरणीच्या तयारीच्या अनुषंगाने आपल्या शेतात असलेल्या इंधन विहिरीद्वारे शेतजमीन भिजविण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु,महावितरण कंपनीने केवळ आठ तास थ्री फेज विद्युत पुरवठा करत आहे. त्यातंच विद्युत पुरवठा अनेकदा ट्रीप होत ये-जा करीत असल्याने शेतकऱ्यांना शेती भिजवणे शक्य होत नाही. त्यामुळे महावितरण कंपनीने येणाऱ्या आठ दिवसात २४ तास विद्युत पुरवठा करा अन्यथा २८ रोजी देगलूर-नांदेड राज्य महामार्गावर आदमपूर फाटा कमान येथे शेतकऱ्यांच्या वतीने लोकशाही मार्गाने रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल,इशारा दिला आहे.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी राज्य सरकार खंबीरपणे उभे : खासदार डॉ. अजित गोपछडे

तभा वृतसेवा
नांदेड, दि.२३ ऑक्टोबर -

राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेल्या पाच हजार रुपयांच्या अग्रीम मदतीबद्दल खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी आभार मानले. दुष्काळाच्या संकटात राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून, शेतकऱ्यांना आवश्यक शासकीय मदत आणि नुकसानभरपाई लवकर मिळवून देण्यासाठी पाठपुरावा केला जाईल, असा विश्वास त्यांनी दिला.

देगलूर तालुक्यातील शेवाळा, शेळगाव, तमलुर, मंडगी फाटा, नरंगल, सुंडगी फाटा, चैनपूर, खानापूर, करडखेड, मरखेल, आणि हणेगाव येथे खा. डॉ. अजित गोपछडे यांनी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांशी संवाद साधला. या भेटीदरम्यान त्यांनी शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. दुष्काळामुळे शेतीसमोर निर्माण झालेली आव्हाने, पिकांचे नुकसान, जनावरांच्या चारा-पाण्याचा प्रश्न आणि शासकीय मदतीची आवश्यकता यासंदर्भात शेतकऱ्यांशी चर्चा केली.

यंदाच्या दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आर्थिक संकटाचा सामना करत आहेत. पिकांचे नुकसान आणि शेतीच्या उत्पन्नात घट झाल्याने आगामी रब्बी हंगामाची तयारी करणेही शेतकऱ्यांसाठी आव्हानात्मक ठरत आहे. अशा परिस्थितीत शासनाकडून जाहीर करण्यात आलेली पाच हजार रुपयांची अग्रीम मदत शेतकऱ्यांना तात्पुरता आर्थिक आधार देणारी ठरणार आहे. मात्र, दुष्काळाची तीव्रता लक्षात घेता शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत आणि नुकसानभरपाई वेळेत मिळणे गरजेचे आहे.

चारा-पाणी आणि नुकसानभरपाईसाठी पाठपुरावा

दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे, जनावरांसाठी चारा व पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करणे आणि प्रशासकीय स्तरावरून पात्र शेतकऱ्यांना शासकीय मदत मिळवून देणे यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, असे आश्वासन खा. डॉ. गोपछडे यांनी यावेळी दिले. शेतकऱ्यांच्या समस्या प्रशासनापर्यंत पोहोचवून त्यावर योग्य कार्यवाही होण्यासाठी पाठपुरावा केला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

शेतकरी बांधवांची मोठी उपस्थिती

या दौऱ्यादरम्यान माधवराव मिसाळे गुरुजी, शिवाजीराव देशमुख बळेगावकर,

प्रकाश पाटील बेंबरेकर, अड. प्रीतम देशमुख, शिवकुमार देवाडे, अशोक साखरे, ग्रेडर साहेब, ताराकांत पाटील नरंगलकर, अंबादास पाटील नरंगलकर, प्रशांत पाटील आचेगावकर, यादवराव पाटील हावरगेकर, संतोष पाटील येरगीकर, शिवराज हांडे, मारुती हनेगावे, अशोक डुकरे, लक्ष्मण धनसुरे, मोहन पाटील, बसवंत गोपछडे, भांगे साहेब, बाबू पाटील खुतमापूरकर, सुभाष माटलवार, भास्कर परबते, प्रदीप वाघमारे, विक्रम घुळेकर , शिवकांत माळगे, राजेंद्र ऊळगड्डे, संजीव पांचाळ, शिवकांत घडले, अंबादास कहांडे, रामलिंग स्वामी, योगेश मुरगे आणि विनायक पटणे यांच्यासह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पाचट शेतातच ठेवल्यास खोडवा ऊस उत्पादनांसाठी प्रभावी उपाय : सुभाषराव देशमुख

तभा वृतसेवा
हदगाव, दि.२३ ऑक्टोबर -

श्री. सुभाष शुगर प्रा. लि.हडसणी व शिऊर साखर कारखाना लि. वाकोडी या दोन्ही कारखान्याचे गाळप हंगाम २०२६-२७ दोन्ही कारखाना कार्यक्षेत्रातील कळमनुरी, हदगाव -हिमायतनगर, उमरखेड व गेटकेन कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकरी बांधवांच्या विश्वासाने व सहकार्याने पूर्ण जोमात चालू आहे.अल निनोच्या प्रभावामुळे तापमानात मोठी वाढ झाली असून पाण्याची कमतरता निर्माण होऊन ऊस लागवडीचे प्रमाण कमी होऊ शकतो. ज्यांच्याकडे मुबलक पाणी असेल त्यांनी नक्कीच ऊस लागवड करून सहकार्य करावे. ऊस तोडणीनंतर पाचट जळण्याची पारंपरिक पद्धत शेतकरी बंधूंनी पूर्णपणे टाळून पाचट शेतातच आच्छादन म्हणून ठेवल्यास शाश्वत खोडवा ऊस उत्पादनांसाठी प्रभावी उपाय ठरतो त्यासोबतच दोन्ही कारखाना कार्यक्षेत्रातील गाळप हंगाम २०२६-२७ मध्ये तूटलेल्या उसाचा खोडवा पुढील गाळप हंगामासाठी राखू इच्छितात अशा ऊस उत्पादकांकरिता कारखान्यामार्फत पाचटकुटी करून देण्यात येणार आहे. याकरिता प्रति एकर ११०० रु. शेतकऱ्यांनी नगदी द्यायचे आहेत उर्वरित प्रति एकर १००० रु. कारखाना भरणार आहे तरी सदर योजनेचा लाभ घेण्याचे आव्हान श्री सुभाष शुगर प्रा. लि. व शिऊर साखर कारखाना लि. वाकोडी चे अध्यक्ष सुभाषराव लालासाहेब देशमुख यांनी केले आहे.

पाचट न जाळता शेतात ठेवल्यामुळे प्रति एकर ४ ते ५ टन पाचट मिळतो १६ ते २० किलो नत्र,८ ते १२ किलो स्फुरद यासह पोटॅश उपलब्ध होतो. ५० ते ६० हजार लिटर पाण्याची बचत होते. ४० ते ५० युनिट वीज वाचते. बाष्पीभवन कमी होते तापमान थंड राहते. गांडुळांची निर्मिती होते. पांढऱ्या मुळांची योग्य वाढ होते. सेंद्रिय पदार्थामुळे जमिनीचे भौतिक, रासायनिक गुणधर्म सुधारून ऊस उत्पादन वाढण्यास मदत होते. पाचट जाळल्यामुळे भौतिक, रासायनिक या पद्धतीने जमिनीचे दुष्परिणाम होऊन पाणी धरून ठेवण्याची क्षमता कमी होऊन त्याचा सरळ - सरळ परिणाम उत्पादनावर होऊ शकतो म्हणूनच शेतकरी बांधवांनी दुष्काळावर मात करण्यासाठी पाचट व्यवस्थापन हा कमी खर्चातील सर्वात प्रभावी उपाय असल्याचे मत श्री सुभाष शुगर प्रा. लि. व शिऊर साखर कारखाना लि.वाकोडीचे अध्यक्ष सुभाषराव लालासाहेब देशमुख यांनी केले आहे.

जाहिर प्रसिद्धीकरण

सोलापूर येथील मे. सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन (हंबीरे सो...) यांचे कोर्टात...

भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि.,
वादी
विरुध्द
मल्हार पेट्रोलियम व इतर

प्रतिवादी
१) मल्हार पेट्रोलियम
पत्ताः मालेगांव यात्रा, लोहा, अहमदनगर रोड, जि. नांदेड.
२) डॉ. विद्या हंसराज पाटील
वय : ४८ वर्षे, धंदा व्यापार,
रा. मालेगांव यात्रा, लोहा, अहमदनगर रोड, जि. नांदेड.

ज्याअर्थी, यातील वादी यांनी प्रतिवादी यांचेविरुध्द रक्कम वसूलीचा दावा दाखल केला आहे. सदर कामी तुम्ही प्रतिवादी यांना समन्स / नोटीसा बजावणीसाठी पाठविले असता सदर ठिकाणी राहत नसल्यामुळे न बजावलेबद्दल बेलिफ रिपोर्ट आलेला आहे. तसेच अर्जदाराच्या माहितीप्रमाणे त्यांना माहिती असलेला तुमचा राहण्याचा वर नमूद केलेला शेवटचा पत्ता आहे.

त्याअर्थी या जाहीर नोटीसीने तुम्हांस कळविण्यात येते की, उक्त अर्जाबाबत तुमची कांही हरकत असल्यास अथवा उक्त अर्जाच्या पृष्ठयर्थ अथवा विरुध्द तुमचे कांही म्हणणे असल्यास तुम्ही ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून मे. कोर्टानी नेमलेली तारीख ११ /१२/२०२६ रोजी स्वतः अथवा आपल्या वकीलामार्फत या न्यायालयात हजर राहून आपली हरकत नोंदवावी अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही, असे समजून उक्त अर्जाचे कामी पुढील आदेश मे. कोर्टातर्फे देण्यात येईल.

आज दिनांक १९ माहे १० इसवी सन २०२६ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्क्याने प्रसिध्द केले.

लिपीक

सहा. अधिक्षक
दिवाणी न्या. व. स्तर,
सोलापूर

नांदेड-अर्धापूरमध्ये एकाच युडायस क्रमांकावर तीन ठिकाणी शाळा; चौकशी सुरु

तभा वृतसेवा
नांदेड, दि.२३ ऑक्टोबर -

नांदेड व अर्धापूर तालुक्यात एकाच युडायस क्रमांकाचा वापर करून तीन वेगवेगळ्या ठिकाणी शाळा चालविल्या जात असल्याच्या तक्रारीची शिक्षण विभागाने दखल घेतली आहे. याप्रकरणी चौकशी करून वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याचे निर्देश शिक्षण विभागाकडून देण्यात आले आहेत.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) युवासेनेचे उपजिल्हाप्रमुख सचिन पाटील यांनी २८ सप्टेंबर २०२६ रोजी यासंदर्भात शिक्षण विभागाकडे लेखी तक्रार दाखल केली होती. नांदेड व अर्धापूर परिसरातील काही शाळांमध्ये एकाच युडायस क्रमांकाचा वापर होत असल्याचा संशय व्यक्त करत त्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्याची मागणी केली होती.

या तक्रारीच्या अनुषंगाने शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद नांदेड यांच्या कार्यालयाने २२ ऑक्टोबर २०२६ रोजी गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती नांदेड/अर्धापूर यांना पत्र पाठविले आहे. संबंधित तक्रारीतील मुद्द्यांनुसार संयुक्त समिती गठित करून वस्तुनिष्ठ अहवाल कार्यालयास सादर करण्याचे निर्देश या पत्रात देण्यात आले आहेत. तसेच प्रकरणात विलंब होणार नाही, याची दक्षता घेण्यासही सांगण्यात आले आहे.

तक्रारीमध्ये ऑक्सफर्ड ग्लोबल स्कूल, नवीन मोंढा, पुपणी आणि कोठा, अर्धापूर या ठिकाणांचा उल्लेख करण्यात आला आहे. या ठिकाणी एकाच युडायस क्रमांकाचा वापर होत असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला असून, त्याची सत्यता अधिकृत चौकशीतून स्पष्ट होणार आहे.

चौकशी अहवालाकडे लक्ष

शिक्षण विभागाने तक्रारीची दखल घेऊन चौकशीचे निर्देश दिल्यामुळे आता संबंधित शाळांच्या नोंदी, युडायस क्रमांक आणि शाळांच्या प्रत्यक्ष कार्यपद्धतीची तपासणी होण्याची अपेक्षा आहे. चौकशी अहवालानंतर नियमांचे उल्लंघन आढळते का आणि पुढे कोणती कारवाई होते, याकडे लक्ष लागले आहे.